
साप्ताहिक

# माणूस

शनिवार १६ मार्च १९७४
एक रुपया




अन्नस्वतंत्रता अंक
गरिबी हटाव अंक
दूध-शेती अंक
जलमुक्ती अंक
नव्या अर्थव्यवस्थेचा
शोध घेणारे हे
काही पूर्वीचे माणूस विशेषांक
या मालिकेतील
हा आणखी एक...
लघुउद्योग विशेषांक

□


नोकरी नसलेल्यांनी
नोकरी नको असलेल्यांनी
या अंकाचे
कृतीपूर्ण स्वागत केले

**तर**
**महाराष्ट्राचा**
**पंजाब**
**होण्यास**
**वेळ**
**लागणार**
**नाही**

# साप्ताहिक माणूस

| संपादक | साहाय्यक | शनिवार | वर्ष : तेरावे |
|---|---|---|---|
| श्री. ग. माजगावकर | दिलीप माजगावकर | १६ मार्च | अंक : बेचाळीसावा |
| | सौ. निर्मला पुरंदरे | १९७४ | किंमत : एक रुपया |


## एक विकास पावलेला लघुउद्योग



**श्री. सोपारकर : आपल्या कारखान्यातल्या टूलरूममध्ये**

ठाण्यात टेलिफोन एक्स्चेंजवरून पेट्रोल पंपाकडे जाताना, श्री. सोपारकर ह्यांचा 'भारत उद्योग' हा शीट मेटल', 'प्रेस पार्टस' आणि इतर कामे करणारा छोटेखानी कारखाना लागतो. आज हा कारखाना इथे डौलात उभा आहे. २५ माणसे हाताखाली काम करीत आहेत. आय. बी. एम. ब्रॅडमा ऑफ इंडिया, किर्लोस्कर, दांडेकर आदि प्रथितयश कंपन्यांचे भरपूर काम त्यांच्याकडे आहे. साडेतीन-चार लाखांची मालमत्ता उभी आहे. ९ लाखाची वार्षिक उलाढाल होते आहे. एकूण जम चांगला बसला आहे....

पण १९३९ साली श्री. सोपारकरांचा मुंबईला एका १०×१० च्या खोलीत छोटासा कारागिरीचा व्यवसाय होता हे कुणालाही सांगूनही खरे वाटणार नाही. तिथे ते सोनारांना लागणारी उपकरणे बनवीत असत. पुढे श्री. मोरारजीभाई


माणूस साप्ताहिक, १०२५ सदाशिव पेठ, पुणे ४११ ०३० दूरध्वनी ५७३५९



प्रकाशित लेख, चित्रे इत्यादीबाबतचे हक्क स्वाधीन. अंकात व्यक्त झालेल्या मतांशी 'माणूस' साप्ताहिकाचे चालक सहमत असतीलच असे नाही. ललित साहित्यातील पात्रे काल्पनिक.

देसाई अर्थमंत्री असताना त्यांनी सुवर्णनियंत्रण कायदा पुकारला. त्याबरोबर सोनारांच्या धंद्यावर जसे गंडांतर आले तसे ते श्री. सोपारकरांच्या धंद्यावरही आले.

त्यावेळी श्री. सोपारकरांनी ह्या उद्योगाला सुरुवात केली. ठाण्यात एक छोटीशी शेड बांधून एक रुपयाला देखील महाग झालेल्या अवस्थेत त्यांनी मित्रांकडून कर्ज उचलले आणि नव्या उद्योगाची मुहूर्तमेढ रोवली. उद्योग त्या मानाने त्यांना नवा होता. पण सतत काम करून, चिकाटीने त्यांनी उद्योगाचा जम बसवला. त्यावेळी त्यांचे इतर दोन भाऊ देखील त्यांचेबरोबर होते. बिनचूक काम, वक्तशीरपणा ह्यांच्या जोरावर त्यांनी लोकांशी संबंध प्रस्थापित केले. भरपूर ऑर्डर्स मिळवल्या. आज तिन्ही भावांनी तीन वेगळ्या ठिकाणी (मूळ जागेत श्री. सोपारकरांचा भारत उद्योग, ठाण्यालाच वागळे इस्टेटमध्ये मोठ्या बंधूंचा व लालबागला तिसऱ्या धाकट्या बंधूंचा !) स्वतंत्र कारखाने ह्याच कामासाठी उभे केले आहेत. प्रत्येक ठिकाणचा पसारा साधारणतः एवढाच. प्रत्येक ठिकाणची उलाढालही साधारणतः एवढीच, प्रत्येकी ९ लाखांची !

श्री. सोपारकरांना सध्या मुख्यत्वे करून भेडसावणारी अडचण आहे ती कच्च्या मालाची. महाराष्ट्र लघुउद्योग विकास महामंडळाकडे त्यांनी स्वतःची रीतसर नोंदणी करून घेतलेली आहे. तरीही त्यांना कच्चा माल मिळत नाही. काळ्या बाजारात त्याच्या किंमती अवाच्या सव्वा आहेत. ह्यामुळे लघुउद्योग महामंडळाच्या कामाविषयी ते फारसे अनुकूल दिसले नाहीत.... MSFC, MSSIDC, आदी संस्थांकडून अद्याप तरी आर्थिक सहाय्य त्यांनी कधी घेतलेले नाही. आता मात्र काही विस्तार योजनांसाठी, ते महाराष्ट्र बँकेचे सहाय्य घेऊ पाहात आहेत. महाराष्ट्र बँकेचा त्यांचा अनुभव मात्र उत्साहजनक आहे....

" ...मराठी तरुण स्वतंत्र व्यवसायात कमी पडतो. कारण त्याला अंगमेहनतीची, जिद्दीने व्यवसाय यशस्वी करण्यासाठी उभे राहण्याची सवयच नाही..." असे श्री. सोपारकरांचे मत.

५१ वर्षांचे श्री. सोपारकर, त्यांच्या कारखान्यात गेले की, कामावर अजूनही तुटून पडतात. □

# सर्व क्षेत्रात आघाडीवर असणारं व्यक्तिमत्त्व

ठाण्याच्या वागळे इस्टेटमधल्या सतीश इंडस्ट्रीजचे चालक श्री. देसाई हे रबर व्यवसायातली एक अधिकारी व्यक्ती आहेत. स्वास्तिक रबर वर्क्स, कोरुला रबर वर्क्स, इंडियन रबर वर्क्स (कामानी ग्रुप), आय. सी. आय. ह्या ख्यातनाम रबर कंपन्यांतून काम करून, रबरावरील संशोधन करून ते जागतिक मान्यतेचे रबर तंत्रज्ञ झाले. अखील भारतीय रबर उद्योग संघाचे मुख्य पदाधिकारी ह्या नात्यानीही त्यांनी काम केलं आहे. इंस्टिटय़ूट ऑफ रबर टेक्नॉलॉजी, लंडन ह्यांची भारतीय शाखा उघडण्यात त्यांनी पुढाकार घेतला. निरनिराळ्या, आय. एस. आय. आंतरराष्ट्रीय मानद संस्था (ISO) आदि संघटनांच्या कमिटयांवर ते आहेत. शिवाय रोटरी, इंडियन रेडक्रॉस, मराठी विज्ञान परिषद, वगैरेंशी संबंध ठेवून सामाजिक कार्यातही ते पुढाकार घेतात.

अशा तऱ्हेने सर्व क्षेत्रामध्ये धडपडणाऱ्या, रबर क्षेत्रात अधिकारी वाणीने बोलणाऱ्या श्री. देसाई ह्यांनी बऱ्याच उशीरा स्वतंत्र उद्योगात उडी घेतली व त्यात ते यशस्वीही झाले. छोटे हँडप्रेसेस टाकून त्यांनी आपल्या औद्योगिक कारकिर्दीला प्रारंभ केला. आज सतीश इंडस्ट्रीजमधून रबर रिजनरेटींगचे प्लॉट ते चालवत आहेत. हा एक धाडसी प्रयोग असून त्यात ते यशस्वी झाले आहेत. जुनी टायर्स, इतर निरुपयोगी ठरलेले रबरी सामान, ह्यापासून पुन्हा चांगल्या दर्जाच्या



श्री. देसाई

रबराची ते निर्मिती करू शकले आहेत नुसतेच निर्माण करून ते थांबले नाहीत, तर हे पुनःसंपादित रबर ते अमेरिका व मलाया-सारख्या रबराच्या देशांनाही निर्यात करू लागले आहेत. ह्याखेरीज जपानमधून येणाऱ्या मालाच्या पर्यायात रबर फिलेट्सुदेखील ते भारतात बनवू पाहात आहेत. हृदयाच्या शस्त्रक्रियेत अत्यंत महत्त्वाचा Heart Valve बनवण्याच्याही सध्या ते मागे आहेत.

वागळे इस्टेटमध्येच ' सायंटीफीक अँण्ड रिसर्च इंस्टिटयूट ' स्थापून ते देशात रबर तंत्रज्ञ तयार करण्याचेही कार्य करीत आहेत. सध्या सुमारे १०० विद्यार्थी तिथे तयार होत आहेत. ' रबर ' टेक्नॉलॉजीचे शिक्षण देणारे कॉलेजही काढण्याचा त्यांचा विचार आहे...

MSFC कडून सहाय्य मिळवून श्री. देसाई ह्यांचे कार्य उभे आहे. MSFC, MSSIDC ह्यांच्या कार्याची तारीफ करताना श्री. देसाई म्हणाले, ' काही तांत्रिक अडचणीमुळे, कधी कधी ह्या संस्थांकडून सहाय्य मिळायला वेळ लागतही असेल. पण काही अंशी ते अपरिहार्य आहे ! ...' □

[ माणूस चित्रवार्ता १५ मार्च अंकाची प्रसिद्धी कागद टंचाईमुळे स्थगित ठेवली आहे.
निवेदन : साप्ताहिक माणूसच्या पुढील अंकी. —व्यवस्थापक. ]

मुक्काम मुंबई

# बिनामागणीचा संप

मुंबईच्या निवासी डॉक्टरांचा संप सुरू झाला आणि संपला. तब्बल सोळा दिवस हा संप का सुरू झाला हे जसे तमाम मुंबईकरांना कळले नाही, तसाच तो मागे का घेतला हेसुद्धा त्यांना उमगले नाही.

दोन अडीच महिन्यांपूर्वी मुंबई आणि महाराष्ट्रातल्या इतर सर्व निवासी डॉक्टरांनी संप पुकारला. सरकारी आणि महापालिका तसेच नगरपालिकांच्या इस्पितळात काम करणारे निवासी डॉक्टर्स या संपात उतरले होते. बऱ्याच काळानंतर काही मागण्या मान्य होऊन हा संप मिटला. वेतनवाढ, कामाचे कमी तास, निवासाची चांगली सोय इत्यादी मागण्यांकरता झालेल्या संपानंतर पुन्हा दोनच महिन्यांनी संप घडेल असे वाटले नव्हते. पण संप झाला. पहिल्यांदा राज्यव्यापी संपाची घोषणा 'मार्ड' ने केली. पण मुंबई, पुणे, नागपूर ही शहरे वगळता इतरत्र डॉक्टर संपात उतरले नाहीत. त्यातून पुणे आणि नागपूरच्या डॉक्टर मंडळींनी संपाचे हत्यार म्यान करून पुन्हा इस्पितळाचा मार्ग धरला आणि शेवटी संपावर राहिले फक्त मुंबईचे डॉक्टर्स. कसाबसा १६ दिवस संप रेटल्यानंतर आरोग्य मंत्र्यांशी थातूर मातूर बोलणी करून एकदा संप मागे घेतला गेला.

या संपामुळे बरीचशी निवासी डॉक्टर मंडळी रिकामी होती. त्यांच्याबरोबर गप्पा मारायला मिळाल्या. भायखळ्याचे जे. जे. हॉस्पिटल हे संपवाल्या डॉक्टरांचे माहेरघर. 'मार्ड'चे अध्यक्ष डॉ. जॉर्ज मथाई आणि त्यांचे सहकारी इथेच असतात. तिथं गेलो पण मथाई भेटले नाहीत. इतर मंडळी भेटली.

'हा संप कशाकरता ?' –मी.

मग संपाची कहाणी सांगायला सुरुवात झाली. 'दोन महिन्यापूर्वीच्या या डॉक्टरांच्या संपाला बऱ्याच प्रमाणात यश आल्याने इतर राज्यातल्या निवासी डॉक्टरांनी स्फूर्ती घेतली. सर्वांच्या संघटना स्थापन झाल्या. या संघटनांची अखिल भारतीय फेडरेशन तयार झाली. नंतर प्रत्येक राज्यातल्या डॉक्टरांनी आपापल्या मागण्यांकरता संप करायचे ठरवले. दिल्लीकरांनी तर संप पुकारलासुद्धा. म्हणून फेडरेशनने निर्णय घेतला की, सर्वांनी आपापल्या मागण्या मान्य करून घेण्यासाठी एकाच वेळी देशव्यापी संप करायचा. आणि संपाला सुरुवात झाली.'

'पण तुमच्या मागण्या तरी काय ?'–मी

'सध्या आमच्या तरी काहीच मागण्या नाहीत. फक्त या देशव्यापी संपाला पाठिंबा द्यायचा म्हणून आम्ही संप पुकारला.' एकाने माहिती दिली.

तर या डॉक्टरांच्या संपाच्या मागची पार्श्वभूमी अशी आहे. संप चालू असताना अनेक इस्पितळात हिंडलो. बाह्य रुग्ण विभागांपुढच्या आधीच लांब असलेल्या रांगांनी सीमा गाठली होती. गरीब बिचारे रुग्ण, शुश्रुषेची वाट पहात अक्षरश: उन्हात तडफडत होते आणि वैद्यकीय व्यवसाय हे सर्वांत मोठे समाजकार्य आहे, असे सांगणारे हे तरुण डॉक्टर कोणतीही मागणी नसताना संपावर गेले होते.

सेंट जॉर्जेस इस्पितळात गेलो. तिथे बरेचसे काम व्यवस्थित चाललेले दिसले. 'हे कसे काय ?' तिथल्या एका संपवाल्याला विचारले. 'बाहेरून कुमक आणलीय.' 'म्हणजे संप फोडण्यासाठी कारखान्यात बाहेरून कामगार आणतात, तसाच प्रकार की काय ?' मी. 'अगदी तसाच. हा संप फोडण्यासाठी ग्रामीण भागातले डॉक्टर्स आणण्यात आले आहेत.' 'आणि तिथे काय ?' मी.

'आनंद आहे.' उत्तर.

के. ई. एम. इस्पितळात सुद्धा अशीच माहिती संपावरल्या डॉक्टरांनी दिली. शहरातले कामकाज सुरळीत चालले आहे, असे दाखवण्याकरता ग्रामीण भागातले डॉक्टर्स आणण्यात आले, असा आरोप या निवासी डॉक्टरांनी केला.

शीवच्या लोकमान्य टिळक इस्पितळात गेलो. इथले निवासी डॉक्टर्स भाग्यवान समजले जातात. त्यांना रहाण्याकरता अत्यंत पॉश क्वार्टर्स आहेत. जवळ जवळ पंधरा डॉक्टरांचा घोळका कंपौंडला लागून असलेल्या बागेत बसला होता. त्यांच्यात जाऊन बसलो.

'तुमचा संपाला खरोखर पाठिंबा आहे का ?' मी विषयाला तोंड फोडले.

'खरे सांगायचे तर या संपाची काही जरूरी नव्हती असे मला वाटते.' एक महिला डॉक्टर.

'आम्ही मागच्यावेळी संप केला तेव्हा आम्हाला पाठिंबा देण्यासाठी कुणीही बेमुदत संपावर गेले नव्हते. त्यांनी फक्त लाक्षणिक दोन दिवसांचा संप केला. आता त्यांच्या मागण्यांना पाठिंबा देण्याकरता आम्ही दोन दिवस काम बंद केले असते तरी पुरण्यासारखे होते. दुसरा आवाज.

'तुम्हाला संप मान्य नाही, तर त्यात भाग कशाला घेतलात ?' मी.

'अहो, कामावर गेलो तर ब्लॅक लिस्टमध्ये नाव जाणार. संघटनेतून काढून टाकणार. आय. एम. ओ. (इंडियन मेडिकल असोसिएशन)चे सभासदत्व मिळणार नाही. आम्हाला पुढे प्रॅक्टीस करायचीय. कोण करणार विरोध ? म्हणून आपले आम्हीही संपावर.'

या डॉक्टरांच्या संपाची परिस्थिती ही अशी आहे. वैद्यकीय सेवा अत्यावश्यक म्हणून सरकार भरमसाट खर्च करून या विद्यार्थ्यांना शिकवते. पुढे डॉक्टरकी सुरू झाल्यावर ते रुग्णांकडून खोऱ्याने पैसा घेतात आणि समाजसेवेचा टेंभा मिरवतात आणि या मधल्या काळात मात्र बिना मागणीचा संप करून जनतेच्या जिवाशी खेळतात.

–भारतकुमार राऊत


मोफत ! मोफत ! मोफत !

**पांढरे डाग**

"श्वेतारीने" गेली ६१ वर्षे पांढऱ्या डागाच्या रोग्यांना पूर्ण फायदा देऊन संसार सौख्य प्राप्त करून दिले आहे. आपणसुद्धां लावण्याचे एक पॅकेट मोफत मागवून लाभ घ्या. डागाचे वर्णनासह पत्रव्यवहार करा.

**मृत्युंजय सुधा औषधालय, (४०)**
(४०) पो. कतरीसराय (गया)

# ब्रिटिश निवडणुका

वा. दा. रानडे

द्विपक्षीय लोकशाहीचा आदर्श समजल्या जाणाऱ्या ब्रिटनमध्ये नुकत्याच झालेल्या निवडणूक निकालांनी धक्का दिला असून यापुढे तेथे द्विपक्षीय लोकशाही कितपत टिकून राहील याबद्दल शंका व्यक्त केली जाऊ लागली आहे. हुजूर आणि मजूर या दोन मोठ्या पक्षांपैकी कोणालाच निर्णायक बहुमत मिळाले नाही. ब्रिटिश लोकसभेच्या (कॉमन्स) एकूण ६३५ जागांपैकी मजूर पक्षास ३०१, हुजूर पक्षास २९६, लिबरल पक्षास १३ व इतर पक्षांना २४ जागा मिळाल्या. हुजूर पक्षाचे नेते हीथ यांनी लिबरल पक्षाचे सहकार्याने संयुक्त मंत्रिमंडळ स्थापण्याचा प्रयत्न केला पण त्यात त्यांना अपयश आले. आता विल्सन यांच्या नेतृत्वाखाली मजूर पक्षाचे सरकार अधिकारावर आले आहे पण ते किती काळ टिकून राहील याची शंका आहे. विल्सन आपल्या पक्षाच्या कार्यक्रमाबद्दल आग्रह धरतील तर त्यांचे सरकार फार काळ टिकणार नाही. कारण या कार्यक्रमास केवळ हुजूरांचा नव्हे तर लिबरल व इतर छोट्या पक्षांचाही विरोध आहे. पुनः लागलीच निवडणूक घेतली तर लोकमतात फारसा फरक पडत नाही असा यापूर्वीचा अनुभव आहे. पण सत्तेवर राहण्यासाठी आपल्या कार्यक्रमाला मुरड घातली तर दिलेली आश्वासने पुरी केली नाहीत म्हणून जनतेत मजूरपक्षाविरुद्ध असंतोष वाढत जाईल व पुढची निवडणूक जिंकणे विल्सन यांना कठीण जाईल. असा दोन्ही बाजूंनी विल्सन यांच्यापुढे पेच आहे यातून मार्ग म्हणजे कार्यक्रमातील ज्या गोष्टींना फारसा विरोध होण्याचा संभव नाही त्या अंमलात आणण्याचा प्रयत्न विल्सन करतील.

हुजूर किंवा मजूर यापैकी कोणत्याच पक्षाला यावेळी हुकमी बहुमत मिळू शकले नाही. याचे कारण ब्रिटनमध्ये लिबरल व इतर छोट्या पक्षांचे वजन वाढत आहे. यावेळी एकूण मतांपैकी जवळ जवळ २५ टक्के मते या पक्षांनी मिळविली व बाकीची ७५ टक्के हुजूर व मजूर पक्षात जवळजवळ सारखीच विभागली गेली (हुजूर ३८·१, मजूर ३७·३) जागा मजुरांना थोड्या जास्त तर मते हुजूरांना थोडी जास्त. पण तफावत एवढी थोडी आहे की दोन्ही पक्ष तुल्यबळ आहेत असेच म्हटले पाहिजे. निर्णायक बहुमत मिळविण्याइतकी लोकप्रियता मात्र दोन्ही पक्षांची राहिलेली नाही.

हुजूर पक्षाने बहुमत गमावले याची अनेक कारणे आहेत. निवडणूक अनावश्यक होती. खाणी कामगारांशी तडजोड न करता तो प्रतिष्ठेचा प्रश्न करून हीथ सरकारने निवडणूक ओढवून घेतली. ज्या हिशेबांच्या आधारे कामगारांच्या मागण्या फेटाळण्यात आल्या ते हिशेबच चुकीचे असल्याचे नंतर निदर्शनास आल्याने हीथ सरकार अधिकच बदनाम झाले. हुजूर पक्षामधलाच इनॉक पॉवेल यांचा गट संप तडजोडीने मिटविण्यास अनुकूल होता, त्याने या निवडणुकीत सरळ मजूर पक्षास पाठिंबा दिला. हीथ सरकारला तेल पेचप्रसंगाने तीन दिवसांचा आठवडा जाहीर करावा लागला. चलनवाढ रोखण्यात अपयश आले पक्षाच्या नेत्यांचा जनतेशी संपर्क राहिला नाही. मुख्य कचेरीत बसून ते धोरणे आखीत. लोक अतिरेकी कम्युनिस्टांच्या प्रभावाखाली जाऊ लागले आहेत. प्रत्येक ट्रेड युनियनवाला कम्युनिस्ट आहे असा प्रचार त्यांनी केला. ही वस्तुस्थिती नाही हे मतदारांना माहीत होते. त्यांनी हुजूरांना निर्णायक बहुमत मिळविण्याइतका पाठिंबा दिला नाही.

मजूरपक्षाच्या बाबतीतसुद्धा तसेच घडले. तो पक्ष अधिकारावर येऊनसुद्धा परिस्थितीत फारसा फरक पडेल असे मतदारांना वाटत नव्हते. मजूर पक्ष नावालाच समाजवादी राहिलेला आहे. राष्ट्रीयीकरणाचे क्षेत्र वाढविण्याबद्दल त्याचा आता आग्रह राहिलेला नाही. उद्योगधंद्यांवर समाजाची मालकी प्रस्थापित करण्यापेक्षा सरकारी नियंत्रण पुरेसे आहे अशी त्या पक्षाची अलीकडची भूमिका आहे. क्रांतिकारक समाजपरिवर्तनाची भूमिका मजूर पक्षाने केव्हाच सोडली असून तो सुधारणावादी झाला आहे. मजूर पक्ष अधिकारावर आल्याने केवळ सरकार बदलते, समाजव्यवस्था बदलत नाही. समाजावरील भांडवलदारवर्गाची पकड कायम राहते असा अनुभव पूर्वीच्या मजूर सरकारांच्या कारकिर्दीत आला असून यावेळीही काही निराळे घडणार नाही.

भारताची घटना आपण मुख्यतः ब्रिटिश लोकशाहीचा आदर्श पुढे ठेऊन तयार केली ब्रिटिश लोकशाहीप्रमाणेच ब्रिटिश समाजवादाचाही आपल्यावर पगडा आहे. इंदिरा समाजवादाचा तोंडवळा मजूर पक्षाच्या समाजवादापेक्षा फारसा निराळा नाही. भारतात मजूर पक्षाच्याच धर्तीचा लोकशाही समाजवाद आपले राज्यकर्ते आणू पहात असतील तर त्यामुळे जनतेचे समाधान होणार नाही. लोकशाही समाजवादाचे मूळ उद्दिष्ट चांगले आहे पण लोकशाही मूल्यांच्या रक्षणाच्या नावाखाली भांडवलदारी हितसंबंधांचेच रक्षण केले जाऊन समाजवादाच्या रोखाने प्रगती कुंठीत होत नाहीना, याची दक्षता घेतली पाहिजे. ब्रिटिश मजूरच्या बाबतीत तसे घडले आहे. भारतातील विशिष्ट परिस्थिती व समस्यांचा विचार करून येथील लोकशाही समाजवादाचे स्वरूप आपणास ठरवावे लागेल. ते ठरविताना त्याला ब्रिटिश समाजवादाप्रमाणे सुधारणावादाचे विकृत वळण येऊ न देण्याची दक्षता घेतली पाहिजे. समाजवाद आणि लोकशाही या दोन्ही मूल्यांची जपणूक करून समाजवादी चळवळ पुढे कशी न्यावयाची याचा फारसा खोलवर विचार आपल्याकडे झालेला नाही.

ब्रिटिश निवडणुकांनी उपस्थित केलेला आणखी एक महत्त्वाचा प्रश्न म्हणजे निवडणूक पद्धतीच्या सुधारणेचा. लिबरल पक्षाला मते २० टक्के मिळाली पण जागा फक्त १३ मिळाल्या. मतदानाच्या प्रमाणात प्रतिनिधित्व मिळाले पाहिजे, अशी त्या पक्षाची रास्त मागणी आहे. प्रमाणशीर प्रतिनिधित्वाची पद्धती ब्रिटनने स्वीकारावी असा आग्रह तो धरणार आहे. आपली निवडणूक पद्धती ब्रिटिश पद्धतीवरच आधारलेली आहे. मते व जागा यांच्या व्यस्त प्रमाणामुळे विरोधी पक्षांना लोकसभा आणि विधानसभामध्ये मतांच्या प्रमाणात प्रतिनिधित्व मिळत नाही. हा अनुभव आतापर्यंतच्या निवडणुकात आपल्याकडेही आलेला आहे. तेव्हा सध्याची सदोष निवडणूक पद्धती बदलून प्रमाणशीर प्रतिनिधित्वाची पद्धती स्वीकारण्याची मागणी आपल्याकडेही सर्व लोकशाहीवादी पक्षांनी करणे आवश्यक आहे. □ □

# तरुण छायाचित्रकार
# राजेंद्र भंडारे

अहमदनगरचे जिल्हाधिकारी म्हणून नुकतीच कार्यसूत्रे हाती घेतलेले श्री. व्ही. सुंदरम् यांची अहमदनगरच्या रेस्ट हाऊसमध्ये अचानक भेट झाली. जिल्हाधिकारी म्हणून अहमदनगरला येण्यापूर्वी श्री. सुंदरम् हे पश्चिम महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाचे कार्यकारी संचालक म्हणून काम पाहात होते. अजूनही काही दिवस त्यांच्याकडे तो कार्यभार आहेच.

संभाषणाच्या ओघात श्री. सुंदरम् ह्यांनी अहमदनगरच्या एका तरुण मुलाच्या व्यवसायाचा उल्लेख केला. वयाची वीस वर्षे जेमतेम पुरी झाली असलेला हा छोकरा शासनाच्या सुशिक्षित बेकारांना सहाय्य देण्याच्या योजनेच्या अंतर्गत आता स्वतंत्र व्यावसायिक बनला असून अहमदनगर शहरात छाया चित्रकार म्हणून उमेदीने वावरू लागला आहे. दरमहा ८०० ते ९०० रुपयांचा व्यवहार तो आताच करीत आहे. खर्चवेंच वजा जाता त्याला मासिक अडीच तीनशे रुपयांचा फायदा होतो. अशा ह्या तरुणाचे नाव आहे श्री. राजेंद्र गोविंदराव भंडारे.

अहमदनगर शहराच्या दिल्ली दरवाजाकडील भागात गावाच्या जवळ जवळ एका टोकास श्री. भंडारे यांचे घर आहे. प्रत्यक्ष गाठ घेऊन जातीने चौकशी करावी म्हणून दुसरे दिवशी सकाळीच श्री. भंडारे यांच्या घरी गेलो. लहानग्या चणीचा परंतु चुणचुणीत दिसणारा राजेंद्र स्वतःच सामोरा आला. हा एवढासा छोकरा स्वतःच्या जबाबदारीवर स्वतंत्र व्यवसायात पडला आहे ह्या गोष्टीचे साश्चर्य कौतुक वाटले.

## आजोळचा वारसा

राजेंद्रचे वडील स्वातंत्र्य चळवळीत हिरिरीने भाग घेतलेले राष्ट्रीय बाण्याचे गृहस्थ आहेत. सध्या ते अहमदनगर एज्युकेशन सोसायटीच्या न्यू इंग्लिश स्कूलमध्ये हिंदी शिक्षक म्हणून काम करतात. राजेंद्रच्या मामांचा व्यवसाय छायाचित्रणाचा. श्री. मोहन आबाजी वावधनकर असे त्यांचे नाव. पुण्यात हडपसरला त्यांचा फोटोग्राफीचा व्यवसाय होता. स्वतःचा स्टुडिओ होता. मुद्रीत आजोळी आलेला राजेंद्र लहानपणापासून ह्या स्टुडिओत लुडबुड करीत रहायचा. तेव्हापासूनच त्याला ह्या व्यवसायाचे आकर्षण वाटू लागले. प्रारंभीचे काही धडे त्याने आपल्या मामाकडेच घेतले.

चौदा ऑगस्ट १९५३ रोजी जन्मलेल्या राजेंद्रने १९७० च्या मार्चमध्ये झालेल्या शालांत परीक्षेस बसून यश संपादन केले. परंतु त्या परीक्षेसाठी त्याने इंग्रजी व गणित हे विषय घेतले नसल्याने एस्. एस्. सी. नंतर आता पुढे काय असा प्रश्न निर्माण झाला. इंग्रजी, गणित नसले तरी राजेंद्रचे ड्रॉइंग मात्र पूर्वीपासूनच चांगले होते. अशा वेळी चित्रकलाबरोबरच त्याच्या मनातील छायाचित्रणकलेच्या आवडीनेही उचल घेतली. आणि तंत्रशिक्षण परीक्षा महामंडळाचे छायाचित्रण विषयक प्रमाणपत्र मिळविण्याच्या दृष्टीने अभ्यास करण्यासाठी तो पुण्यात दाखल झाला. येथील गोडबोले फोटोग्राफिक स्कूलमध्ये त्याने छायाचित्रणाचे सांगोपांग शिक्षण घेतले आणि जून १९७२ मध्ये फोटोग्राफीच्या एक वर्षाच्या प्रमाणपत्र परीक्षेत तो द्वितीय श्रेणीत यशस्वी झाला.

## सुशिक्षित बेकारांच्या मेळाव्यात

छायाचित्रणकलेचे शिक्षण घेऊनही घरच्या बेताच्याच परिस्थितीमुळे राजेंद्रला पुरेसा वाव मिळेना. एक-दोन खाजगी स्टुडिओत त्याने कामे केली. पण मन स्वतंत्र व्यवसायाकडे ओढ घेत होते. आशावेळी योगायोगानेच जुलै १९७३ मध्ये शासनाच्या उद्योग विभागातर्फे अहमदनगरला भरविण्यात आलेल्या सुशिक्षित बेकाराच्या मेळाव्यास राजेंद्र हजर राहिला. सुशिक्षित तंत्रज्ञांना शासन ह्या योजनेखाली कोण कोण सहाय्य देते ह्याची माहिती त्या मेळाव्यात संबंधित अधिकाऱ्यांनी उपस्थितांना करून दिली. झाले, राजेंद्रने तेथल्या तेथेच आपला अर्ज करून दिला.

उद्योग अधिकाऱ्यांनी राजेंद्रला त्याच्या संकल्पित व्यवसायाचा संपूर्ण आराखडा व त्यासाठी हवी असलेली आर्थिक मदत आदी गोष्टींची तपशीलवार माहिती देण्यास सांगितले व ती प्राप्त होताच त्याचा प्रस्ताव पश्चिम महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाने आपल्या भक्कम शिफारशीसह तो अहमदनगरच्या सेंट्रल बँक ऑफ इंडियाकडे कर्ज मंजुरीसाठी पाठविला.

प्रस्तावात कॅमेरा खरेदीविषयी तरतूद होती. परंतु आयात निर्बंधामुळे त्यासाठी कोटेशन्स मिळविणे वगैरे अडचणी होत्या. छोट्या राजेंद्राने स्वतः बँकेच्या मॅनेजरची गाठ घेऊन त्यांना अडचण सांगितली. मॅनेजरनी सहानुभूतिपूर्वक विचार करून कॅमेरा प्रस्तावातून वगळला आणि इतर साधन सामग्रीच्या खरेदीसाठी राजेंद्राचा साडेतीन हजार रुपयांचा प्रस्ताव मान्य करण्यात आला. सेंट्रल बँकेने ह्यापैकी ७५ टक्के रक्कम कर्ज म्हणून दिली. पश्चिम महाराष्ट्र विकास महामंडळाकडून गॅरंटी देण्यात आली. शिवाय एकूण प्रस्तावाच्या रकमेच्या दहा टक्के रक्कमही मंजूर करण्यात आली.

अशा रीतीने मिळालेल्या रकमेतून राजेंद्रने के. वी. कंपनीचा एनलार्जर, फ्लॅशगन, ग्लेझिंग मशीन, कटर, केमिकल्स, कागद, कपाट आदी वस्तू विकत घेतल्या. रॉलीकॉर्ड कंपनीचा एक जुना कॅमेरा स्वतःच्या खर्चाने विकत घेतला.

सध्या राजेंद्र आपल्या राहत्या घरीच काम करतो. रात्रीच्या वेळी समोरच्या छोट्या खोलीचे रूपांतर डार्करूममध्ये केले जाते. परंतु त्याने आता घराजवळच एक वेगळी स्वतंत्र खोली भाड्याने घेतली आहे. लवकरच तेथे तो आपली डार्करूम सुरू करणार आहे.

## कर्जफेडीस सुरुवात

वस्तुतः नियमानुसार राजेंद्राला कर्जफेडीचा पहिला हप्ता मे १९७४ मध्ये द्यावयास हवा होता व तेथून पुढे दरमहा कर्जाची परतफेड सुरू होणार होती. परंतु राजेंद्राने एवढी वाट पाहिलेली नाही. डिसेंबर १९७३ मध्ये त्याने आपल्या व्यवसायास सुरुवात केली आणि फेब्रुवारी १९७४ मध्येच कर्जफेडीचा ७५ रु.चा पहिला हप्ता चुकता केला.

आज राजेंद्र दरमहा ८०० ते ९०० रुपयांची छायाचित्रणाची कामे करतो. त्यात त्याला मासिक तीनशे रुपयापर्यंत निव्वळ नफा मिळतो. कागद, रोल्स व अन्य साहित्यांच्या किंमती भरमसाट वाढल्याने नफ्याचे प्रमाण कमी असल्याचे राजेंद्राने सांगितले.

अहमदनगरची बहुतेक सर्वच वृत्तपत्रे राजेंद्राची छायाचित्रे छापतात. शिवाय पुण्याचे दै. सकाळ, नाशिकचे दै. गावकरी आणि साप्ताहिक रसरंग, तसेच मुंबईचे साप्ताहिक ब्लिट्झ ह्या नियतकालिकातूनही त्यांची छायाचित्रे छापली जातात. जिल्हा परिषद, शाळा व कॉलेजे विविध खाजगी संस्था ह्यांच्याकडूनही त्याला नियमित काम मिळू लागले आहे.

□ □



# श्री. भाऊसाहेब नेवाळकर यांची मुलाखत

प्रतिनिधी

महाराष्ट्र लघुउद्योग महामंडळाचे अध्यक्ष श्री. ग. बा. नेवाळकर ह्यांना भेटायला मी गेलो. महाराष्ट्राच्या यापुढील विकासात लघुउद्योगाचे स्थान महत्त्वाचे आहे. प्रादेशिक विषमताही नष्ट करायची असेल, तर त्या त्या विभागातल्या नैसर्गिक साधन संपत्तीचा पुरेपूर उपयोग करून घेऊन, स्थानिक कला-कारागिरीच्या विकासातून स्थानिक उद्योजकांना प्रोत्साहन देऊन कुटीरोद्योग, लघुउद्योग अविकसित भागातून वाढवले पाहिजेत. ह्या सूत्राचा पाठपुरावा मला लघुउद्योग महामंडळाच्या अनेक पदाधिकाऱ्यांना भेटल्यावर चालू असलेला मला आढळला. सर्वश्री पानवलकर, भेंडे, कर्णिक आणि कार्यकारी संचालक श्री. मंडलेकर–ह्या सर्वांशी बोलताना लघुउद्योग महामंडळाचे इतर कार्यक्रम सुरू असले तरी, वरील सूत्राचा पाठपुरावा करून त्या नुसार पावले टाकण्याच्या दृष्टीनेही अनेक कार्यक्रमांची आखणी चालू असल्याचे मला जाणवले. शेवटी औद्योगिक विकास, लघुउद्योगाचे जाळे हे सारे माणसासाठी आहे. त्याचा विकास हे ध्येय ह्या साऱ्या कार्यक्रमात प्रमुख असले पाहिजे. अविकसित प्रदेशातला ' माणूस ' हाच त्यामुळे ह्या साऱ्या धडपडीचा केंद्रबिंदु असला पाहिजे; हेही सूत्र प्रकर्षाने मला गवसले. हेच सूत्र धरून मी श्री. नेवाळकरांच्या चेंबरमध्ये प्रवेश केला. एकदा सुरुवात झाल्यावर भाऊसाहेब, सतत दोन तास बोलत होते. लघुउद्योग विकास महामंडळाची कार्यपद्धती, लघुउद्योगांचे समाजातले स्थान, ह्या साऱ्याशी निगडीत असलेला माणूस...भाऊसाहेब बोलत होते. माझ्या मनातल्या प्रश्नांना आपोआपच उत्तरे मिळत होती. मी प्रश्नही न विचारता...

'...विकास प्रक्रीयेत लघुउद्योगांचे स्थान निर्विवाद आहे. आणि ह्या एकूणच प्रक्रीयेत माणूस महत्त्वाचा आहे. हा माणूस जर अविकसित अथवा अर्धविकसित असेल तर त्यामुळे आर्थिक विकासाची साधनेही पांगळी ठरतात. विकास प्रक्रियेत मनुष्य हा इतर कुठल्याही बाबींपेक्षा अधिक महत्त्वाचा व निर्णायक घटक आहे. त्यामुळे जेव्हा माणसात परिवर्तनाची इच्छा निर्माण होते तेव्हाच आर्थिक विकास गती घेऊ लागतो. इतर बाबी अगदी महत्त्वाच्या असल्या तरी, आनुषंगिक आहेत. इतर साधने पुरेशी असतील, पण आवश्यक ती मानवी इच्छाच नसेल तर आपण कोणत्याही दिशेने आगेकूच करू शकणार नाही. थोडक्यात, विकास अभिलाषेची निर्मिती हा निर्णायक घटक असून तोच आर्थिक विकासाला गती देतो. एकदा अशा प्रकारच्या इच्छेची निर्मिती झाली की मग तिचे आर्थिक विकासाच्या तत्त्वाशी सांधे जुळवून सूत्रबद्ध कार्यक्रमाचे नियोजन केले पाहिजे; व त्याची योग्य प्रकारे अंमलबजावणी केली पाहिजे. भारतातील सध्याच्या विभागीय व उपविभागीय नियोजन प्रणालीशी सुसंगत अशा आर्थिक विकासास गतिमानता देणाऱ्या सात तत्त्वांचा मी नेहमी पुरस्कार करतो.

ही सात तत्त्वे अशी :–

१. आर्थिक विकास परिवर्तनाच्या भावनेशी निगडीत असतो; स्वावलंबनासाठी विकासाची निकड व कडक शिस्त पाळण्याची तयारी यातूनच ही भावना स्पष्ट होते.

२. विविध परस्परविरोधी उद्दिष्टे असलेल्यांकडून येणाऱ्या जोरदार मागण्यांमध्ये उचित व जवळिकीचे संबंध स्थापन करण्याच्या क्षमतेच्या प्रमाणावर आर्थिक विकासाची गती अवलंबून असते.

३. औद्योगिक आकाराचे अर्थशास्त्र ओळखून व अशा अर्थशास्त्राचा आग्रह धरून तसेच त्यानुसार योग्य तंत्रज्ञान निवडून अर्थव्यवस्थेची पुनर्रचना करण्याच्या व त्याद्वारे भांडवल व श्रमशक्ती दरम्यानचा काल्पनिक अथवा वास्तविक संघर्ष कमी करण्याच्या पात्रतेवर आर्थिक विकास अवलंबून असतो.

४. आर्थिक विकासाची वाटचाल प्रशासकीय पात्रतेच्या व इच्छाशक्तीच्या प्रमाणात, तसेच सामाजिक, शैक्षणिक, आर्थिक, वित्तीय, तांत्रिक, वितरणविषयक व इतर सर्वांगीण पायाभूत सोयींच्या दिशेने होत असते.

५. स्थानिक उद्योजगतेच्या शक्ती व प्रकृतीनुसार आर्थिक विकास आकार घेऊ लागतो व वृद्धिंगत होत जातो; तसेच त्याची गती उद्योजकता निर्मितीच्या प्रमाणात व उद्योजकातील सामाजिक जबाबदारीची जाणीव, संशोधनवृत्ती व व्यवस्थापकीय पात्रतेवर अवलंबून असते.

६. व्यापार समतोलाची स्थिती आर्थिक विकासास निर्णायक स्वरूप देत असते.

७. आर्थिक विकास, राष्ट्रीय बचतीशी व राष्ट्रीय अग्रक्रमांशी तसेच सामाजिक न्याय, आर्थिक स्थैर्य व राष्ट्रीय सुरक्षिततेवर आधारित, वास्तविक गरजांशी सुसंगत अशा राष्ट्रीय गुंतवणुकीशी निगडीत असतो.

'माणूस व त्याचा विकास हे लक्ष्य ठेवून आर्थिक विकास साधायचा असेल तर नियोजनाची तंत्रे वर दिलेल्या सप्तसूत्रीवर आधारीत असली पाहिजेत. विकास ही सर्वार्थाने सामाजिक व आर्थिक व्यवस्थापनाशी संबंधित बाब आहे. भारतात आतापर्यंत सामाजिक बाबींपेक्षा आर्थिक बाबींवरच भर दिला जात असे, व आजही बहुतांशी तेच चालू आहे. सामाजिक जागृतीची पुरेशी काळजी घेण्यात आली तर आर्थिक विकास आपोआपच आकार घेऊ लागेल.

...एखाद्या समाजात उद्योजक किती आहेत ह्यावर त्या समाजाच्या आर्थिक, सामाजिक प्रगतीची कल्पना येऊ शकते. सामाजिक जागृतीची पुरेशी काळजी घेऊन नियोजन करण्यात आले तर, बोटावर मोजण्याएवढ्या थोड्याशा धनिक उद्योजकांऐवजी, अविकसित प्रदेशातूनही उद्योजक उभे राहू शकतील. आणि असे छोटे छोटे उद्योजक उभे राहताना जे उद्योग उभे करणे शक्य होऊ शकेल ते कुटिरोद्योग किंवा लघुउद्योगच असतील. ह्या उद्योगांमध्ये कुठल्याही प्रकारचे धक्के सहन करण्याची ताकद नसते. लहानशा धक्क्यानीही हे लघुउद्योग उन्मळून पडायची शक्यता असते. लघुउद्योगांचा एक तौलनिक अभ्यास पीअर्सन ह्यांनी 'यूनो'च्या समितीमार्फत केला आहे. त्यांच्या अहवालात त्यांनी असे नमूद केले आहे की, 'प्रगत देशांमध्ये लघुउद्योगाचे बंद पाडण्याचे प्रमाण दोन टक्के आहे तर भारतादी अविकसित राष्ट्रांमध्ये हेच प्रमाण (Mortality rate) ४० ते ६० टक्के आहे.'

'ही वस्तुस्थिती लक्षात घेतली तर उद्योजक शोधले गेले, लघुउद्योग उभारले गेले तरी ते मजबूत पायावर स्थिर होणे आवश्यक आहे. भारतासारख्या अविकसित देशामध्ये तर हे फार आवश्यक आहे. उद्योगधंदे बंद पडण्याचे प्रमाण असेच मोठे राहिले तर त्यामुळे नवीन उद्योजकांमध्ये नैराश्य निर्माण व्हायची शक्यता आहे. म्हणूनच आपल्या देशात, ह्या लघुउद्योगांना आवश्यक ते स्थैर्य प्राप्त करून द्यायची जबाबदारी शासनाने आणि शासनाधिष्ठित अन्य संस्थांनी, महामंडळांनी उचलली पाहिजे, असे मला वाटते. लघुउद्योग महामंडळातर्फे आम्ही असे प्रयत्न सुरू केले आहेत. ते परिपूर्ण नाहीत, ह्याची मला जाणीव आहे. पण तरीही आमचे प्रयत्न चालू आहेत. महामंडळाच्या दहा वर्षांच्या वाटचालीनंतर, लघुउद्योगांना मार्केटिंग, परचेसेस, यंत्रसामुग्री सहाय्य वगैरे सेवा उपलब्ध करून देऊन आज आम्ही प्रत्यक्ष उद्योजक तयार करून अविकसित प्रदेशात लघुउद्योग उभे करायला प्रोत्साहक वातावरण तयार करण्याच्या दिशेने आगेकूच केली आहे...

'मात्र महामंडळाने सुरुवात केली आहे ती उलटच्या दिशेने. महामंडळाची सुरुवात एका अर्थी व्यावसायिक संस्था अशा स्वरुपात झाली. आजही ह्या संस्थेचे हे स्वरूप कायम आहे. अर्थात व्यावसायिक संघटना म्हणून ती यशस्वी करताना, विकास मार्गदर्शक हेही स्वरूप आम्ही त्या संघटनेला दिले. (Promotional Organisation with Commercial Orientation!) त्यामुळे महामंडळाच्या कामाचे स्वरूप सेवात्मक वाटले तरी प्रथमतः ते धंदेवाईकच आहे.

# माणूस हाच विकासाचा आधार

आम्ही आमच्या मंडळाच्या मार्गदर्शनार्थ अंगिकारलेली त्रिसूत्री अशी होती–

१. लघुउद्योगाचा विकास.

२. आधुनिकता–उत्तम प्रशासकीय पाया आणि कर्तव्यनिष्ठ व्यक्ती-निर्माण आणि

३. आर्थिक सुस्थिरता निर्माण करणे.

' ह्या त्रिसूत्रीमुळे आमच्या महामंडळाचा आर्थिक पाया मजबूत करणे आज आम्हाला शक्य झाले आहे. डिव्हिडंड व बोनस घोषित करणारे महाराष्ट्रातले आमचे एकमेव महामंडळ आहे! १९६३–६४ मध्ये, म्हणजे महामंडळाच्या पहिल्या वर्षानंतर, महामंडळाची वार्षिक उलाढाल ८७ लाखांची होती. आज ती वीस कोटींच्या वर गेली आहे! ह्या आर्थिक सुस्थिरतेमुळे आज महामंडळाला अनेक नवनवीन उपक्रम हाती घेणे शक्य होत आहे. खऱ्या अर्थाने लघुउद्योग विकासाला चालना देणे शक्य होत आहे. उद्योजक विकास केंद्र (Entrepreneur Development Clinique), उद्योजकांमार्फत औद्योगिक विकास, तंत्रज्ञान विकास केंद्र (Technology Promotion Centre) लघुउद्योगात आर्थिक भागिदारी, लघुउद्योगविषयक सल्ला देणारे केंद्र (Consultancy Service) वगैरे विविध विकास उपक्रम आज महामंडळ राबवीत आहे. एवढेच नाही, तर अडचणीत सापडलेल्या उद्योगांना ऐनवेळी मदतीचा हात देऊन त्यांना वर काढण्याचाही (Salvage Operation) प्रयत्नही महामंडळ करीत आहे. त्यासाठी वेळप्रसंगी Out of the Way जाऊन, धोका देखील महामंडळ पत्करते. ह्या संबंधात ' भगत आणि भगत ' ह्यांचे उदाहरण फार बोलके ठरण्याची शक्यता आहे. बेली ब्रिजेसऐवजी स्थानिक तंत्रज्ञान वापरून, त्याहीपेक्षा श्रेष्ठ दर्जाचे पूल तयार करण्याची योजना ह्या तंत्रज्ञांची होती. प्रारंभीच्या काळात ह्या तरुण मंडळींना एवढे अडथळे आले की, हा एकूण धंदाच मोडीत निघतो की काय, असे वाटू लागले होते. घेतलेल्या कर्जांच्या परतफेडीचे नाव नव्हते. अशा वेळी ह्या बुडत चाललेल्या धंद्याला मदतीचा हात कुणीही देऊ केला नसता. पण तो आवश्यक होता. साल्व्हेज ऑपरेशन इथे करणे जरूर होते. महामंडळाने तो धोका पत्करला. आर्थिक सहकार्याचा हात पुढे केला. आज हे तंत्रज्ञान पूर्णपणे विकसित झाले आहे. प्रचंड ऑर्डर्स महामंडळाच्या मार्फत त्यांना मिळत आहेत. महामंडळाची बाकी चुकती होऊ लागली आहे. पण त्या आणीबाणीच्या क्षणी जर ह्या तरुण शास्त्रज्ञाला मदतीचा हात मिळाला नसता, तर हा धडपड्या तरुण, धंद्यातून कायमचा उठला असता.

## विस्तार

' लघुउद्योग महामंडळाची सुरुवात मात्र मी ह्याआधी सांगितल्याप्रमाणे, अशा उपक्रमांनी झालेली नाही. आधी प्रायः धंदेवाईक स्वरूप ठेवून महामंडळाची स्थिर आर्थिक पायावर उभारणी झाल्यावरच असे लघुउद्योग विकासाचे कार्यक्रम हाती घेतले गेले. सुरुवातीला हप्तेबंदीने मशिन्स व अन्य साधनसामुग्री पुरविणे एवढेच काम महामंडळाने हाती घेतले होते. बँका, राज्य वित्तीय महामंडळ वगैरे आर्थिक संस्थांच्या सहकार्याने हे काम होत असे. ह्यानंतर लघुउद्योगांना कच्च्या मालाचा साठा मिळविणे जड जात असल्याचे आणि कच्च्या मालाचे दिवसेंदिवस दुर्भिक्ष्य वाढत जात असल्याचे लक्षात आल्यावर, कच्चा माल मिळवून लघुउद्योगांना त्याचा पुरवठा करायचे काम महामंडळाने हातात घेतले. ह्यात महामंडळाने लौकरच आघाडी मिळवली. वेगवेगळ्या ठिकाणाहून हा माल उपलब्ध करण्यासाठी महामंडळाने अनेक मार्ग अवलंबले...

' महामंडळाने ह्यापुढे एक पाऊल टाकून लघुउद्योगांच्या उत्पादनांच्या विक्रीची जबाबदारी घ्यायला सुरुवात केली. लघुउद्योग गटांचे प्रतिनिधी म्हणून त्यांच्यासाठी कच्चा माल खरिदायचा, त्यांच्यातर्फे विविध कामांची टेंडर्स भरायची व त्यांच्यासाठी विविध संस्थांशी कामांचे करार करून अशा लघुउद्योग घटकांना काम मिळवून देणे असे अनेकविध सेवाकार्य महामंडळाने सुरू केले. आज महाराष्ट्रातल्या लघुउद्योग घटकांच्या एकूण खरेदी व्यवहारापैकी ५१ ते ५२% खरेदी महामंडळामार्फत होते. (51/52% of the total small scale purchases!) विक्रीबाबतच्या सहकार्यासंबंधातही महामंडळाची कार्यवाही उल्लेखनीय आहे. ल्युपिन ह्या मुंबईतल्या एका लघुउद्योगामार्फत महामंडळ देशाला आवश्यक एकूण संततीप्रतिबंधक गोळ्यांपैकी ७५% गोळ्या पुरविते. एन्ड्रीन ह्या पेटीसाईड उत्पादनाची कहाणी निश्चित ऐकवण्यासारखी आहे. हे औषधी उत्पादन प्रायः अमेरिका (वेल्सी कॉल कंपनी) व हॉलंड (शेल कंपनी) या देशातून इथे आयात केले जाई. टाटा वगैरे वड्या उत्पादकांचे चार देशी उद्योगही इथे अस्तित्वात होते. ह्यामुळे ह्या मोजक्या कंपन्या आणि वेल्सी कॉल व शेल ह्या कंपन्यांची एन्ड्रीनबाबत मक्तेदारी होती. लघुउद्योग विकास महामंडळाला तिथे शिरकाव करणेही जड होते. पण चिकाटीने तसे प्रयत्न महामंडळाने केले. साठे मिळवले. टेंडर्स भरून पाठवली. शेवटी आस्ते आस्ते महामंडळाला यश मिळत गेले. मक्तेदारी हटत गेली. चार पाच वर्षापूर्वी जे फक्त चारच कारखाने होते त्यांची संख्या आज ४५ आहे. एवढेच नाही तर देशातल्या एकूण उत्पादनापैकी, एन्ड्रीन साठ्यापैकी ७५% उत्पादन ह्या लघुउद्योग घटकांचे आहे. एकूण एन्ड्रीन उलाढालीच्या ७५% उलाढालही आज महामंडळातर्फे होत आहे. ह्या प्रकरणात महामंडळाला बऱ्याच जणांशी टक्कर घ्यावी लागली. विशेषतः वड्या उद्योगपतींशी!

' महामंडळाने मग ह्यापुढे जाऊन वेअर हाउसेस स्थापन केली. लघुउद्योगाचे प्रातिनिधीक आयात-निर्यात केंद्र म्हणून त्या उद्योगात उडी घेतली व थोड्याशाच कालावधीत सरकारी मान्यता प्राप्त करून घेतली. महामंडळाच्या ह्या उपक्रमाला दुसऱ्याच वर्षी अत्युत्कृष्ट कामगिरीचे पारितोषिक मिळाले.

' लघुउद्योगाच्या महत्त्वाच्या अशा पहिल्या अंगाची सोय महामंडळाने उपलब्ध करून दिली. हप्तेबंदीने मशिनरी, कच्च्या मालाचे वितरण, तयार मालासाठी बाजारपेठ, आयात निर्यात, वेअर हाऊस वगैरे सोयी उपलब्ध करून देऊन, धंद्याबरोबरच लघुउद्योग विकासालाही महामंडळाने हातभार लावला. एवढे झाल्यावर प्रत्यक्ष लघुउद्योग संचालनातही महामंडळाने सहाय्य केले. त्यासाठी सल्ला देणारी यंत्रणा उभी केली. एवढेच नव्हे तर उद्योगामध्ये आर्थिक जबाबदारी स्वीकारून महामंडळ स्वतः सहभागी झाले. श्री. लांजेकरांचे कोकण कॅनिंग, पुण्याला श्री. साळुंख्याचा व्यवसाय, औरंगाबादेतला शेतीची अवजारे बनविणारा प्रभूलोकर ह्यांचा प्रकल्प

कारखाना, सिद्रीची श्री. धारकरांची सायनामाईडची फॅक्टरी किंवा वाडचाचा वेस्ट एण्ड बॉबीन्स प्रा- लिमिटेड हा कोपीकरांचा उद्योग-ही अशा भागिदारीची (Equity Participation) काही उदाहरणे ! आज हे सर्व व्यवसाय वेगवेगळचा क्षेत्रात व स्थानिक उद्योजकांचा आधार घेऊन उभे आहेत. वाडचाचा व्यवसाय मुख्यतः तिथले आदिवासीच सांभाळीत आहेत हे कुणाला खरंही वाटणार नाही...

'आणि एवढी सर्व पूर्वतयारी झाल्यानंतर आज आम्ही उद्योजक निर्मितीकडे वळत आहोत. आज जे उद्योजक आम्ही आमच्या ठिकठिकाणच्या शिबिरातून तयार करू त्यांच्यासाठी आमच्या महामंडळाच्या सर्व सेवा आज सुसज्ज तयार आहेत. ह्या उद्योजकांना संपूर्ण मार्गदर्शन तर मिळेलच, पण त्यांच्या अडचणीच्या काळी मदतीचा हातही देण्याचे सामर्थ्य आज महामंडळाला नक्कीच प्राप्त झाले आहे. महामंडळाच्या सदस्यात, कर्मचाऱ्यात आज विकासाची मी सुरुवातीला सांगितलेली विचार प्रणाली रुजवली गेली आहे. नव्याने येणाऱ्या उद्योजकांना त्याचाही चांगलाच फायदा मिळू शकेल. म्हणूनच दहावर्षांच्या या वाटचालीत आम्ही बरंच काही साधू शकलो आहोत असे मला वाटते. व आता उद्योजकाच्या दृष्टीने हालचाल करायला हरकत नाही असे वाटते. चंद्रपूरला ह्याचदृष्टीने पहिले उद्योजकता विकास शिबीर (Entrepreneur Development Clinique) भरविले नी यशही चांगले मिळाले...

'...ह्याच्या पुढची पायरी म्हणजे लहानातला लहान उद्योजक शोधून काढून त्याला त्याच्या परंपरागत कारागिरीसाठी यंत्राची जोड देऊन त्याचा व्यवसाय वाढवायचा ही आहे. हा उद्योजक म्हणजे गावातला कारागीर (Artisan) असेल– रंगारी, लोहार, चांभार, सुतार वगैरे वगैरे. उद्याचा खराखुरा उद्योजक हाच असेल. एक साधे उदाहरण सांगतो. गेला दुष्काळ अतिशय भीषण गेला. ठिकठिकाणी, दुष्काळाची तीव्रता कमी करण्यासाठी दुष्काळी कामे सरकारने काढली. ह्यासाठी कुऱ्हाडी, कुदळी, फावडी, घमेली वगैरे अवजारांची मोठचा प्रमाणावर सरकारला आवश्यकता होती. ही अवजारे सरकारला हवी होती तीही छोटचाशा कालावधीत. अनेकाकडे प्रयत्न करून करून सरकार शेवटी MSSIDC कडे आले. आम्ही जबाबदारी स्वीकारली. कच्चा माल मिळवला व तो आम्ही गावोगाव विखुरलेल्या लोहारांना, सुतारांना वाटून दिला. आश्चर्य वाटेल, पण बडचा कारखानदारांनाही न जमणाऱ्या वेगाने आम्ही ही अवजारे सरकारला वेळेवर उपलब्ध करून देऊ शकलो. केवळ ह्या छोटचा कारागिरांच्या जोरावर !

## महत्त्वाचे सूत्र

'अंडरवेअर्स, मोजे वगैरे गोष्टी ही अशाच पद्धतीने युद्धकाळात आम्ही पुरवल्या आहेत. आजही व्यापारी उपयोगासाठी हा उपक्रम आम्ही चालू ठेवला आहे. ह्या उपक्रमासाठी आम्ही निवडून काढलेले उद्योजक म्हणजे काही असहाय्य किंवा गरजवंत स्त्रिया आहेत. कापड आम्ही त्यांना उपलब्ध करून देतो. शिवणयंत्रे आमच्या योजनेखाली त्यांना पुरवली गेली आहेत. त्यांच्याकडून शिवून घेऊन हा माल आम्ही कंपन्यांना, सैन्याला पुरवतो. कापडही पुरवीत असल्याने त्यांचा भांडवली खर्च जवळ जवळ शून्य आहे...

'ह्या साऱ्या धडपडीमागे माणूस ओळखायचा ही मुख्य भावना आहे. असली पाहिजे. त्यातही अविकसित किंवा अर्धविकसित मनुष्य हा गाभा ठेवून त्याच्याभोवती विकासाच्या योजना आखल्या गेल्या पाहिजेत. हे सूत्र महत्वाचे आहे...' दोन तासांच्या प्रदीर्घ गप्पामध्ये, चहाचा दुसरा कप संपवताना भाऊसाहेब म्हणत होते.

दोन तासांच्या चर्चेत भाऊसाहेबांनी अनेक किस्से सांगितले. अनेक घोडचूका केल्याचे मान्य केले. पण त्याचबरोबर अनेक नवे उद्योग, नव्या कल्पना धोका पत्करून देखील फुलवल्याचे सांगितले. ...शेवटी बिझिनेस हा देखील आम्हा सर्वांना तसा नवीनच प्रांत होता. काही ठिकाणी ठेचाळणे, अडखळणे हे त्यामुळे अपरिहार्यच होते. पण त्यातून मार्ग काढीत, काही ना काही नवीन शिकत आम्ही पुढेच जात गेलो. आजही आम्ही परिपूर्ण नाही. पण पुढे जायचे, नवेनवे प्रयोग करून उद्योग वाढवायचा ही आमची दृष्टी आहे... त्यातूनच देशासाठी काही करता येईल ही आमची धारणा आहे. लघुउद्योग आणि त्याच्या मुळाचा माणूस ह्यांच्या विकासाचे चक्र म्हणूनच फिरते राहिले पाहिजे... सतत फिरते राहिले पाहिजे...'

भाऊसाहेबांकडची रंगलेली मुलाखत आटोपता आटोपता आठ वाजायला आले होते. दहा वाजता परळहून चिपळूणची गाडी गाठायची होती. रत्नागिरी जिल्ह्याच्या औद्योगिकरणाची प्रगती प्रत्यक्ष पाहाण्याच्या दृष्टीने !

□ □

### उद्योगशील आदिवासी

भंडारा जिल्ह्यातील ब्रह्मपूरा येथील शिपायाची नोकरी करणाऱ्या श्री. काशिनाथ आमले या आदिवासी गृहस्थाने कुणाचेही आर्थिक साहाय्य न घेता स्वतःच्या परिश्रमाने मिळवलेले ५१,००० रुपये भांडवल खर्च करून राईस मिल उभारली व तिचे उद्घाटन गेल्या गुढी पाडव्याच्या शुभ मुहूर्तावर झाले.

ह्या उद्योगशील व धडाडीच्या गृहस्थाने प्रथम शिपायाची नोकरी केली. नंतर हॉटेलचा व्यवसाय सुरू केला. त्यानंतर सायकलचे दुकान सुरू केले. त्यापाठोपाठ पोहा मिल सुरू केली. व या सर्व कार्यव्यापानंतर आता अद्ययावत यंत्रसामग्रीनी सुसज्ज अशी 'सुरेश राईस मिल' उभारली. या मिलच्या शेडसाठी लागणाऱ्या विटादेखील त्यांनी खरेदी न करता स्वतःच घरी तयार केलेल्या आहेत. या मिलमध्ये रोज १०० क्विंटल धान्याची पिसाई होऊ शकेल.

# उलटी सुलटी अमेरिका

लेखक : **आर्ट बुकवॉल्ड**

अनुवाद : **अनंत भावे**

## पोहोण्याच्या तलावाची गोष्ट

माझ्या गरिबीविरोधी लढ्याचा एक भाग म्हणून नवीन घेतलेल्या घरात एक पोहोण्याचा तलाव करायचे मी ठरविले. पोहोण्याचा तलाव करवणे ही फार अवघड गोष्ट असते, याची मला कल्पना नव्हती. धंदेवाल्या मंडळीत, कष्टाळूपणाच्या दृष्टीने, मोटार-दलालांच्या मागून तलाववाल्यांचा क्रमांक लागेल. ते सांगतात त्या प्रत्येक गोष्टीवर आपला विश्वास बसू लागतो.

तलाववाल्या एका माणसाला मी भेटायला बोलावले. अशा भेटीगाठीत केवढे शिकायला मिळते याचा चटकन् अंदाज करता येत नाही.

माझे घर आणि भोवतालचा भाग त्याने पाहिला. मग तो म्हणाला, 'मी पोहोण्याचा तलाव देतो बांधून तुम्हाला फक्त ८४०० डॉलर्समध्ये.'

"त्यात सगळं आलं ना,' मी विचारलं.

'अर्थात. सगळं मिळून किंमत सांगितली मी.'

'किंमत जरा जास्त वाटते,' मी म्हणालो, 'पण तरी थोडा त्रास करून देऊ शकेन मी तितकी किंमत. तलाव लांबटचौकोनी हवा मला.'

'लांबटचौकोनी तलाव? मग हे आधी का नाही सांगितलंत. अशा तलावाला ६०० डॉलर्स अधीक पडतील. जमिनीत लांबटचौकोन खणायचं काम फार बिकट असतं.'

'म्हणजे. ९००० डॉलर्स झाले,' मी म्हणालो.

'होय. पण सगळं आलं त्याच्यात. आता माझ्या काही प्रश्नांची उत्तरे द्या.'

'ठीक आहे.'

'तुम्ही तलावात पाणी सोडणार काय?' त्याने विचारले.

'हो तर. तेवढीच गंमत नाही का?'

'पाण्याचे जादा २५० डॉलर्स होतील. असं पाहा, की तलावात पाणी सोडायचं असेल तर आपल्याला नगरपालिकेची परवानगी काढावी लागेल; आणि त्यात पुष्कळ वेळ जाईल.'

'बरोबर आहे. पोहोण्याच्या तलावात पाणी मागायला नको होतं मी.' मी म्हणालो.

'तलावाच्या तळात आणि बाजूला काँक्रीट हवं का तुम्हाला?'

'हो. असलं तर बरं. पण असं कां विचारता आपण?'

'काय आहे की काँक्रीटशिवाय तलावात चिखलाड होते सगळी. आता काँक्रीटचे ३५० डॉलर्स जादा होतील. काँक्रीटशिवाय दुसरं साहित्यसुद्धा वापरता येईल; पण त्याला ५०० डॉलर्स पडतील.'

'काँक्रीट आणि त्या साहित्यात काय फरक आहे?'

'हे नेहमीचं काँक्रीट वापरलं तर तलाव गळू लागेल.'

त्याने सगळे लिहून घेतले.

'आणखी एक गोष्ट विचारतो तुम्हाला?' तो म्हणाला, 'पाणी शुद्ध करायचा विचार आहे का तुमचा?'

'हो, तर. त्याचे काय फायदे आहेत?'

'पाणी शुद्ध केले तर पोहोणाऱ्या मुलांना रोग वगैरे होणार नाहीत. पाणी शुद्ध करायच्या व्यवस्थेसाठी ४५० डॉलर्स अधिक पडतील.'

'मला वाटतं, हा खर्च अनिवार्य आहे,' मी म्हणालो.

'आता तलावातून बाहेर येण्यासाठी ज्या पायऱ्या हव्यात त्यांचं काय?'

'का? पोहणारा माणूस काठावर उडी मारून तलावाबाहेर नाही का येऊ शकणार?' मी विचारले.

'येऊ शकेल ना; पण म्हणजे तलावाचा काठ वेगळ्या पद्धतीनं बनवावा लागेल. त्याला पडतील ५५० डॉलर्स. उलट पायऱ्यांना पडतील २०० डॉलर्स.'

'मग पायऱ्याच द्या आपल्या मला.'

'तलावाच्या भोवती काय करायचं ठरवलं आहे तुम्ही?' त्याने विचारले.

'मला नाही ठाऊक. काय करता येतं तलावाच्या भोवती?'

'आम्ही काँक्रीटचा एक रस्ता बांधून देऊ ना ६७० डॉलर्समध्ये.'

'तुमचं फार नुकसान होणार या कामात, असं मला वाटू लागलं आहे.' मी म्हणालो.

'ते आमचं आम्ही पाहू.' त्याने उत्तर दिले. 'आता तलावातल्या झाडांच्या पानांचं काय?'

'मला नको बाबा झाडांची पानंबिनं त्या तलावात.' काही पैसे वाचतील अशा आशेने

मी म्हणालो.

'झाडांची पानं आम्ही तलावात घालीत नाही;' त्याने स्पष्टीकरण केले. 'आम्ही बाहेर काढतो ती. त्यासाठी ३२० डॉलर्स लागतील. सूर मारायला फळी हवी का तुम्हाला ?'

'ती तर हवीच.'

'त्याचे होतील १००० डॉलर्स,' तो म्हणाला.

'सूरफळीसाठी १००० डॉलर्स ?' मी अविश्वासाने विचारले.

'नुसत्या सूरफळीसाठी नाही काही.' त्याने माहिती पुरवली. तुम्हाला सूरफळी हवी म्हणजे पाणी खोल हवं. मी आतापर्यंत किमती देत होतो त्या उथळ पाण्याच्या तलावाच्या. मला वाटलं तुम्हाला ठाऊक असेल ते.

'माफ करा, चूक झाली माझी,' मी नरमाईने म्हणालो.

हजार डॉलर्सचा आकडा त्याने टिपून घेतला. ◻

# अतिसंहाराची समस्या

अमेरिकेत १९६४ सालच्या निवडणूक मोहिमेत अण्वस्त्रांच्या प्रश्नाला विशेष महत्त्व प्राप्त झाले होते. पुढील दहा वर्षात, शत्रूविरुद्ध किती बॉम्बस् आणि क्षेपणास्त्रे योजावी लागतील, याची चर्चा प्रत्येकजण करीत होता.

रणांगणावरील सेनापतींच्या हातीच अण्वस्त्रे सोपवावी काय, त्याचप्रमाणे साठवलेली अण्वस्त्रे दोस्तराष्ट्रांना द्यावी काय, या प्रश्नांचा विचार जनतेने करावा, असे आवाहन करण्यात येत होते.

या सुमारास प्रोफेसर मॅक्स किलाटन यांना भेटण्याची संधी मला मिळाली. अण्वस्त्रांच्या समस्येवर प्रोफेसरसाहेबांनी पुष्कळ विचार केला होता. त्यांनी काढलेले निष्कर्ष लक्षवेधक होते.

'माझ्या लक्षात आलेली सर्वात महत्त्वाची गोष्ट अशी की रशियन आणि अमेरिकन अण्वस्त्रे चांगलीच प्रभावी असली तरी त्यांची लक्ष्ये मात्र फार लहान आहेत.' प्रोफेसर किलाटन म्हणाले, 'आपल्या बॉम्बना योग्य अशी मोठी लक्ष्ये आपण तयार केली पाहिजेत.'

'मला काही समजत नाही.'

'मी सांगतो; हिरोशिमा आणि नागासाकी यांच्यावर टाकलेल्या अणुबॉम्बपेक्षा पाचदहापट अधिक संहारक असे छोटे बॉम्ब आपल्यापाशी आहेत. मोठे बॉम्ब आणि अस्त्रे तर शंभरपट अधिक संहारक आहेत. परंतु या बॉम्बच्या संहारशक्तीला पुरी पडतील अशी शहरे आपल्यापाशी नाहीत. त्यामुळे एखाद्या शहरावर मोठा बॉम्ब टाकला तर उगाचच तो फुकट जाईल. त्याची भरपाई करण्यासाठी, अधिकाधिक मोठी लक्ष्ये तयार करायची शिफारसच मला कराविशी वाटते.'

'म्हणजे आहेत ती शहरे आणखी मोठी करायची, असंच ना ?'

'अगदी बरोबर,' प्रोफेसरसाहेब म्हणाले, 'आपण शहरविस्ताराचा हा कार्यक्रम ताबडतोब हाती घ्यायला हवा; म्हणजे अत्यंत प्रभावी अण्वस्त्रांचे संहारक्षेत्रदेखील त्यात सामावले जाईल.'

'पण याबाबत रशिया काय पवित्रा घेईल असे तुम्हाला वाटते ?'

'आपण जे करतो तेच रशियाला करावे लागेल. आपली लक्ष्ये त्यांच्याहून मोठी होऊ देणे त्याना परवडण्यासारखे नाही. त्यामुळे त्यांची केवढी नाचक्की होईल.'

'परंतु आधीच साठवलेल्या अण्वस्त्रांना योग्य अशी लक्ष्ये कशी तयार करणार आपण ?'

'आपल्या दोन मोठ्या-मोठ्या औद्योगिक शहरामध्ये नवी केंद्रे उभारून त्यांनी ही शहरे जोडून टाकली पाहिजेत. रशियाने टाकलेल्या अत्यंत प्रभावी क्षेपणास्त्राचा आघात सहन करण्याइतकी मोठी शहरे उभारायला हवीत आपल्याला, उलटपक्षी आपली क्षेपणास्त्रे सामावण्यासाठी त्यांना त्यांच्या शहरांचा विस्तार करावा लागेल.'

'पण याने साधणार तरी काय ?'

'याने अण्वस्त्रांच्यासंबंधीची अतिसंहाराची सर्वात मोठी समस्या सुटू शकेल. तुमच्या बॉम्बच्या संहारक-क्षेत्रापेक्षा जर तुमचे लक्ष्य मोठे असेल तर अतिसंहाराचा प्रश्नच उपस्थित होऊ शकणार नाही. याचा अर्थ असा की जितक्या माणसांना मारण्यासाठी तो बॉम्ब तयार केला असेल तितकीच माणसे त्या बॉम्बने मारली जातील. सध्या असे होते आहे की बॉम्बच्या संहार क्षमतेपेक्षा एकविसांश एवढाच संहार त्या बॉम्बने होऊ शकतो. हे केवढे मोठे नुकसान आहे. यामुळे अण्वस्त्रे निर्माण करणाऱ्या राष्ट्रांच्या अर्थव्यवस्थेवर विनाकारण ताण पडतो.' ◻ ◻



आर्ट बुकवॉल्ड

मी आणि माझा भाऊ या दोघांना आमच्या काकांनी वाढविले. आमचे आईवडील आमच्या लहानपणीच वारले. तेव्हापासून काका आम्हा दोघांना घेऊन धर्मगुरूंसाठी बांधलेल्या, चर्चच्या आवारातल्या बंगलीत रहायला आले. जवळ जवळ गेली अठरा वर्षे ते त्या खेड्यातल्या चर्चमध्ये धर्मगुरूचे काम करीत. हे खेडे अगदीच छोटेसे होते. नॉर्मण्डीच्या मध्यावरील पठारावर वसलेले लहानसे खेडे. सभोवार पाहिले, तर बुंदक्यासारखी दिसणारी शेते पसरली होती. मधून मधून फळबागाही बहरलेल्या दिसायच्या. सबंध कातळावर शेतांच्या कडेकडेने छोट्याशा झोपड्या दिसायच्या. त्याशिवाय गावातल्या मुख्य रस्त्याच्या कडेला फक्त सहा घरे उभी होती. रस्त्याच्या एका टोकाला चर्च अन् दुसऱ्या टोकाला 'टाउन हॉल!' बस्–एवढेच!

माझे अन् माझ्या भावाचे बालपण दफनभूमीवर खेळण्यात गेले. ती जागा तशी फार सुरक्षित होती. काकांच्या पूर्वी तिथे काम करणाऱ्या धर्मगुरूंच्या प्रशस्त थडग्यावर आम्ही तिघेजण बसत असू. तिथे बसून आमचे काका आम्हाला सर्व प्राथमिक शिक्षणाचे धडे देत. आमची स्मरणशक्ती चांगली तल्लख व्हावी म्हणून काकांनी एक युक्ती काढली होती. ज्याच्या थडग्यावर काळे क्रॉस असतील, त्या सर्व मृतांची नावे ते आम्हाला पाठ करायला लावायचे. आमची निरीक्षणशक्ती वाढावी म्हणून ते आम्हाला ही सर्व नावे कधी एका टोकापासून, तर कधी दुसऱ्या टोकापासून, तर कधी मधूनच सुरुवात करून ओळीने म्हणायला लावायचे. आम्ही ती नामावळी घडाघडा म्हणायला लागलो, की खटकन मध्येच थांबवून ते विचारायचे, "ती–ती कबर कुणाची आहे? सांगा बघू! ती–ती तिसऱ्या रांगेतली–क्रॉस जरा डावीकडे झुकलेली? ती कुणाचीआहे?" जेव्हा एखादे दफन होई तेव्हा आम्ही लगबगीने धावत जाऊन वरच्या लाकडी फळीवर काय लिहायचे ठरले असेल ते पाठ करून येत असू. कित्येकदा तर आम्ही तातडीने सुताराकडे जाऊन थडग्यावर कोरलेला सर्व तपशील वाचून येत असू. ते सारे थडग्यावर बसविण्यापूर्वीच आमचे तोंडपाठ झालेले असायचे. मग आमचे काका आम्हाला विचारायचे, "काय रे, हे नवे कोण आहे ते माहीत आहे तुम्हाला?" मग आम्ही म्हणायचो, "होय काका, आम्हाला हे सर्व माहीत आहे." अन् लगेच आम्ही सर्व तपशील अगदी एका दमात म्हणून टाकायचो... "रोझाली गर्ट्र्यूड मलॅण्डेन–या ठिकाणी चिरनिद्रा घेत आहे. थिओडोर मॅग्लोरी कॅसरे यांची ही विधवा पत्नी. मृत्यू त्र्याहत्तराव्या वर्षी. सर्व कुटुंबियांना शोकसागरात लोटून ती गेली. आदर्श कन्या, आदर्श पत्नी, आदर्श माता! तिचा आत्मा स्वर्गात आहे." वगैरे वगैरे–सर्व–बिनचूक!



माझे काका चांगले उंचनिंच, बलदंड होते. त्यांच्या शरिराप्रमाणे त्यांची कल्पनाशक्तीही तशीच सरळसोट होती. सगळ्या प्रश्नांना ठराविक साच्याची रोखठोक उत्तरे द्यायची असा आपला त्यांचा ठामठोक रांगडा प्रकार होता. आवाज होता थेट मेघगर्जनेसारखा! तसल्या त्या दणदणीत आवाजात ते आम्हाला देवाविषयी काहीबाही माहिती सांगत असत. त्यांचा प्रत्येक शब्द इतका ठणकावून यायचा की जणू बंदुकीच्या फैरी झडत आहेतसे वाटावे. त्यांचा देव म्हणजे सत्-चित्-न्याय इ. काही नसायचे–नुसता आपला देव! एखाद्या चोराला पोलिसाविषयी किंवा कैद्याला न्यायाधिशाविषयी जशी धास्ती वाटत असते, तशीच त्यांची देवाविषयीची भावना असावी असे आम्हाला वाटायचे.

त्यांनी आम्हाला अत्यंत कठोरपणे वागविले. आम्हाला प्रेमाची शिकवण देण्याऐवजी नुसते भीतीने थरथर कापायला शिकविले. आम्ही १४–१५ वर्षांचे झालो, तेव्हा त्यांनी आम्हाला एका धर्ममठात शिकायला पाठविले.

# एक चित्रकथा

मूळ लेखक : गाय डी मोपॉसा
अनुवाद : सौ. सुमती देवस्थळे

असा मठ निवडला, की त्यात शुल्क अगदीच यथातथा–कमी दर ! हा मठ तसा आमच्या घराला जवळच होता. खूप प्रशस्त पण भारी उदास अशी इमारत होती ती. त्या पाठशाळेतून तयार झालेले सर्व विद्यार्थी मोठेपणी केव्हा ना केव्हा धर्मगुरू बनणार हे ठरलेलेच होते. बाप रे ! त्या खोलीची नुसती आठवण झाली तर थरकाप होतो ! मासळीबाजारात जसा मासळीचा वास सर्वत्र भरलेला असतो, तसा त्या धर्ममठात सर्वत्र प्रार्थनेचा वास भरलेला असे. छे ! कसली ती भिकार शाळा ! अन् कसले ते कधी न संपणारे धार्मिक समारंभ ! पहाटेच्या कडक थंडीत सामुदायिक प्रार्थना ! मग ते हजार धार्मिक विधी ! ते पोथ्यापुराणांचे पठण ! मग त्या मूक प्रार्थना...अन् मग म्हणे चिंतन–स्तोत्रपठण–अगदी जेवायला बसलो तरीसुद्धा धार्मिक पुस्तकातील उताऱ्यांचे वाचन चालू असायचेच ! बाप रे ! काय ते भकास भिंतीत कोंदलेले दिवस ! तिथे फक्त देवाविषयी चर्चा चालायची ! देव म्हणजे तो आमच्या काकांचा भयंकर स्फोटक देव बरं का !

अत्यंत संकुचित, गूढ आणि अनैसर्गिक अशा प्रकारचे ‘ पावित्र्य ’ आमच्यावर लादलेले होते. अशा त्या अत्यंत उदात्त–परंतु तितक्याच घाणेरड्या अवस्थेत आम्ही तेथे रहात असू. मला अगदी पक्के आठवते आहे की, मुले वर्षातून फक्त तीन वेळा आपले पाय धूत असत. प्रत्येक सुटीच्या आदल्या रात्रीच फक्त हा कार्यक्रम चालायचा. आता आंघोळीविषयी विचाराल तर व्हिक्टर ह्यूगोच्या नावाइतकीच आंघोळही आम्हाला अपरिचित होती. वरवर पहाता आमची शिक्षकमंडळी असल्या गोष्टींचा भारी तिटकारा दाखवीत असत.

मी आणि माझा भाऊ दोघांनीही शाळेतले शिक्षण एकदमच संपविले. नंतर एका सकाळी उठून पहातो, तो खिशात चार पैसे टाकून आम्ही आपले पॅरिसला येऊन थडकलेलो ! अन् वर्षाला १८०० फ्रँक्स पगारावर सरकारी कचेरीत आमची नेमणूक झालेली ! आमची नेमणूक व्हावी म्हणून आपला शब्द खर्च करणाऱ्या आर्चबिशपला खरोखर धन्यवाद! ◻

प्रथम काही दिवस आम्ही शहाण्या मुलासारखे अगदी सरळ वागत होतो. दोघांनी मिळून लहानशी जागा भाड्याने घेतलेली होती. आमची अवस्था घरटे सोडून नुकत्याच बाहेर पडलेल्या चिमुकल्या पक्षांसारखी झाली होती. झळझळीत सूर्यप्रकाशाने डोळे दिपलेले ! मुक्त दशदिशात विहार करताना पुरे गोंधळून गेलेले दोन चिमुकले पक्षी ! ...

पण लवकरच पॅरिसचे एकंदर वातावरण, नवे सोबती आणि रंगभूमीशी असलेला परिचय यामुळे आमच्या मनातला गोंधळ कमी होत गेला. नव्या वातावरणाचा सराव झाला. आणि मग अध्यात्मिक स्वरुपाच्या स्वर्गीय आनंदापेक्षा अगदी वेगळ्याच स्वरुपाच्या आनंदाच्या जाणीवा आमच्या मनात जाग्या होऊ लागल्या. आणि मग... एका संध्याकाळी... पुष्कळ वेळपर्यंत घुटमळल्यावर... पहिल्यांदाच रणांगणावर जाणाऱ्या सैनिकाच्या मनातील धास्ती व अस्वस्थता अनुभवीत आम्ही... आता कसं सांगू ?... आम्ही... आमच्या शेजारी रहाणाऱ्या दोन विक्रेत्या पोरींकडून आमचा शीलभंग होऊ दिला. त्या दोघी नोकरी करायच्या अन् आमच्या शेजारीच रहायच्या.

लवकरच आमच्या दोन्ही बिऱ्हाडात थोडी अदलाबदल झाली. सोयीस्कर असे वाटप झाले. त्या मुलींचा ब्लॉक माझ्या भावाने घेतला, अन् दुसरी माझ्याकडे रहायला आली. माझ्याकडे रहायला आलेल्या मुलीचे नाव होते लुइसा. तिचे वय असेल सुमारे बावीस एक वर्षाचे ! ती ताजीतवानी, प्रसन्न, आनंदी, गोल-गुटगुटीत होती. तिच्या शरीराची गोलाई तर अत्यंत कमनीय अशी होती. एखादी नवी नवरी जशी नवऱ्याप्रमाणेच त्याच्याशी संलग्न असलेल्या घरातील सर्व वस्तूंचा ताबा घेते, त्याप्रमाणेच तिनेही माझा अन् माझ्या खोलीतील सर्व बारीकसारीक वस्तूंचा लगेच ताबा घेतला. सर्व घर अगदी व्यवस्थित लावले. साऱ्या गोष्टी अगदी जागच्या जागी व्यवस्थित रचून ठेवल्या. रोज ती स्वैंपाकपाणी करायची, रोजचा जमाखर्च अगदी अचूक टिपून ठेवायची. आणि त्या शिवाय, मला अपरिचित असलेल्या कितीतरी आनंददायक अनुभवांचा तिने मला परिचय करून दिला होता.

माझा भाऊसुद्धा अगदीमजेत होता. आम्हा चौघांचा रात्रीच्या जेवणाचा बेत एकत्र असे. एक दिवस त्याच्याकडे,तर एक दिवस माझ्याकडे. सगळे कसे अगदी सुरळीत चालले होते. कुठे काळजीकाटा नव्हता ! मधून मधून मला आमच्या काकांची पत्रे यायची. मी आणि माझा भाऊ एकत्र रहात आहोत अशीच त्यांची समजूत होती. ते आपल्या खेडेगावची सर्व हकिकत कळवायचे. त्यांची नोकराणी –नव्यानेच झालेले मृत्यू– पीकपाणी– इत्यादी सर्व तपशील असायचा, अन् त्याच्या जोडीला उपदेशाचे घुटकेही असायचे ! एकंदर जीवनातील संभाव्य धोके, जगाला हलकटपणा, त्यापासून सावधगिरी कशी बाळगावी त्याविषयी सूचना इ. सर्व काही त्या पत्रात असायचे !

ही पत्रे बहुधा सकाळी आठच्या मेलगाडीने यायची, अन् आम्हाला सकाळीच मिळायची. झाडूवाली दाराच्या फटीतून पत्र आत ढकलायची अन् केरसुणीच्या दांडीने आमचे दार ठोकून पत्राची वर्दी द्यायची. पत्र दिसले की लुइसा पटदिशी अंथरुणातून उठून धावायची अन् ते निळे पाकीट घेऊन यायची. माझ्या शेजारी बसून आमच्या काकांचे पत्र ती वाचून दाखवायची. असे सहा महिने अगदी सुखात गेले. ◻

एकदा काय झाले, रात्री एकच्या सुमारास आमच्या दारावरची बेल इतक्या जोराने खणखणायला लागली, की आम्ही अगदी थरकूनच गेलो. आम्ही काही गाढ झोपेत नव्हतो. छे ! त्या क्षणी झोपेच्या अगदी नेमकी उलट परिस्थिती होती.लुइसा म्हणाली, “कोण असेल हो ?” “मला सुद्धा काही कल्पना नाही बुवा !” मी म्हटले “बहुधा कुणीतरी चुकून दार वाजविले असावे.” मग

आम्ही जरा थांबलो, अन् तसेच एकमेकांच्या मिठीत पडून राहिलो. आमचे कान मात्र सर्वस्वी दाराकडे लागलेले होते. अन् मग दाराची कडी दुसऱ्यांदा धडाधडा वाजायला लागली. बेलही वाजत होतीच... अन् पुनः तिसऱ्यांदा... चौथ्यांदा... सबंध खोलीत तो आवाज दुमदुमत राहिला. इतका आवाज की आम्ही तट्कन् उठून बसलो. एवढा आवाज कोणी काही केवळ गैरसमजुतीने करीत नव्हते खास! कोणी का असेना, जे कोणी आले होते, त्याला आम्हालाच भेटायचे होते! मी झटपट कपडे चढविले, पायात सपाता सरकवल्या, अन् बाहेरच्या दाराकडे वळलो. कोणते अनामिक संकट येऊन ठेपले होते ते मला काही समजेना. दार उघडण्यापूर्वी मी विचारले, "कोण आहे? काय पाहिजे!"

बाहेरून चांगला प्रचंड आवाज आला—माझ्या काकांचा. "मी आहे रे जेन—दार उघडना. इथे बाहेर जिन्यातच झोपायचं नाहीये मला."

बापरे! काका! मला अगदी वेड लागायची वेळ आली. पण करायचे काय? मी झट्दिशी बेडरूममध्ये गेलो अन् लुइसाला म्हटले, "काका आले आहेत माझे—लप चटदिशी!'—मग मी बाहेर जाऊन दार उघडले. दार उघडताच काका इतक्या जोरात आत घुसले, की त्यांच्या हातातल्या मोठ्या पिशवीच्या धक्क्याने मी जवळ जवळ कोसळलोच. "इतका वेळ काय करीत होतास रे—ए बावळटा?"—या त्यांच्या प्रश्नावर मला काही बोलणे सुधरेना. थरथरत्या आवाजात आपण झोपलो असल्याचे सांगून टाकले. तशी काका म्हणाले, "पहिल्यांदा झोपला असशील कदाचित, पण आता इथे माझ्याशी बोलून झाल्यावर मग काय करीत होतास रे?"

मी कशी तरी थाप मारली. म्हटले, की दाराची किल्ली माझ्या पायजम्याच्या खिशात होती. अन् मग या संबंधीच्या पुढच्या चौकशा थांबविण्यासाठी मी दोन्ही हात पसरून काकांना अगदी घट्ट मिठी मारली, खूप जोराने त्यांच्या दोन्ही गालाचे चुंबन घेतले.

त्यामुळे काका जरा शांत झाले. त्यांनी आपल्या येण्याचे कारण सांगितले. ते म्हणाले, "ऐकलंस का रे ए बावळोबा, आता मी इथे चार दिवस राहीन म्हणतो." काकांनी आपला मुक्कामाचा बेत जाहीर करून टाकला. "त्याचं काय आहे की खरा नरक कसा असतो, त्याची स्वच्छ कल्पना आसावी म्हणून मी पॅरिसमधल्या नरककुंडातून एकदा डोकावून येणार आहे. एवढे बोलून ते मोठमोठ्याने हसले. त्यांचे ते विकट हास्य म्हणजे वादळी गर्जनाच होती. मग स्वतःवर खूश होऊन काका म्हणाले, "आता माझी झोपायची काय व्यवस्था करतोस ती कर पाहू! लेटून देऊ आता...पण काय रे, तुझा भाऊ कुठे गेला?—झोपलाय की काय? अरे मग उठव ना त्याला—उठव-उठव!

आता मात्र माझी सारी चलाखी संपुष्टात आली. तसेच रेटून मी म्हणालो, "जेवून घरी नाही आला अजून. हल्ली त्याला खूप काम असतं. रात्री ऑफिसात बसून जादा काम करतो तो." हे माझे म्हणणे काकांना पटले असावे. नंतर जोरजोराने हातचोळीत त्यांनी माझे कसे काय चालले आहे याची चौकशी केली. बोलता बोलता ते बेडरूममध्ये जायला लागले. तशी मी जवळ जवळ त्यांची कॉलरच पकडली अन् म्हटले, "इकडे नाही काका...असा इकडून रस्ता आहे..." इतक्यात मला एक कल्पना सुचली. मी म्हणालो, "काका, इतका प्रवास करून आलात, म्हणजे आता तुम्हाला खूप भूक लागली असणार. या, थोडेसे खाऊन घ्या बरं!" काका हसले, अन् म्हणाले, "बरोबर आहे. मी भुकेला आहे. थोडेसे खाऊन घ्यायला माझी काहीच हरकत नाही." मग मी त्यांना जेवणघरात जवळ जवळ ओढूनच नेले म्हणा ना.

त्या रात्रीचे जेवण आमच्या घरी झाले होते, त्यामुळे कपाटात बरेचसे खाद्यपदार्थ होते. मी मासांचे तुकडे बशीत घातले, अन् त्याचा काकांनी मोठ्या खुशीने समाचार घ्यायला सुरुवात केली. मी त्यांना एकसारखा आग्रह करीत होतो. त्यांचा ग्लास मुळीच रिकामा राहू देत नव्हतो. नॉर्मंडीत आम्हाला किती रुचकर जेवण मिळत असे त्याची एकसारखी आठवण करून देत होतो. त्यांचा जठराग्नी प्रदीप्त करण्याची सारखी धडपड मी चालविली होती. जेवण झाल्यावर त्यांनी बशी दूर सारली, अन् ते म्हणाले, "बस् बस् बस्! खूप झाले बुवा! आता काहीही खाण्याची इच्छा नाही." पण मी काही खास जिनसा मागाहून वाढण्यासाठी राखून ठेवलेल्या होत्या. म्हाताऱ्याच्या खाण्यातल्या आवडीनिवडी माझ्या नेमक्या परिचयाच्या! मग मी कोंबडीचा रस्सा, बटाटयाचे सॅलड, अन् वाडगाभर साय-इ. आणले—आणि त्यावर कडी म्हणूण आमच्या जेवणातून उरलेले उंची मद्यही त्यांना दिले. आमचे खर्चीक रहाणीमान पाहून काका आश्चर्याने स्तंभितच झाले. त्यांनी बशी पुढे ओढली, अन् पुनश्च खाण्यास सुरुवात केली.. वेळ जात होता खरा. त्यांचे जेवण चालू असताना मी पुढील संकटातून बाहेर कसे पडता येईल याचा सारखा विचार करीत होतो. पण एकही सोपा सुलभ असा मार्ग दिसत नव्हता.

शेवटी काका उठले. माझ्या पायातली जणू सर्व शक्तीच नाहीशी झाली. ते होते तिथेच त्यांना खिळवून ठेवण्याचा मी खूप प्रयत्न केला, "काका, आता तुम्ही थोडीशी ब्रॅण्डी घ्या. अगदी जुनी मुरलेली आहे—उत्तम आहे बघा!"

"छे छे. आता पोटाला अगदी तडस लागली आहे. खरोखरच आता काही नको. बरं, आता तुझी बाकीची जागा कशी आहे ते बघ या बरं!"

आता त्यांना मागे खेचण्यात काही अर्थच नव्हता. माझ्या मणक्यातून भयंकर कळ सळसळत गेली. आता काय होणार? काय तमाशा दिसणार?...त्यातून किती नाचक्की होणार? काका किती संतापतील?...आता काय होणार?...मी आपला त्यांच्या मागे मागे चाललो होतो. एकदम खिडकी उघडावी अन् रस्त्यावर उडी ठोकून द्यावी असे वाटत होते...अन् तरीही मी आपला काकांच्या मागून बावळटासारखा जातच होतो. त्यांना थांबविण्यासाठी एक चकार शब्दही माझ्या तोंडून फुटत नव्हता. आता कंबख्ती! खूप दडपण...मेंदू बधीर...चक्कर येतेय की काय अशी स्थिती...अन् तरीही कोणीतरी अचानक मदतीला येईल, आपण अकल्पित रीतीने संकटातून तरून जाऊ अशी निराधार आशा मनात वागत होतीच.

काका बेडरूममध्ये आले. माझ्या हृदयात शेवटची आशा तरळली. लुइसाने—माझ्या त्या गोड पोरीने पलंगाचे पडदे ओढून घेतलेले होते. खोलीतील स्त्रीचा वावर सुचविणारी एकही वस्तू तिथे उरू दिली नव्हती. तिचे

कपडे, कॉलर्स, मोजे, बूट-हातमोजे, पिना, आंगठ्या–सारे सारे अदृश्य झालेले होते.

"काका, आता उजाडायला आलंय. नकोच झोपायला. गप्पाच मारीत बसूया – नाही का?"

'अरे, तू मोठा सज्जन पोरगा आहेस रे. या म्हाताऱ्याशी बोलत बसायची तुझी तयारी आहे. पण मला मात्र तास-दोन तास तरी झोप हवीय बाबा!" इतके बोलून, हातात दिवा घेऊन काका पलंगाशी आले. एका झटक्यात पलंगाचा पडदा दूर केला. मी थबकलो. श्वास न घेता स्तब्ध उभा राहिलो. ती जूनमधली ऊबदार रात्र होती. ब्लँकेट न वापरता मी आणि लुइसाने ब्लँकेटे काढून ठेवली होती. त्यातच लुइसाने स्वतःला अगदी घट्ट गुंडाळून घेतले होते. वरून चादर ओढून घेतली होती. अगदी व्यवस्थित लपून रहाण्यासाठी तिने आपल्या अंगाची शक्य तितकी बारीक जुडी करून घेतली होती... पण...तरीही तिची अंगलट अगदी स्पष्ट दिसत होती.

तिथे उभे रहाणे सर्वस्वी अशक्य झाले. एवढ्यात काका मजकडे पाहून खदखदा हसले. मी आश्चर्याने जवळजवळ कोसळलोच. काका मिस्कीलपणे हसत म्हणाले, "अस्स काय?... तू माझी चेष्टा चालविली होतीस काय? तुझ्या मनात भावाला उठवायचे नव्हते. ठीक आहे, मीच उठवतो त्याला कसं ते बघशीलच तू. अन् मग त्यांचा तो प्रचंड पंजा त्यांनी वर उचललेला मी पाहिला... काकांची हसून हसून मुरकुंडी वळली होती. त्यांनी आपला हात त्या गाठोड्यावर टाकलाच.

तोच एक तीव्र किंचाळी!.. मग त्या अंथरूणातून बाहेर येण्याची भयंकर धडपड– अगदी शिकस्तीचा आटापिटा! आत नुसते वादळ उठले होते–धुमसत होते–धडधडत होते–लोळण घेत होते....त्या बिचाऱ्या पोरीला काही बाहेर येता येईना. तिने स्वतःला पांघरूणात इतके घट्ट गुंडाळून घेतले होते, की बाहेर पडणे अत्यंत दुर्घट! शेवटी एका बाजूने एक हात व दुसऱ्या बाजूने एक पाय बाहेर आला. नंतर डोकं – मग डोक्या-खालचा भाग. उघडा-वाघडा–धपापणारा. संतापाने पेटलेल्या डोळ्यांनी आमच्याकडे रोखून पहात ती कशीबशी बसली.

काका झटदिशी मागे सरकले. पूर्ण अवाक्! आश्चर्याने ते अगदी स्तंभीतच झाले होते! जणू काही त्यांना मूर्तिमंत सैतानच दिसला होता. त्यांचा श्वासोच्छ्वास बैलासारखा धपापत होता. त्या परिस्थितीस तोंड देण्यास मी सर्वस्वी असमर्थ होतो. तसाच वेड्यासारखा मागच्या मागे पळालो, तो दोन दिवस परत आलोच नाही. आलो, तेव्हा लुइसा निघून गेलेली होती. किल्ली मोलकरणीजवळ होती. मला लुइसा पुन्हा कधीही भेटली नाही.

अन् माझे काका? त्यांनी माझा वारसा चक्क रद्द केला. होते नव्हते – ते सारे काही माझ्या भावाच्या नावाने करून टाकले कारण लुइसाने त्याला आधी सूचना देऊन ठेवलेली असल्यामुळे त्याने काकांना सरळ थाप मारली. त्याने काकांना सांगितले, की भावाच्या (म्हणजे माझ्या) वाईट वर्तणुकीला कंटाळून तो वेगळा रहात होता! पहा! काय न्याय आहे? छट्! आता मी कधीही लग्न करणार नाही! बायका म्हणजे महान् धोकेबाज असतात बुवा!

□ □


स्थापनेपासून लोककल्याणाचे ब्रीद घेऊन संरक्षण, उत्पादन, निर्यात
शेती–विकास व लघु उद्योग ह्यांना गेली अडतीस वर्षे मदत
करणारी तुमची जिव्हाळ्याची बँक

# बँक ऑफ महाराष्ट्र

**मुख्य कचेरी – ११७७ बुधवार पेठ, पुणे – २**

आपल्या सर्व शाखांनिशी तुमच्या सेवेस सिद्ध आहे.
सविस्तर माहितीसाठी आपल्या नजिकच्या शाखेस भेट द्या.

**वा. मा. भिडे**
चेअरमन व मॅनेजिंग डायरेक्टर


THERE'S A BEAUTIFUL DESTINY IN STORE FOR YOU...
SAREES...SHIRTINGS...SUITINGS.
LAXMI VISHNU
AN APTE GROUP ENTERPRISE
LINTAS-LV. 13-140

# लघुउद्योगांची वाढ प्रादेशिक विषमतेचा काळ!

सु. ल. सोमण

आमचे त्रिकूट तसे लहानपणापासून गाजत आलेले आहे. अमर, सुरेश आणि मी शाळेतली हस्तलिखिते, स्नेहसंमेलने, क्रिकेटचे सामने-एखाद्याचे एखादे क्षेत्र असायचे, पण आमच्या उपस्थितीने गाजायचे. मात्र आम्ही तिघेही मोठेपणीही आमचे हे त्रिकूट फुटले नाही. अगदी लग्नानंतर सुद्धा! त्यामुळे अगदी आजतागायत आम्ही तिघेही आठवड्यातून एकदा–बहुधा रविवारी एकत्र जमतोच. दोन तीन तास तरी किमान एकत्र काढतो. ह्या दोन तीन तासात आठवड्यातल्या बेरजा वजाबाक्या आम्ही एकमेकांना सादर करतो. पुढल्या आठवड्याचा कार्यक्रम आखतो. आणि नंतरच फुटतो. साधारणपणे हे रुटीनच होऊन गेले आहे...

पण एका रविवारी आमचे हे रुटीन थोडे बदललें. अमर नुकताच पंजाबातून परतला होता. चंदीगढ, लुधियाना वगैरे ठिकाणांना भेटी देऊन आला होता. साहाजिकच त्याच्याकडून त्या विभागातल्या काही गमती जमती ऐकायला मिळतील ही अपेक्षा होती. पण स्वारीने आम्ही तिथे एकत्र येताच बॉम्बस्फोट केला, 'आयला! बस झाले हे रुटीन लाईफ. सकाळी घाईघाईने आटोपून ऑफिसला जा, साहेबाच्या शिव्या खा. संध्याकाळी हाशहुश करीत घरी परता.. त्याच त्या नेहमीच्या चकाट्या, नेहमीची उणीदुणी, घरी आल्यावरही तेच ते चाकोरीतले जिणे 'थ्रील' असे ते कुठे नाहीच. आय अॅम गोईंग टु चेंज अॅबसोल्यूटली....आम्ही दोघे अमरकडे पाहातच राहिलो. दोन मिनिटे समजेना त्याला काय म्हणायचे आहे. हळूहळू पंजाबच्या त्याच्या दौऱ्याचा वृत्तांत तो सांगू लागला तेव्हा त्याला कुठल्या दृष्टीने 'चेंज' व्हायचे होते ते थोडे थोडे डोक्यात उतरू लागले. पंजाबात त्याने पाहिले होते धडपडणारे प्रत्येक घर. त्या धडपडीतून वाहाणारी समृद्धता! फुललेली भरघोस शेते, घराघरातून उभे राहिलेले उद्योग!! अमर त्या दर्शनाने नखशिखांत बदलून आला होता. निदान आपण आपल्यापुरता तरी ह्या मुंबईतल्या पोशाखी रुटीनला रामराम ठोकायचा, काही तरी वेगळे करायचे, धंद्यात उडी घ्यायची ह्या ईर्ष्येने पेटून निघाला होता...

आपल्याकडे एखादा मोठा कारखाना असतो. त्याचे निरनिराळे विभाग असतात. प्रत्येक विभाग विशिष्ट भागांचे उत्पादन करीत असतो. शेवटी एका विभागात, ह्या सर्व, भागांची जुळणी होऊन अंतिम माल तयार होतो. उदाहरणार्थ आपण सायकलचा व्यवसाय घेऊ. हिंद सायकलससारख्या मोठ्या कारखान्यात ए टु झेड संपूर्ण सायकल तयार होते. चाकांचे स्पोक्स, प्रत्यक्ष चाके, त्यावरील रबरी टायर्स, हँडल, मधल्या दांड्या...कितीतरी अलग अलग भागांची जुळणी होऊन सायकल कारखान्यातून बाहेर पडते. हे सर्व छोटे छोटे भाग बहुश: ह्याच कारखान्यात तयार होतात. पंजाबात कुठल्याच धंद्याबाबत सहसा असे घडत नाही. आपल्याकडे भिवंडी, मालेगाव, सोलापूर वगैरे भागातून आपण हिंडलो तर घराघरातून हातमाग धडधडत असल्याचे आपल्याला दिसतील. पंजाबातल्या बहुतेक मोठ्या गावातून बहुश: घराघरातून अशाच पद्धतीने लेथ मशिन्स चालू असलेली दिसतात. वेगवेगळ्या वस्तूंचे छोटे छोटे भाग अशा घरोघर सुरू असलेल्या 'टायनी' वर्कशॉपमधून बनतात. एखादा टायनीवाला स्पोक्स म्हणजे नुसते स्पोक्सच बनवीत असतो. दुसरा एखादा नुसतेच 'हँडल बार्स' तयार करीत असतो. हा सारा माल एखाद्या मध्यवर्ती 'युनिट'ला पोचता होतो. तिथे त्यांची जुळणी होते व सायकली बाहेर पडतात. सायकलींचे बडे कारखाने पंजाबाबाहेर असून सुद्धा सायकलींचे सर्वात जास्त उत्पादन पंजाबात आहे. सायकलींच्या निर्यातीतही पंजाबचा हिस्सा मोठा आहे. आणि गंमत ही की हा संपूर्ण सायकल व्यवसाय पंजाबात उभा आहे तो ह्या अशा टायनीजच्या जिवावर...

टायनीजच्याच जिवावर उभा असणारा पंजाबातला दुसरा महत्त्वपूर्ण व्यवसाय म्हणजे शिवणयंत्रांचा! ह्या खेरीज 'मोटर्स', विविध उपकरणे, छोटी मोठी यंत्र वगैरेंचे उत्पादन अशाच पद्धतीने होत असते. एका आकडेवारीनुसार, तिथल्या शेतीसाठी आवश्यक असलेली बहुसंख्य अवजारे अशा छोट्या लघुउद्योगातून उपलब्ध होतात. बहुतांश गरज ह्याच उद्योगातून निभावून नेली जाते...

पण अशी औद्योगिकरणाची आघाडी उघडीत असताना, पंजाबने शेतीकडेही पूर्ण लक्ष पुरवले आहे. बहरलेला शेतीउद्योग हाही पंजाबचा एक महत्त्वाचा विशेष आहे. हरित क्रांतीच्या फार मोठ्या वल्गना न होताही तिथे प्रगत शेती फार मोठ्या प्रमाणावर आढळून येते. शेती मालावर प्रक्रिया करणारा उद्योगही तिथे मोठ्या प्रमाणावर आढळून येतो. शेतीला पूरक असे खतनिर्मितीचे छोटे व्यवसाय, दूध व्यवसाय वगैरेचेही जाळे तिथे विणले गेले आहे. त्यामुळे लांबच्या लांब पसरलेली हिरवीगार शेते, त्या बाजूने धावणाऱ्या काळ्याशार सडका, गावोगाव विखुरलेले भरभराटलेले लघुउद्योग, घराघरातून मूळ धरलेले उद्योग आणि सगळ्यात कळस म्हणजे विलासी चंदिगढ! पंजाबने मारलेल्या मुसंडीचे हे लोभसवाणे चित्र आहे! महाराष्ट्रापेक्षा तिथे पैसा खेळतो आहे. तिथले दरडोई उत्पन्न महाराष्ट्रापेक्षा जास्त आहे. आणि ते सुद्धा मुंबईसारखी औद्योगिक महानगरी पंजाबात नसताना! स्वातंत्र्योत्तर काळात व महाराष्ट्राच्या

निर्मितीनंतरही मुंबईच्या जिवावर महाराष्ट्र औद्योगिकदृष्टया देशात आघाडीवर होता. दरडोई मिळकतही मुंबईच्याच जिवावर, महाराष्ट्रातच जास्त होती. पण आज ही आघाडी पंजाबने मिळवली आहे. पंजाबात मुंबईसारखे प्रचंड उद्योग त्या मानाने मोजकेच, हे लक्षात घेता, पंजाबच्या मुसंडीचे वैशिष्टय मनावर ठसायला हरकत नाही ! शेती व लघुउद्योगांचे जाळे ह्यांच्या एका सुंदर मिश्रणातूनच पंजाबने आपली ही प्रगती साध्य करून घेतली आहे...

पंजाबचे हे वर्णन करून आमच्या मित्राने 'आपण लौकरच नोकरीचा राजिनामा देणार' असल्याचे घोषित केले. सोलापूर किंवा अन्य दुसऱ्या कुठल्या गावी जाऊन उद्योग धंद्यात उडी घेणार असल्याचेही घोषित केले. त्यानंतर आजपर्यंत त्या दिशेने काही वाटचालही त्याने केल्याचे मला माहीत आहे.

पंजाबात शेतीच्या बरोबरच घरोघर लघुतम उद्योगांचे जाळे विणले गेल्यामुळे पंजाबचा एका अर्थी खरोखरच संतुलित विकास साध्य झाला आहे. हे छोट लघुतम व्यवसाय प्रायः स्वतंत्रपणे प्रत्यक्ष बाजारात आपले उत्पादन धाडीतच नाहीत. उलट एकमेकांना पूरक व्यवसाय म्हणूनच हे घटक उभे राहिलेले दिसतात. त्यामुळे 'मार्केटींग'ची मोठी समस्या ह्या घटकांना भेडसावीत नाही. ह्यांच्या जोडीलाच मशिन्सची दुरुस्ती, मोटार वाईंडिंग वगैरे सेवा उद्योगांचे जाळेही गावोगाव विणले गेले असल्यामुळे त्याचाही मोठा फायदा ह्या 'टायनीज'ना मिळून गेला आहे. नेमकी ह्या उलट परिस्थिती आपल्याकडे आहे. कोल्हापूर, इचलकरंजीचा परिसर काही प्रमाणांत सोडला तर, मुंबई-ठाणे-पुणे ह्या पलीकडे आपली औद्योगिक धडक फारशी गेलेलीच नाही. १९६० साली महाराष्ट्र राज्य निर्मिती झाली. तत्पूर्वीच्या काळात अशी एक कल्पना होती की, द्विभाषिक मुंबई राज्यात, महाराष्ट्राकडे गुजराथच्या मानाने कमी लक्ष दिले गेले. महाराष्ट्र राज्य निर्मितीनंतर ह्या तक्रारीला वाव नव्हता. एवढेच नाही तर १९६० च्या पहिल्या महाराष्ट्र दिनी भाषण करताना श्री. यशवंतराव चव्हाणांनी अशी ग्वाही दिली होती की, 'महाराष्ट्राचा संतुलित विकास हे आमचे ध्येय राहील. छोटे शेतकरी, भूमिहीन मजूर यांना मजबूत आर्थिक पायावर बसविण्यासाठी खेडी व मध्यम शहरे, यांच्यातून लघुउद्योगांचे जाळे पसरले पाहिजे. देशातील बेकारीवर हाच एकमात्र तोडगा आहे...'

पण त्यानंतर आज चौदा वर्षांनी महाराष्ट्राची काय अवस्था आहे ? मुंबई-ठाणे-नाशिक हा त्रिकोण सोडला तर इतर सर्वत्र सर्व भकास आहे. कोल्हापूर-इचलकरंजी-सांगली हा थोडासा हिरवळीचा टापू. बाकी सर्व शून्यवत. १९६५ ते १९७० दरम्यान महाराष्ट्रात वेगवेगळ्या भागात स्थापन झालेल्या मोठ्या व मध्यम उद्योगांची आकडेवारी सोबत दिली आहे. ही आकडेवारीही हेच दाखवून देईल की, महाराष्ट्र राज्य स्थापनेनंतरही औद्योगिक वाढ झाली ती ह्याच त्रिकोणात. लघुउद्योगांचीही, मोठ्या व मध्यम उद्योगांच्या अनुषंगाने त्यांचे पूरक उद्योग म्हणून त्या त्या ठिकाणी वाढ झाली तेवढीच. साहाजिकच, कुठल्याही प्रकारात का होईना मुंबई-ठाणे-पुणे ह्या परिसरातच लघुउद्योगही वाढीला लागले. इतरत्रची माणसे फक्त ह्या मोठ्या, मध्यम वा लघुउद्योगात नोकरी मिळवण्यासाठी झुंडीने ह्या त्रिकोणाकडेच खेचली गेली.

## मोठ्या व मध्यम उद्योगांची वाटचाल

१९६५ ते १९६९ दरम्यान स्थापन झालेले
मोठे व मध्यम उद्योग–जिल्हा निहाय

| जिल्हा | एकूण स्थापित उद्योग | त्यामुळे उपलब्ध रोजगार | भांडवली गुंतवणूक (लाख रुपये) |
|---|---|---|---|
| बृहन्मुंबई | १३० | ७०,५४६ | ३७,५४२·९८ |
| ठाणे | ५८ | ४७,२६८ | १७,१६४·०५ |
| पुणे | २५ | १९,११० | ७,३८१·०० |
| कुलाबा | ४ | २,२४१ | २३३·५७ |
| नासिक | २ | ३,१५५ | १६,०२७·२० |
| धुळे | १ | ४०० | २२०·०० |
| अहमदनगर | ५ | ३,४४१ | ८७९·५० |
| सातारा | १ | ३०५ | १०६·०० |
| सांगली | १ | ८३५ | ३५२·३२ |
| कोल्हापूर | ५ | ३,०८५ | १०७९·२५ |
| सोलापूर | १ | २३६ | २६·१२ |
| नांदेड | १ | ४०० | २२०·०० |
| उस्मानाबाद | ३ | ८२४ | २२४·१५ |
| बुलढाणा | १ | ३३ | २·७५ |
| वर्धा | १ | १,१३७ | ६१·०० |
| नागपूर | १ | ५५ | २·९२ |
| अमरावती | १ | ३२ | २·७६ |
| रत्नागिरी, जळगाव, औरंगाबाद, परभणी, बीड, अकोला, यवतमाळ, भंडारा, चंद्रपूर | – | – | – |
| एकूण महाराष्ट्र | २४१ | १,५४,११५ | ८२,९५२·७६ |

संत तुकडोजी महाराजांनी एके ठिकाणी म्हटले आहे–

**शहराकडे चालला प्रवाह । तो थांबवावा निःसंदेह ।।**
**सर्वांचा गावीच होईल निर्वाह । ऐसी योजना करावी ।**
**खेडेची शहराचे जनक । शहर भोक्ते, खेडे उत्पादक ।**
**शहराकडे न जाता लोक । धावावे उलट खेड्याकडे ।**
**ऐसी करावी ग्रामसेवा । हेचि कर्म आवडे देवा ।**
**संशय काही मनी न धरावा । तुकड्या म्हणे ।।**

तुकडोजी आमचे राष्ट्रीय संत. उद्योगधंद्यांच्या वाढीबद्दल त्यांची धारणा साधारणतः वरील पद्धतीची होती. संतुलित विकासाच्या दृष्टीने ही धारणा महत्त्वाची ठरते.

पण प्रत्यक्षात परिस्थिती फार वेगळी आहे. खेडी तर ओस पडली आहेतच, पण गावांतून (किंवा मध्यम शहरांतून) तरुणांचा ओघ सतत शहरांकडे वाढत आहे. वर उल्लेखिलेला त्रिकोणी टापू सोडून रत्नागिरी, बीड, परभणी, वर्धा, चंद्रपूर अशा जिल्ह्यांतून आपण डोकावलो तर, परंपरागत शेती करण्यासाठीही खेड्याखेड्यांतून

पुरेसे मनुष्यबळ उपलब्ध नाही असं दिसून येते. लोकसंख्या काबूत ठेवण्यासाठी निकराचे प्रयत्न चालू असलेल्या ह्या देशातल्या खेड्यातून मनुष्यबळ नाही, त्या अभावी शेते ओस पडताहेत, असला चमत्कारिक विरोधाभास आढळून येतो. वर उल्लेखिलेले सर्व जिल्हे मागासलेले जिल्हे आहेत. तिथे अंतर्भागात धड वहातुकीची देखील साधने नाहीत शेतीला पूरक उद्योगांची जोड नाही. बारमाही पिके नाहीत, त्यासाठी आवश्यक सुविधा नाही. अशा अवस्थेत इथला एकमात्र उद्योग म्हणजे शेती. त्यावर वर्षभर गुजराण होणे शक्य नाही. म्हणूनच इथला तरुण, कामकरी शेजारच्या शहरांकडे धाव घेतो. तिथल्या नोकरीतल्या हमखास उत्पन्नाच्या आशेने शेतीकडे कायमची पाठ फिरवतो. शेती ओस पडते. रत्नागिरी, औरंगाबाद जिल्ह्यांतून अशी शेकडो एकर शेतजमीन आज पडीक झाली असल्याचे मला सांगण्यात आले.

मुंबई, पुणे, नाशिक त्रिकोणाव्यतिरिक्त अन्य महाराष्ट्राची अशा तऱ्हेने गेल्या १५–२० वर्षांत उपेक्षाच वरील त्रिकोणाच्या तुलनेत चालू आहे. हरित क्रांतीच्या घोषणा गेल्या २–३ वर्षांपासून सुरू आहेत. पण त्यातही विशिष्ट प्रदेशातून उत्पादन वाढत गेले व तेही ऊस, द्राक्षे, कापूस अशा पिकांचेच. तुलनेत अन्य पिके मागे पडत गेली आहेत. शेतीला पूरक अशा उद्योगधंद्यांचीही वाढ हवी तशी नाही. त्यामुळे गावकऱ्यांना चार महिने शेतीचा उद्योग झाल्यावर गावात ज्यादा काम उपलब्ध होतच नाही. परिणामतः तो शेताकडून शहराकडे वळतो. ग्रामीण विभाग व शहरी विभाग ह्यांच्यामध्ये संतुलन मुळात नाहीच. ग्रामीण विभागापर्यंत आवश्यक त्या सुखसोयी पुरवण्यात आलेल्या नाहीत, त्यामुळे ही दरी आणखीच रुंदावते.

## विषमता....विषमता....

'बेकारीचा प्रश्न हा फक्त शेतकी उद्योगधंद्यांच्या द्वारेच सोडविणे शक्य आहे.' असे राष्ट्रपती व्ही. व्ही. गिरी म्हणतात व भारताचे एकंदर शेतीप्रधान स्वरूप पाहता ते योग्यही आहे. परंतु एकंदर औद्योगिक वाटचालीचे मार्ग पाहता शेतीला उद्योगधंदा मानायलाच आपण तयार नाही असे दिसते. साहजिकच, बँका, सर्व आर्थिक संस्था ह्यांच्या सहाय्य योजनांतून शेतीला प्राधान्य मिळत नाही. अलीकडे त्या दिशेने थोडे प्रयत्न सुरू आहेत, नाही असे नाही पण ते फार तोकडे आहेत. जी कथा आर्थिक सहकार्याचा हात शेती-धंद्याला देण्यासंबंधीची, तीच कथा ग्रामीण विभागात सुखसोयी उपलब्ध करून देण्याची. रस्ते, रेल्वे आदी दळणवळणाची साधने, टेलिफोन्सचे जाळे, बँक-पोस्टाच्या सोयी वगैरे सुखसोयींची जी रेलचेल मुंबई-पुण्याच्या परिसरात आहे, त्याच्या एकशतांशाने देखील पुरेशा सोयी महाराष्ट्रातल्या अन्य परिसरात नाहीत. मुंबईत एका ठिकाणाहून दुसऱ्या ठिकाणी पोचणे सहजी शक्य होते, कामे उरकणे त्यामुळे शीघ्रगतीने शक्य होते. ग्रामीण भागात, शेतापासून जवळच्या गावाकडे जाऊन येणे म्हणजे सबंध दिवस खर्ची पडतो. भुयारी रेल्वे, जुळी मुंबई, फ्लाय ओव्हर्स, बँक बे–केवढा तरी पसारा मुंबईत वाढतो आहे. तर बीड, परभणी, उस्मानाबाद, चंद्रपूर, भंडारा, वगैरे जिल्ह्यातून एखादे वाहन देखील धडपणे पोहोचू शकेल असे साधे रस्तेही नाहीत. ह्या सोयीसवलतींचा परिणाम सहजीच घडून जातो.

### महाराष्ट्रातील लघुउद्योगांची वाटचाल

**प्रादेशिक विषमता वाढीसच लागली**

| | लघुउद्योगांची संख्या | |
|---|---|---|
| जिल्हा | १९६१ | १९७२ |
| बृहन्मुंबई | ३४६३ | १०,३०३ |
| ठाणे | २२७ | ७,४०२ |
| कुलाबा | ३३ | २७३ |
| रत्नागिरी | ११ | ३०१ |
| नासिक | ५४ | २,३५४ |
| धुळे | १० | २४९ |
| जळगाव | ६१ | ५७२ |
| अहमदनगर | ३४ | ८५२ |
| पुणे | ३५३ | २,३४९ |
| सातारा | १७ | ४६१ |
| सांगली | ४८ | १,०७६ |
| सोलापूर | १०४ | ९८७ |
| कोल्हापूर | ९६ | १,७४८ |
| औरंगाबाद | ४४ | ५८६ |
| परभणी | ८ | १७७ |
| बीड | ५ | १३८ |
| नांदेड | ४ | ३२४ |
| उस्मानाबाद | १८ | ३३९ |
| बुलढाणा | ५ | १९६ |
| अकोला | २० | ३९४ |
| अमरावती | २७ | ३५५ |
| यवतमाळ | २ | २९४ |
| वर्धा | ९ | २६० |
| नागपूर | १२० | ९९६ |
| भंडारा | ५० | २५५ |
| चंद्रपूर | ३७ | २५१ |
| एकूण | ४,८६० | ३३,४९२ |

ग्रामीण भाग असतो तसाच उपेक्षित राहातो, विकसित भागात सवलती वाढत जाऊन विभागीय विषमता वाढतच राहाते.

शेती व त्याचे पूरक उद्योग हे जसे दुर्लक्षिले गेले, तसेच नैसर्गिक साधनसंपत्तीवर आधारित उद्योग त्या त्या ठिकाणी हेतुपुरःसर वाढविण्याकडेही दुर्लक्षच होत गेलं. त्यामुळे कोकणात जडोद्योग सुरू करण्यासाठी प्रोत्साहन द्यायचे सर्व मार्ग हाताळूनही ते तिथे हवे त्या प्रमाणावर उभे राहात नाहीत, तर जंगलं, आंबा-फणस आदींच्या बागायती, सागवानाची जंगलं वगैरे वगैरे स्थानिक, नैसर्गिक साधन संपत्तीकडे दुर्लक्षच झाले. कोकणात आपण जाऊ लागलो की एक गोष्ट लक्षात येते ती ही की एकेकाळी कोकणात सर्वत्र घनदाट जंगल होते. आज परिस्थिती अशी आहे की केवळ दक्षिण रत्नागिरी विभागातच

## महाराष्ट्रातील शेती उद्योगाची वाटचाल

| | |
|---|---|
| महाराष्ट्राचे एकूण क्षेत्रफळ : | ३,०६,३४५ चौरस किलो मीटर. |
| जंगलाखालील जमीन : | ५४,०९,००० हेक्टर. |
| ओसाड जमीन : | १७,७४,००० हेक्टर. |
| शेत जमीन : | १,९४,३५,००० हेक्टर. (१९६१ साली शेतजमीन १,७८,२३,००० हेक्टर) |
| ओलिता खालील जमीन : | १६,२३,००० हेक्टर (म्हणजे राज्यातील एकूण शेतजमीनी पैकी फक्त ६% शेतजमीन ओलिताखाली येते) |

### पिके : त्या त्या पिकांचे उत्पादनक्षेत्र व उत्पादन

| पीक | लागवडीखालील जमीन आकडे हेक्टरमध्ये | | उत्पादन आकडे टनात | |
|---|---|---|---|---|
| | १९६१ | १९७१ | १९६१ | १९७१ |
| तांदूळ | १३,००,००० | १३,५६,००० | १३,६९,००० | १६,६३,००० |
| गहू | ९,०७,००० | ८,८२,००० | ४,०१,००० | ४,५१,००० |
| ज्वारी | ६२,८४,००० | ५७,८४,००० | ४२,२४,००० | १५,९१,००० |
| बाजरी | १६,३५,००० | १९,२९,००० | ४,८९,००० | ७,८८,००० |
| सर्व डाळी | २४,२७,००० | २४,९१,००० | ९,८९,००० | ७,७६,००० |
| एक दल धान्ये १९६१–७१ ह्या काळात सरासरीने दरवर्षी १,०६,०४,००० हेक्टर जमीनीत लागवड झाली. | | | ६७,५५००० | ४८,१४,००० |

नगदी पिके

| पीक | १९६१ | १९७१ | १९६१ | १९७१ |
|---|---|---|---|---|
| ऊस | १,५६,००० | २,१७,००० | ११,५६,००० | १६,७९,००० |
| कापूस | २५,००,००० | २८,१२,००० | २,८४,००० | ४,८२,००० |
| भुइमूग | १०,८३,००० | ९,५३,००० | ८,००,००० | ६,१७,००० |
| तंबाखू | २५,००० | १२,५०० | १२,००० | ६,१०० |

शेती उद्योग प्रमुख असला तरी, इतर उद्योगांपुडे त्याची हेळसांड झाली आहे. १९६१ ते १९७१ ह्या दशकात शेतीचे व शेतीजन्न उद्योगांचे ६६४ कोटी रुपयांवरून १११७ कोटी रुपये झाले तर ह्याच काळात, खाणी अन्य उद्योग इत्यादीचे उत्पन्न ९३३ कोटी रुपयांवरून २७४९ कोटी रुपयांपर्यंत पोंचले.

---

जंगले शिल्लक आहेत. ही जंगले तिथे शास्त्रोक्त पद्धतीने वाढविली गेली असती, सागवानाचे उत्पादन वाढवले गेले असते तर कोकणातील आजची दैन्यावस्था काही प्रमाणात कमी करता आली असती. जंगलावर अवलंबून लघुउद्योगाचे जाळे, तिथल्या परंपरागत कारागिरामधले उद्योजक हेरून कधीच करता आले असते.

कॅनिंग वगैरे काही तुरळक उद्योग कोकणात आता सुरू झालेले आहेत. वास्तविक अधिक कित्येक एकर जमीन फळफळावळीच्या लागवडीखाली योजना बद्धपद्धतीने आणून 'कॅनिंग'च्या लघु उद्योगांचेही जाळे विणता आले असते. मच्छिमारी हा एक आणखी स्थानिक व्यवसाय. ट्रॉलर्स वगैरेचा उपयोग तिथे अलीकडे होऊ लागला आहे. मच्छिमारीवरही शास्त्रीय पद्धतीने लक्ष केंद्रीत केले गेले असते, तर एव्हाना बोटी बांधणे, फिश-कॅनिंग, नॉयलॉनची जाळी वगैरे कित्येक पूरक लघुउद्योगांना तिथे वाव मिळू शकला असता.

जी कथा कोकणाची तीच मराठवाड्याची, सोलापूरची आणि विदर्भाची ! जे उगवेल तेच तिथे पेरावे असे म्हणतात. उगाच हिमालयातली वनस्पती आणून ती रत्नागिरी जिल्ह्यात वाढत नाही म्हणून रडत बसण्यात अर्थ नाही ! आपल्याकडे नेमके असेच घडले हे मात्र खरे आहे. आधी ग्रामीण विभागात सुखसोयी, दळणवळणाची साधने उपलब्ध करून द्यायला हवी होती, ती दिली नाही. प्रादेशिक विषमता वाढत असल्याची ओरड व्हायला लागली, एखाद्या जडोद्योगासाठी राजकीय दबाव येऊ लागले की, नैसर्गिक परिस्थिती लक्षात न घेता कारखाने उभे राहू लागले. अशा कारखान्यांना आवश्यक कच्चा माल दूरवरून आणला जाऊ लागला. आणि उत्पादनही लांबवरच्याच प्रदेशात ! साहाजिकच असे उद्योगधंदे तोटयात तरी चालत गेले, बंद तरी पडले किंवा काही ठिकाणी मुळात उभेच राहिले नाहीत. महाराष्ट्र लघुउद्योग विकास महामंडळाचे श्री. भेंडे ह्यानी ह्या संबंधात माझ्याशी सहभागी होताना एक उदाहरण दिले. ते म्हणाले, 'पैठणी हा आमचा एक पिढीजात व्यवसाय MSSIDC तो आज तगवून धरीत आहे. आमचे पैठणी सेंटर आहे पैठणला. पण त्यासाठी आवश्यक ते सूत मिळते सिन्नरला. पैठणीचे कलाकारही आम्हाला सिन्नरहून पैठणला न्यावे लागतात. मग प्रश्न असा की, सिन्नरहून सर्व साहित्य जमवून ते पैठणला आणायचे, पैठणी तयार करायच्या व पुन: सिन्नर व इतरत्रच्याच बाजारपेठातून पाठवायच्या हा द्राविडी प्राणायम कशाला ? त्यापेक्षा पैठणी केंद्रच सिन्नरला हलवणे काय वाईट ?...'


सोलापूर, अहमदनगर, कोल्हापूर वगैरे जिल्ह्यांच्या परिसरात अलीकडे साखर कारखान्याचे जाळे उभे राहताना दिसत आहे. पण गंमत ही की ह्या साऱ्या विभागातून ह्या प्रचंड कारखान्यातल्या यंत्रांची दुरुस्ती, मोटर्स वाईडींग वगैरे काम करणारे उद्योग अभावानेच आहेत. काही बिघाड झाला की इथल्या मंडळींना थेट मुंबई-पुण्याकडे धाव घ्यावी लागते. योजनाबद्ध औद्योगिक विकास होत नसल्याचेच हे द्योतक आहे...

सुदैवाने आज ही परिस्थिती बदलण्याची चिन्हे दिसू लागली आहेत. महाराष्ट्र राज्य वित्तीय महामंडळ (MSFC), महाराष्ट्र लघुउद्योग विकास महामंडळ (MSSIDC), सिकॉम, प्रादेशिक विकास महामंडळ (कोकण, प. महाराष्ट्र, मराठवाडा, विदर्भ) तसेच विविध बँका ह्यांच्या अनेक पदाधिकाऱ्यांशी मी बोललो तेव्हा सर्वांनाच मी वर चर्चिलेल्या प्रश्नांची जाण असल्याचे दिसले. MSSIDE ठिकठिकाणच्या लीड बँका, चारी प्रादेशिक महामंडळे ह्यांचे ह्या दृष्टीने विशेष निकराने प्रयत्न सुरू आहेत. प्रत्येक जिल्ह्याचा सविस्तर अभ्यास करायचा, नैसर्गिक साधन-संपत्तीचा आढावा घ्यायचा, तदनुषंगिक नव्या लघु, मध्यम, जड उद्योगाच्या वाढीला निर्मितीला

कितपत वाव आहे ते चांचपडाचे, त्यासाठी आवश्यक ते तंत्रज्ञान त्या ठिकाणीच शक्यतो कसे उपलब्ध होईल ह्याचा शोध घ्यायचा व शेवटी संभाव्य उद्योजक निवडून काढून त्यांना प्रोत्साहन द्यायचे असा कार्यक्रम वर उल्लेखिलेल्या संस्थांनी हाती घेतलेला आहे. चंद्रपूर इथे अलीकडेच पार पडलेले 'एन्टरप्रिनर डेव्हलपमेंट क्लिनिक' (MSSIDE) हा त्याचाच एक भाग! प्रादेशिक महामंडळ तर ह्याहीपुढे एक पाऊल गेलेली आहेत. स्थानिक उद्योजक उपलब्ध नसतील, तर स्थानिक कसबी कामगार एकत्रित करून ही महामंडळे स्वतःच असे प्रकल्प हाती घेऊ लागली आहेत. चिपळूण येथे पॉवर-लूम्सचा कारखाना असाच कोकण डेव्हलपमेंट कार्पोरेशनने उभा केला आहे. मुंबईच्या मिल्समध्ये काम करणारा कोकणातला कामगार एकत्रित करून, त्यांची सहकारी संस्था प्रस्थापून त्यांच्यामार्फत कोकण डेव्हलपमेंट कॉर्पोरेशन हा कारखाना चालवीत आहे...

विविध महामंडळे (व शासनही!) ह्यांचा आज असा दृष्टिकोण बराचसा बदलला आहे. नव्याने उडी घेऊ इच्छिणाऱ्या उद्योजकांना, श्री. आबासाहेब गरवाऱ्यांनी वा आ. मनोहर जोशांनी म्हटल्याप्रमाणे भरपूर साहाय्यही आज विविध महामंडळाकडून, बँकाकडून मिळत आहे. त्यात काही अडचणी आहेत. लालफितीचा प्रभाव आहे. तरीही ह्या सोयीसवलतींनी काम पुष्कळच सुकर केले आहे. त्यामुळे मोठ्या प्रमाणावर, मराठी तरुण आज स्वतःच्या अशा छोट्या उद्योगधंद्या-मध्ये उडी घ्यायच्या प्रयत्नात असताना दिसतो. अशा वेळी, दोन लेथ्स, ड्रीलींग मशीन किंवा प्लॅस्टिकचे, केमिकल्सचे छोटे व्यवसाय ह्याहीपेक्षा फार मोठे क्षेत्र ग्रामीण भागात उपलब्ध असलेल्या नैस-र्गिक साधनसामुग्रीवर अवलंबून असणाऱ्या लघुउद्योगात आहे, हेही त्याच्या ध्यानात आणून देणे आवश्यक ठरेल. रत्नागिरीजवळ साडवली येथील सप्तलिंगी कृषी-कलोद्यानात, तिथले एक प्रगत शेतकरी श्री. पटवर्धन ह्यांनी सिट्रोनेला गवताची लागवड करून त्यापासून तेल काढायला सुरुवात केली आहे. ह्या तेलापासून विविध सुवासिक अत्तरे, जंतुनाशके, लघुउद्योगातून बनवता येऊ शकतील. कुलाबा जिल्ह्यात पडघवली इथे कित्येक एकरांच्या अक्षरशः कचरा व खडकाळ जमिनीवर श्री. केतकरांचा रबराच्या लागवडीचा एक अनुकरणीय प्रयोग सुरू आहे. तो यशस्वी ठरला तर कोकणाला ते एक वरदान ठरेल व रबराच्या लघुउद्योगांची कतारच कुलाबा जिल्ह्यात उभी राहू शकेल. चंद्रपूर जिल्ह्यात जंगलातून गोंद, रेशमाचे किडे, लाख वगैरे सापडते. लाकूड भरपूर आहे. चंद्रपूरची तांबडी माती प्रसिद्ध आहे. ह्यातून हवे तेवढे लघुउद्योग तिथे उभे राहू शकतील. अहमदनगर जिल्ह्यात सिझल्सचे उत्पादन मोठ्या प्रमाणात होते. त्यांचे दोर बनवणे, सुतळ्या बनवणे यासारखे लघुत्तम उद्योग-देखील तिथे उभे राहू शकतात.

सिकॉम, एम. आय. डी. सी. आदींतर्फे जे मोठे उद्योग मागास



कोकणात आज औद्योगिक क्रांती घडून यावी यासाठी सर्वच महामंडळे प्रयत्नशील असलेली दिसून येत आहेत. चिपळूण येथील अशाच एका कारखान्यात बॉयलरची उभारणी...परशुराम पेपर्स चिपळूण.

¤

विभागातून उभे राहात आहेत त्यातूनही, त्यांना पूरक असे] लघु-उद्योग उभे राहू शकतील. त्याच्याच जोडीला व उल्लेखिलेल्या नैसर्गिक साधनसंपत्तीचा उपयोग करून घेऊन उद्योग उभे राहिले, तर पंजाबला पुन्हा मागे टाकून, पुढे जाणे महाराष्ट्राला सहज शक्य आहे. उद्योगधंद्याशी जवळीक फारशी नसली तरी ते सहज शक्य करून दाखवणे मराठी माणसाच्या कुवतीच्या बाहेरचे निश्चितच नाही. ह्या पुढल्या पानामधून जे विचार व्यक्त झाले आहेत, थोरा-मोठ्यांचे जे काही मार्गदर्शन उपलब्ध झाले आहे आणि उद्योगधंद्यात, आतापर्यंत स्थिर झालेल्यांचे जे अनुभव इथे कथित केले गेले आहेत, त्यांचा पुढे थोडाबहुत फायदा अशा व्यक्तींना होईल अशी आशा आहे.

आणि तसे झाले, तर अमर, सुरेश आणि मी ह्या आमच्या त्रिकुटाच्या पुढच्या बैठकीत कॉलर ताठ करून मलाही काही सांगता येईल. ☐ ☐

# स्वतःचा नवीन लघु-उद्योग सुरू करण्यांस अथवा चालू लघु-उद्योगाचे आधुनिकीकरण करण्यांस आपल्याला प्रतिबंध कसला?

## भांडवल अपुरे आहे म्हणून?

पुरेशा पैशाअभावी पदोपदी अपेक्षाभंग होईल. परंतु तुमच्या यशाविषयी तुमच्या इतकीच आस्था बाळगणाऱ्या बँकेकडे कां जात नाहीं?

त्वरित सहाय्य मिळते म्हणून हजारो साहसी, उद्योगप्रिय माणसे बँक ऑफ इंडियाकडेच विचारणा करतात.

तुमच्या गरजेनुसार विविध प्रकारचे आर्थिक सहाय्य आम्ही देतो.






अधिक माहितीसाठी नजिकच्या शाखेत चौकशी करा.

**बँक ऑफ इंडिया**







RAAS/133 MAR

# औद्योगिक विकास आणि प्रादेशिक विषमता

## महाव्यवस्थापक ( MSSIDC ) श्री. पानवलकर ह्यांची मुलाखत

माणूस प्रतिनिधी

महाराष्ट्राची औद्योगिक जडण घडण करताना गेल्या शतकात बऱ्याच उणीवा राहून गेल्या आहेत. ह्या उणीवांमुळेच महाराष्ट्राच्या विविध भागातून संतुलन साधायच्या प्रयत्नांची घोषणा होऊनही प्रत्यक्षात प्रादेशिक विषमता वाढत गेली आहे. ह्या उणीवेची जाण व अविकसित प्रदेशांच्या विकासाची निकड आज सर्वांच्याच ध्यानात आलेली आहे. MSSIDC चे नियोजन व जनसंपर्क विभागांचे महाव्यवस्थापक श्री. म. वि. पानवलकर ह्यांच्याशी या विषयावर चर्चा करताना हे प्रकर्षाने जाणवले. 'गेल्या वीस पंचवीस वर्षांच्या काळात प्रादेशिक विषमतेच्या प्रश्नानी वेळोवेळी व वेगवेगळ्या ठिकाणी डोके वर काढलेच आहे. आणि अशा प्रत्येक ठिकाणी जवळजवळ सर्वांनीच संतुलित प्रादेशिक विकासाची कल्पना मान्य केलेली आहे. पण एखादी गोष्ट मान्य करणे निराळे आणि ती प्रत्यक्षात आणून दाखविणे निराळे...अविकसित प्रदेशांच्या विकासाचा प्रश्न आजपावेतो उपेक्षितच राहिलेला आहे. नियोजन मंडळ, केंद्रीय आणि राज्य सरकारे आणि विविध शासकीय संस्था प्रयत्न करीत असताना, अशा तऱ्हेचे सार्वत्रिक विधान करणे बाह्यात्कारी समर्थनीय ठरणार नाही. परंतु विकसित आणि अविकसित विभाग यांच्यातील अंतर कमी न होता ते वाढले आहे, अशी कबूली जेव्हा आमचे नियोजनकारच देऊ लागतात, तेव्हा झालेले प्रयत्न बरोबर होते का अशी शंका येऊ लागते...ह्या दृष्टीकोनातून पाहू गेल्यास आपल्या प्रगतीचा वेग मंद आहे...'

गेल्या २५–३० वर्षातल्या प्रयत्नांच्या उणीवा मान्य करून आणि प्रगतीचा वेग मंद असल्याचे प्रतिपादून, त्याच्या कारणांचे विश्लेषण करताना श्री. पानवलकर पुढे म्हणाले, 'ह्यातून अविकसित प्रदेशातल्या असंतोषाला आपण खतपाणी पुरवतो. एका बाजूला भरपूर विकास पावलेली मुंबई, पुणे, नासिक, सांगली, कोल्हापूरसारखी मोजकी केंद्रे, आणि त्याच्या आजूबाजूला विस्तृत असे उपेक्षित प्रदेश असे चित्र आज महाराष्ट्रात उभे राहून आपण पाहात आहोत. असे दृश्य दिसू लागणे ही धोक्याची सूचना आहे. विस्तृत अशा उपेक्षित विभागानी अशा मोजक्या विकसित केंद्रांना वेढायचे आणि क्रांती घडवून आणायची या सूत्रातून चीनमध्ये माओ-त्से-तुंगने क्रांती घडवून आणली. आपल्या इथे हे टाळायचे असेल तर विषम परिस्थिती वेळीच बदलणे अपरिहार्य आहे...पहिली गोष्ट म्हणजे ह्या अविकसित प्रदेशातील लोकांचे दारिद्र्य कमी केले गेले पाहिजे. नुसते मोठाले उद्योग काढून हे साध्य होईलसे वाटत नाही. अविकसित आणि खंडप्राय देशात केवळ उद्योगधंद्याद्वारे प्रादेशिक विषमतेचे चित्र बदलता येईल हे सर्वस्वी अशक्य आहे. त्यासाठी आवश्यक ते प्रचंड भांडवलही उभारणे अशक्य कोटीतले आहे. त्यासाठी शेती उद्योग, शेतीजन्य इतरे उद्योग व त्या त्या विभागातील नैसर्गिक साधन संपत्तीवर आधारीत लघुउद्योगांचे जाळे ह्याचीच खरी आवश्यकता आहे. त्यासाठी मोठाले उद्योग आले म्हणजे आर्थिक विकास साधला ही कल्पना आधी डोक्यातून काढून टाकली पाहिजे. अशा उद्योगांबरोबरच शेती व अन्य नैसर्गिक साधनसंपत्तीवर आधारीत लघुउद्योग ह्यांची सांगड घालून उपलब्ध भांडवली खर्चाच्या मर्यादा सांभाळून, आर्थिक विकास शक्य आहे, हे लोकांच्या मनावर बिंबवले पाहिजे...उद्योगधंद्यांचा अवलंब न करता नैसर्गिक साधन सामुग्रीचा पूर्ण उपयोग करून घेऊन संपन्न झालेल्या प्रदेशांची संख्याही आज थोडी नाही. आज अमेरिकेसारख्या देशातही काही प्रदेशांची संपन्नता ही त्यांच्या शेतीवर, बागबागायतीवर, त्या अनुषंगिक उद्योगांवरच आधारलेली आहे...'

'मात्र अशा पद्धतीने जर विकासाचे नियोजन करायचे असेल तर त्या त्या भागांचा पूर्ण अभ्यास करून तिथे योजना राबवायला हव्यात आहेत. तिथली नैसर्गिक साधन संपत्ती हेरून, जिल्ह्याजिल्ह्यातून विकास केंद्रे (Growth Centres) उभी करायला हवीत. ह्या विकास केंद्रातून माहिती, मार्गदर्शन ह्यांच्याबरोबरच सतत संपर्क राखण्याचेही काम झाले पाहिजे. ज्याला उद्योग काढायचा असेल त्याने आमच्याकडे यावे ही वृत्ती सोडून उद्योजक शोधून काढून त्यांना नव्या धाडसासाठी उद्युक्त करण्याचे काम विविध महामंडळांनी केले पाहिजे. त्यासाठी विविध महामंडळात सहकार्य असले पाहिजे. किंबहुना आज उद्योग विकासार्थ कार्य करीत असलेली अनेक महामंडळे आहेत. ह्या मंडळांनी निव्वळ सहकार्यानेच नव्हे, तर एकमेकांना पूरक म्हणून कार्य केले पाहिजे विशेषत: एखाद्या नवीन विभागाचा विकास घडवून आणायची योजना आखताना तर हे अवश्य घडून यायला हवे. एवढेच नाही तर अशी योजना आखताना त्या विभागातल्या जनतेलाही विश्वासात घेऊन योजनेत सक्रीय सहभागी करून घेतले पाहिजे. एखादे नवीन क्षेत्र औद्योगिक वाढीसाठी हेरले गेले की एम. आय. डी. सी. (महाराष्ट्र उद्योग विकास महामंडळ) प्लॉटस पाडून औद्योगिक विभाग तयार करते. महाराष्ट्र राज्य औद्योगिक व गुंतवणूक महामंडळ (SICOM) त्यावर आर्थिक मदत ओतून धंदे वाढवायसाठी प्रयत्न करते. एवढे झाल्यावर तिथे उद्योजक येऊ लागतात. त्यांच्या योजना MSFC (महाराष्ट्र राज्य वित्तीय महामंडळ) व MSSIDC कडे आल्यावर ह्या संस्थांचा ह्या प्रकल्पांशी संबंध पोहोचतो. त्यामुळे उद्योग आकाराला यायला वेळ लागतो. निकटच्या सहकार्याने हा वेळ कमी करता येईल.

'ह्या उलट एखादे विकासकेंद्र हेरतानाच, मी वर म्हटल्याप्रमाणे जर सर्व महामंडळांनी विचारविनिमय करून योजना आखली,

तर असे प्रकार घडणार नाहीत. स्थानिक उपलब्ध कच्चा माल, स्थानिक तंत्रज्ञान ह्यांचा विचार करून जर अशा योजना आखल्या गेल्या तर उद्योगधंद्याची वाढ पद्धतशीरपणे करता येईल.

'ह्याखेरीज ग्रामीण विभागातून योग्य ते मार्गदर्शनही तरुणांना मिळत नाही. तिथल्या साधन सामुग्रीवर अवलंबून वा अन्य कुठल्याही तऱ्हेच्या लघुउद्योगाच्या उभारणीसाठी त्याला सहाय्याची गरज असते. ही गरज भागवण्यासाठी त्याला निरनिराळ्या महामंडळाच्या कचेऱ्यांकडे हेलपाटे घालावे लागतात आणि तरीही त्यांना अचूक मार्गदर्शन मिळेलच याची खात्री नसते ही वस्तुस्थिती आहे. ज्या प्रदेशांचा विकास व्हावा असे वाटत असेल त्या प्रदेशात लोकांना माहिती व मार्गदर्शन देण्याची सोय प्रथम केली पाहिजे आणि विविध संस्थांची माहिती एकाच विकास केंद्रात उपलब्ध झाली पाहिजे. हे साध्य करण्यासाठी विविध महामंडळात सहकार्य असणे आवश्यक आहे. तालुका पातळीवर आज हे करता येणार नसले तरी, निदान जिल्हा पातळीवरील सर्व संस्थांच्या अधिकाऱ्यांना एकत्र आणून त्यांच्यातर्फे नवीन उद्योजकाला सर्वत्र माहिती एकाच वेळी देता आली पाहिजे. ह्यासाठी जे सहकार्य सीकॉम, सीडको, एमआयडीसी, एमएसएफसी, एमएसएसआयडीसी, विविध विभागीय महामंडळे ह्यांच्यामध्ये व्हायला पाहिजे. असे सहकार्य जिल्हा पातळीवर अस्तित्वात यायला, टिकवायला व राबवायला काहीच हरकत नसावी. एवढे झाले तरी अविकसित प्रदेशांमधल्या नवीन उद्योजकांचे बरेच मोठे काम होऊ शकेल.

'माहिती नि मार्गदर्शन जर असे सुलभ होऊ शकले तर, ठिकठिकाणची स्थानिक साधनसंपत्ती शोधून काढून ती तिथल्या तिथे विकासासाठी पूर्णपणे उपयोगात आणावयाची व त्यासाठी स्थानिक उद्योजक निवडून काढून सुलभ झालेले माहिती व मार्गदर्शन ह्या उद्योजकांपर्यंत पोचवणे हे पुढचे काम राहील.

'ह्या ठिकाणी उद्योजक (ENTREPRENEUR) कोण असू शकतो ते थोडे अधिक खोलात जाऊन पाहाणे श्रेयस्कर ठरेल.उद्योजक हा उद्योगपतीपेक्षा वेगळा आहे. कदाचित उद्योजक हा उद्योगपतीही असण्याची शक्यता असते. परंतु उद्योगपती उद्योजक असेलच, निदान आपल्याकडे–याची खात्री नसते. उद्योजक हा साधारणतः तंत्रज्ञ, कारागीर असतो. स्वतंत्रपणे एखादा व्यवसाय हाताळण्याची क्षमता त्याच्यापाशी असते. त्याच्याजवळ पैसा असला की तो उद्योगपतीही बनू शकतो. परंतु पैसा हाताशी नसूनही खऱ्या अर्थाने उद्योजक असणाऱ्यांना हाताशी धरून त्यांना उद्योगपती बनविण्याचा प्रयत्न करणे शक्य असते. आज निकड आहे ती अशा सुप्त उद्योजकांना शोधून काढून त्यांना प्रोत्साहन देण्याची.

'आपल्याकडच्या बहुतेक सर्व अविकसित भागांचा अभ्यास केला तर असे दिसून येईल की, तिथे काही ना काही नैसर्गिक साधनसंपत्ती उपलब्ध आहे. कोकण, खानदेश, विदर्भातील चंद्रपूर जिल्हा इत्यादी जिल्ह्यांतून जंगले आहेत. जंगलसंपत्तीचा उपयोग करून अनेक प्रकारचे उद्योग उभारता येतील. आंबा, फणस, काजू आदी फळे, मासे ह्या नैसर्गिक देणग्यांचा सदुपयोग करून कोकणात ह्यांच्या लागवडीचे (व मासेमारीचे) व तदनुषंगिक लघुउद्योग वाढविता येतील. साडवलीचा श्री. पटवर्धनांचा सिट्रोनेला गवताच्या लागवडीचा व त्यापासून तेलोत्पादनाचा व्यवसाय हे एक स्थानिक–नैसर्गिक साधनसंपत्ती व स्थानिक उद्योजकता ह्यांच्या मिश्रणातून उभ्या राहिलेल्या सुंदर वस्तूचे उदाहरण आहे. कुडाळच्या तांबड्या मातीचा उपयोग करून उत्कृष्ट मंगलोरी कौले बनवण्याचा श्री. रेगे ह्यांचा वेस्ट कोस्ट अॅग्रो इंडस्ट्रीज हा प्रकल्पही असाच आदर्श आहे. त्याचप्रमाणे सुपारी, नारळ, काथ्या वगैरेंचाही विकास करून कोकणला भारतातला कॅलिफोर्निया खऱ्या अर्थाने बनवता येईल.

'चंद्रपूर जिल्ह्यातही हीच परिस्थिती आहे. गोंद इथल्या जंगलातून वॅगन्स भरभरून बाहेर पाठवला जातो. इथल्या लोकांना प्रशिक्षण देऊन ह्या गोंदावर प्रक्रीया करून, बाटल्या भरून जर तो 'फिनिश्ड प्रॉडक्ट' म्हणून पाठवणारे लघुउद्योग उभे करता येणे सहज शक्य आहे. रेशमी किडे तिथे मिळतात. ते पकडून, त्यांना एका पानावरून दुसऱ्या पानावर हलवून त्यांची वाढ करणे, त्यांच्यापासून रेशीम मिळवणे वगैरे एक कला आहे. इथल्या आदिवासी लोकांना ती कला अवगत आहे. ह्या लोकांना प्रोत्साहन देऊन, त्यांना संघटित करून हा रेशीम मिळवायचा, त्यापासून वस्त्रे विणण्याचा व्यवसाय इथे लघुउद्योगाच्या स्वरूपात पाय रोवू शकेल. लाखही इथल्या जंगलात होते. तो उद्योगही वाढविता येईल. चांद्याची तांबडी माती तर प्रसिद्धच आहे. कोकण, चंद्रपूर ह्या दोन्ही जंगलातून खनिज पदार्थही कमीअधिक प्रमाणात आहेत. खाण उद्योगही त्यामुळे ह्या ठिकाणी फोफावू शकेल व त्यानंतरचे, खाणींवर अवलंबून असलेले छोटे मोठे उद्योग ओघानेच येतील.

'अशीच साधनसंपत्ती जवळ जवळ सर्व जिल्ह्यांमध्ये आहे.अपवाद करावाच लागला तर कदाचित बीड, परभणी, उस्मानाबाद जिल्ह्यांचा करावा लागेल. हे जिल्हे नुसते मागासलेलेच नाहीत, तर तेथे नैसर्गिक साधन संपत्तीही अत्यंत कमी आहे. ह्या दोन–तीन जिल्ह्यांच्या औद्योगिक विकासाचा विचार वेगळ्या रीतीने करावा लागेल.

'ज्याप्रमाणे लघुउद्योगांच्या वाढीतून अविकसित प्रदेशांचा त्या ठिकाणच्या नैसर्गिक साधन संपत्तीवर विकास करणे शक्य आहे, त्याचप्रमाणे अशा जिल्ह्यांमधून काही परंपरागत चालत आलेल्या कला-कारागिरींचाही विकास करून अविकसित प्रदेशांच्या विकासाला चालना देणे शक्य आहे. परकी चक्रांमुळे आणि नंतरच्या आर्थिक सामाजिक नैराश्यातून, औद्योगिक क्रांतीच्या काही ढोबळ कल्पनातून ग्रामीण भागातल्या अशा कलाकारागिरीचा काही अंशी ऱ्हास झाला. काही ठिकाणी त्या मृतप्राय झालेल्या आहेत. ह्या कला कारागिरींना आधुनिक तंत्रांची जोड देऊन त्यांचे पुनरुज्जीवन करणे, त्यांना उत्पादक व व्यावसायिक स्वरूप देणे आज आवश्यक आहे. प्रारंभी कदाचित हे उद्योग कुटीरोद्योगाच्या स्वरूपात असतील. पण ग्रामीण विभागाला जड उद्योग पचवण्यापेक्षा असे त्यांच्या परंपरागत कारागिरीवर आधारीत कुटीरोद्योग आत्मसात करणे सहज साध्य होईल. ह्यातूनच छोटे छोटे उद्योजक असे निघतील की जे काही काळानंतर आधुनिक लघुउद्योग उभारू शकतील.


'ह्या सपूर्ण विवेचनामागचा माझा मुख्य मुद्दा हा की उद्योजक आणि उद्योग हा त्या त्या क्षेत्रातल्या सामाजिक, भौगोलिक, ऐतिहासिक परिस्थितीशी मिळता जुळता असला तर, अविकसित प्रदेशातही व्यवसाय रुजून यशस्वी होणे सहज सुलभ ठरेल. उलट ज्या उद्योगांसाठी आवश्यक कच्चा माल बाहेरून न्यावा लागतो, ज्या उद्योगां

मधल्या तयार मालाला बाजारपेठही दूरचीच आहे, ज्या उद्योगात उद्योजक बाहेरचा आहे आणि जिथे तंत्रज्ञानही बाहेरचेच आहे, असे उद्योग यशस्वी होणे फार कठीण होते. रत्नागिरी जिल्ह्यात वा चंद्रपूर जिल्ह्यात रेफ्रिजिरेटर युनिट्स बनवण्याचा कारखाना चालू शकणे कठीण आहे. ह्या उलट अविकसित भागातही, तिथल्या शेती उत्पादनावर आधारित मोठा उद्योगही स्थानिक ग्रामस्थांच्या सहकारी संस्था अत्यंत यशस्वी करू शकतात. ह्याचे एक उदाहरण मी नेहमी देतो ते मध्यमहाराष्ट्रात पसरलेल्या साखर कारखान्यांच्या जाळ्यांचे. सहकारी साखर कारखाने अविकसित प्रदेशातल्या शेतकऱ्यांनीच प्रामुख्याने एकत्रित येऊन वाढविले आहेत. हे श्रेय तर त्यांना दिलेच पाहिजे. त्या उद्योगाद्वारे त्यांनी अहमदनगर, पुणे, सातारा, सोलापूर, कोल्हापूर, सांगली आदी जिल्ह्यांचा तोंडवळाच पार बदलून टाकला आहे. काही जिल्ह्यातील लोकांना ऊस माहीत होता. इतरत्र पाट-बंधारे झाल्यावर तो वाढला. त्याची मळी काढणं, गूळ बनवणे, गुऱ्हाळे चालवणे हे इथे वंशपरंपरा चालत आलेलं. त्यालाच आधुनिक तंत्राची जोड देऊन उभा केलेला साखर कारखान्याचा उद्योग म्हणूनच त्याच्या सहज पचनी पडला. महाराष्ट्रातली सहकारी साखर कार-खानदारी स्थानिक लोकांच्या हातात आहे हे इथे प्रामुख्याने मला सांगावेसे वाटते.

'कोकणातली जशी परंपरागत कला-कारागिरी आहे, तशी ती मराठवाड्यात आहे, विदर्भात आहे, खानदेशात आहे, सोलापूर-कोल्हापूर-नगर-नासिक विभागात आहे. नैसर्गिक साधन संपत्तीची जोडही आहे. म्हणूनच ह्या कारागिरीतून उद्योजक तयार करून, त्यांच्याकडून व्यक्तीशः वा त्यांच्या संघटित प्रयत्नातून, अविकसित विभागातून उद्योग उभारण्याचा प्रयत्न झाला पाहिजे.

### चंद्रपूर येथील 'क्लिनिक'चा उत्साहवर्धक अनुभव

'अर्थात अशा दृष्टिकोणातून अद्याप पुरेसे प्रयोग झालेले नाहीत. आमच्या महामंडळानेही त्या दृष्टीने हालचाल आताच सुरू केली आहे. निरनिराळ्या जिल्ह्यांची आर्थिक सामाजिक पाहाणी करून समग्र वृत्तांत तयार करण्याचं काम सध्या सुरू आहे. जिल्ह्यातल्या काही महत्त्वाच्या केंद्रांना भेट द्यायची, तिथले स्थानिक पुढारी, लोक प्रतिनिधी, व्यापारी, उद्योगपती, शिक्षक, प्राध्यापक, विद्यार्थी, सामाजिक कार्यकर्ते, विविध संघटना, तिथले सरकारी-निमसरकारी अधिकारी वगैरे प्रमुख गावकऱ्यांच्या सभा घ्यायच्या. स्थानिक विकासाबाबत त्यांच्याशी चर्चा करायची. स्थानिक—नैसर्गिक साधन सपत्तीचा अभ्यास करायचा. ह्यातून संभाव्य छोटया-मोठ्या उद्योगांचा आढावा घ्यायचा. व एकेका जिल्ह्याचा वृत्तांत तयार करायचा अशी आमची योजना आहे. सुरुवातीला रत्नागिरी, धुळे, चंद्रपूर, औरंगाबाद असे चार जिल्हे आणि गोवा, दीवदमण यांची ह्या कार्यक्रमासाठी आम्ही निवड केली आहे. असा अहवाल तयार झाल्यावर त्या त्या जिल्ह्यात उद्योजक विकास केंद्र (Entre-preneur Development Clinic) आम्ही भरवणार आहोत. असे एक क्लिनिक चंद्रपूर इथे नुकतेच पार पडले. क्लिनिक मधून सुरू झालेले कार्य पुढे रेटण्यासाठी उद्योजक व्यासपीठ चंद्रपूर इथे सुरू करण्यात आले आहे. उद्योजकांना त्यांचे संकल्पित उद्योग सुरू करण्याच्या बाबतीत सल्लामसलत, विचार विनिमय आदि मार्गांनी मदत, माहिती व मार्गदर्शन व त्यासाठी ग्रंथालय, उद्योजकांच्या अडचणींचे निराकरण वगैरे कामे हे व्यासपीठ महाराष्ट्रवित्त महामंडळाच्या सहाय्याने आणि मार्गदर्शनाखाली करणार आहे. ह्याच धर्तीवर दुसरे विकास केंद्र धुळे येथे महामंडळाने एप्रीलच्या मध्यावर आयोजित केले आहे.



श्री पानवलकर

'नैसर्गिक साधन संपत्ती, स्थानिक उद्योजक हे सर्व जुळून आले तरी शेवटी उद्योजकाची गाडी अडते ती आर्थिक प्रश्नावर. भांडवलाचा पुरवठा आता पूर्वीइतका दुर्मिळ राहिलेला नाही; परंतु ग्रामीण भागातील लघु उद्योगांच्या अडचणी कायम आहेत, अशा तक्रारी अजूनही कानी पडतात. म्हणून क्लिनिकमधून बाहेर पडणारे संभाव्य उद्योजक व बँकांचे स्थानिक अधिकारी यांना क्लिनिकच्या वेळीच एकत्र आणण्याचा प्रयत्न आम्ही करतो. वित्तीय महामंडळ व प्रादेशिक महामंडळे यांचेही प्रारंभापासून सहकार्य मिळविण्याचे प्रयत्न होतात. आमचा चंद्रपूरचा अनुभव यादृष्टीने बराच उत्साह-वर्धक आहे, हे मला मुद्दाम नमूद केले पाहिजे. ग्रामीण भागातून बँकांना ज्या प्रमाणात ठेवी मिळतात त्याप्रमाणात त्या तेथे कर्जे देत नाहीत, असे रिझर्व बँकेचा अहवालच सांगतो. लघु उद्योगांना प्राधान्य देण्याचे बँकांचे धोरण तळच्या पातळीपर्यंत पोचले तर नव्या उद्योज-कांचा मार्ग अधिक सुलभ होईल.

'एवढे घडून जर उद्योजकांना योग्य वाव दिला गेला तर त्यातून लघुउद्योगांचे जाळे विणले जायला व महाराष्ट्राला औद्योगिक आघाडी मिळून महाराष्ट्रातली प्रादेशिक विषमता दूर होण्यात अडचण राहाणार नाही. म्हणून महाराष्ट्रातल्या लघुउद्योगांचा किंवा एकूणच औद्योगिक क्रांतीचा विचार करताना, इथल्या प्रादेशिक विषमतेचा, नैसर्गिक साधनसंपत्तीचा व स्थानिक लोकामधल्या सुप्त उद्योजकतेचा विसर पडता कामा नये असे मला वाटते.' □ □

# नवीन उद्योजकांना आज खूप अनुकूल काळ आहे....

## मा. आबासाहेब गरवारे



उद्योगधंद्यांची वाढ होण्यासाठी शासन आज नाना तऱ्हेने सोई सवलती उपलब्ध करून देत आहे. निरनिराळ्या जिल्ह्यात औद्योगिक क्षेत्रे निर्माण करून स्वस्त दराने किंवा सोईस्कर भाडे पट्ट्याने कारखान्यासाठी जमीन उपलब्ध करून देण्यात येते. काही औद्योगिक क्षेत्रात तयार कारखान्याच्या इमारतीही भाड्याने मिळू शकतात. अशा ठिकाणी वीज, पाणी, ड्रेनेज या सोई आपोआपच तयार असतात. शिवाय विजेच्या वापरासंबंधीही सवलतीचे दर, कच्च्या मालाच्या पुरवठ्यासाठी अग्रहक्क, विक्रीकराबाबत सवलती, शासकीय संस्थांना मालाची विक्री करताना किमतीबाबत सवलती अशा अनेक प्रकारे लघु उद्योगाना सध्या शासनातर्फे उत्तेजन देण्यात येत असते.

सर्वारंभाः तण्डुला प्रस्थमूलाः। या तत्त्वानुसार उद्योग काढण्यास लागणारे भांडवली द्रव्यसाहाय्यही दीर्घ मुदतीसाठी सवलतीच्या व्याजाच्या दराने महाराष्ट्र राज्य वित्तीय महामंडळाकडून उपलब्ध होते. लघुउद्योजकास स्वतःचे मांडवल उभे करणेही शक्य नसते असे आढळून आल्यामुळे विभागीय विकास महामंडळाकडून बीज भांडवल (Seed Capital) म्हणून भांडवली गुंतवणुकीच्या दहा टक्केपर्यंत मिळू शकते. सारांश, १०० रुपयांचा भांडवली विनिमय करावयाचा असेल तर लघु उद्योजकास ७५ रुपये कर्ज वित्तीय महामंडळ देते, १० रुपये विकास महामंडळ बीज भांडवल या स्वरूपात देते. म्हणजे स्वतःचे केवळ १५ रुपये घातले तर ८५ रुपयापर्यंतची रक्कम दीर्घ मुदतीच्या सवलतीच्या कर्जरूपाने उपलब्ध होते. औरंगाबाद, रत्नागिरी व चंद्रपूर या मागासलेल्या जिल्ह्यात तर या शिवाय १५ टक्के केंद्रसरकारकडून अनुदान उपलब्ध होते. थोडक्यात भांडवली गुंतवणुकीच्या बाबतीत नवीन उद्योजकास सढळ हाताने शासकीय संस्थांकडून साहाय्य होत असते. विदर्भातील चंद्रपूर, भंडारा, यवतमाळ, बुलढाणा, पश्चिम महाराष्ट्रातील धुळे, जळगाव, कुलाबा, रत्नागिरी व मराठवाड्यातील पाचही जिल्हे अशा एकंदर तेरा जिल्ह्यात ७½ टक्के या सवलतीच्या दराने दीर्घ मुदतीचे कर्ज उद्योगधंद्यांसाठी उपलब्ध होऊ शकते.

स्वाभाविकपणेच मनात येते की इतकी मदत मागच्या पिढीत, नव्हे १० वर्षांपूर्वी सुद्धा शासनाकडून उपलब्ध होत नव्हती. नवयुवकांना एक परीने हे आव्हान आहे. 'अनंत हस्ते कमलावराने, देता किती घेशिल दो कराने' अशीच जणू परिस्थिती आहे. तरीही नवीन उद्योजकांची संख्या जितकी वाढावी तितकी वाढलेली दिसत नाही, असे कां ?

मला तरी असे म्हणायला हरकत दिसत नाही की, द्रव्यदृष्ट्या किंवा अन्य सोई सवलतीच्या दृष्टीने शक्य तेवढी मदत शासन करीत आहे. अर्थात आजच्या पद्धतीत सुधारणा करायला वाव नाही असे नव्हे. तशा सुधारणा अवश्य करता येतील. शासन त्यादृष्टीने प्रयत्नशील राहीलच. पण उद्योजक म्हणून तुम्ही आम्ही काय करतो, काय करायला पाहिजे याचा थोडासा शोध आपणच घ्यायला पाहिजे. शासकीय किंवा सार्वजनिक यंत्रणांमध्ये उणीवा नाहीत, दोष नाहीत असे कुणीच म्हणणार नाही. पण त्या दोषांकडे बोट दाखवून उद्योजकाने आपल्या उणीवांकडे दुर्लक्ष करून कसे चालेल ? तसे वागणे व तशी मनःप्रवृत्ती ठेवणे त्याच्या अंतिम हिताचे नाही.

कित्येक वेळा, उद्योजकांना या शासकीय व वित्तीय संस्था तसेच बँका यांचे व्यवहार, त्यांची कार्यपद्धती यांची जुजबी माहितीही नसते. अशी माहिती सुलभपणे उपलब्ध करून देणे, प्रशिक्षण देणे ही जरी या सार्वजनिक संस्थांची जबाबदारी असली व ती पार पाडण्यात त्यांच्या कर्मचाऱ्यांकडून थोडी फार चालढकल होत असली तरी उद्योजकांनी स्वतःच्या अज्ञानाचा दोष दुसऱ्यावर ढकलून काम होणार नाही.

उद्योग सुरू करण्याचा निर्णय घेण्यापूर्वी उद्योजकाने मनात आणलेल्या धंद्यासंबंधी माहिती स्वतः जमा केली पाहिजे. त्या धंद्यातील खाचाखोचा, अडचणी, समजून घेतल्या पाहिजेत. आपला प्रकल्प कुठे काढावयाचा याचा निर्णय घेताना, कच्च्या मालाचा पुरवठा, कच्च्या मालाची वाहातूक, पुरवठ्यात कालमानाप्रमाणे (उन्हाळा पावसाळा) होणारे बदल व त्यानुसार होणारे किमतीतील चढ-उतार यांचा बारकाईने अभ्यास करायला पाहिजे. प्रक्रिया करण्यासाठी किंवा उत्पादन करण्यासाठी केवढी इमारत बांधली पाहिजे याचा वास्तव अंदाज घ्यायला पाहिजे. कारखान्याच्या इमारतीचा आराखडा एकदा नव्हे दहादा स्वतः तपासला पाहिजे. माझ्या माहितीतल्या एका उद्योजकाने बर्फाचा कारखाना काढायचं ठरवलं. फॅक्टरीची इमारत बांधायला घेतली व नंतर पाण्याकरता विहीर खोदायला सुरुवात केली तेव्हा विहिरीला पाणीच लागेना. विहिरीला पाणी लागेल याची पक्की खात्री करून न घेता त्याने बांधावयास घेतलेल्या बर्फाच्या कारखान्याची इमारत आता वाया गेली ना ? दुसऱ्या एका कारखानदाराने इमाम-

रतीचा आराखडा तज्ञाकडून संमत करून घेतला पण तिथे मशिनरी बसवायला लागणाऱ्या ज्या अत्यावश्यक सोईंची गरज होती, त्याच त्याने विचारात घेतल्या नाहीत. परिणामी, त्याचा भांडवली खर्च मुळात ७० लाख रुपये होता, तो ८५ लाखांवर गेला. इमारत बांधून पुरी झाली तरी मशिनरी जागेवर येऊ शकली नाही. परिणामी उत्पादन सुरू होण्यास दोन वर्षे उशीर झाला, व त्याचे नफातोटयाचे सगळेच गणित चुकलं. आणखी एकाने, छापखाना घालताना जमीन स्वस्तात आहे म्हणून गावाबाहेर इतक्या लांब छापखाना सुरू केला की त्याला कामगार मिळण्यास अडचण पडू लागली. कागद, छापाईची कामे यांची वाहतूक करण्याचा खर्च इतका वाढला की त्याचा खर्च हाताबाहेर गेला.

तेव्हा कारखाना काढताना तो कुठे म्हणजे कोणत्या जिल्ह्यात, गावात काढायचा एवढंच महत्त्वाचं नसतं तर वस्तीपासून किती दूर कोणत्या दिशेला काढायचा हेही महत्त्वाचं असतं हे विसरून चालत नाही. अर्थात एखादा छापखाना, बर्फाचा कारखाना किंवा हॉटेल गावापासून दूर काढून चालणार नाही. त्या त्या प्रकल्पाच्या स्वरुपानुसार, स्थानिक परिस्थितीनुसार हे निर्णय घ्यावयाचे असतात.

### अनुत्पादक खर्च

धंद्याच्या पुढील वाढीसाठी वाव ठेवून कारखान्याच्या जमिनीचे क्षेत्रफळ ठरवावे हे खरं असलं तरी सुरुवातीसच जमीन किंवा कारखान्याच्या इमारतीवर किती भांडवली विनिमय करावा हेही ठरवणं महत्त्वाचं. जमीन किंवा इमारतीवर होणारा खर्च प्रायः उत्पादक नसतो. त्याचा बोजा फार पडला तर धंद्यासाठी लागणाऱ्या खेळत्या भांडवलाची चणचण भासते व अडचणी उत्पन्न होतात. तेव्हा आपण सुरू करीत असलेल्या धंद्याची वाढ पुढील ५-१० वर्षात किती होऊ शकेल याचा पद्धतशीर अंदाज बांधला पाहिजे. नाहीतर, जमीन व इमारतीच्या अनुत्पादक भांडवलावर फार खर्च होऊन, नफ्याचे प्रमाण कमी होते व सर्व अंदाज चुकतात. माझ्या माहितीतल्या एका फर्निचर करणाऱ्या कारखानदाराने एवढी प्रचंड इमारत बांधून ठेवली की त्यातला काही भाग भाड्याने देण्याची पाळी त्याच्यावर आली; पुढे हा भाडेकरी इमारतीतून बाहेरच पडेना व कोर्टकचेऱ्या करण्याची पाळी आली.

कारखान्याच्या इमारतीचा आराखडा तयार करण्यासाठी आपण आर्किटेक्ट नेमीत असलो तरी सगळ्याच आर्किटेक्टना कारखान्यांच्या गरजांची नीटशी कल्पना असते असे नाही. आपल्या कारखान्याच्या गरजा, फॅक्टरी इन्स्पेक्टर, उद्योगखाते, नगरपालिका, एम. आय. डी. सी. यांच्या नियमांचा उद्योजकाने पद्धतशीर अभ्यासच करायला हवा. व मग आर्किटेक्टकडून काम करवून घ्यावे. नाहीतर आर्किटेक्ट त्याच्या मते इमारतीचा नकाशा उत्तम काढतो पण त्यात वैगुण्ये उरतात व ती निस्तरावी लागतात उद्योजकाला. मुंबई जवळच एका तरुण उद्योजकाने कारखान्याची इमारत बांधली १॥ लाख रुपयांची. त्यात मशिनरी बसवायची होती ती फक्त रुपये ३५ हजारांची. परिणामी त्याचा भांडवली खर्चाचा अंदाज चुकला व खेळत्या भांडवलासाठी त्याला २० टक्के दराने खाजगी कर्जे काढावी लागली व धंदा नफ्यांत कसा आणायचा याच्या विवंचनेत तो पडला.

धंद्याकरता लागणाऱ्या यंत्रसामग्रीसंबंधी तर कितीतरी सांगण्यासारखे आहे. आपला धंदा नेमका किती उत्पादनापर्यंत वाढविता येईल, त्यासाठी लागणारे किती भांडवल आपण उभे करू शकतो, बाजारात मागणी किती आहे, स्पर्धेचे स्वरूप कसे आहे, कच्चामाल रास्त किमतीत किती मिळू शकेल, अशा अनेक प्रश्नांची उत्तरे स्पष्ट झाल्याशिवाय आपली उत्पादनक्षमता व साधारण उत्पादन किती असावे हे ठरविणे कठीण असते. यावरच यंत्रसामग्रीची क्षमता ठरते. यंत्रे कुणाकडून घ्यावी, त्याची देखभाल कशी होईल याची संपूर्ण माहिती घेणे अगत्याचे असते. एकाच साधारण कामगिरीचे यंत्र तयार करणारे अनेक कारखाने असतात पण, त्याच्या उत्पादनक्षमतेत त्यासाठी लागणाऱ्या साहित्यात फरक असतो. तेव्हा, कोणत्या कंपनीचे यंत्र घ्यावे हे उत्पादकानेच ठरवायचे असते. यंत्रसामग्रीची निवड करण्यात फसगत होण्याची शक्यता असते, म्हणून ती यंत्रे वापरीत असलेल्या काही उद्योगधंद्याकडून आवश्यक ती माहिती कौशल्यानेच मिळवावी लागते. नामवंत अशा मशिनरी सप्लायरकडून घेतलेल्या यंत्रातही दोष आढळल्यामुळे नवीन कारखानदार अडचणीत येऊ शकतो. त्याच्या उत्पादनात दोष येतात, उत्पादन कमी मिळते किंवा कधीकधी उत्पादनात खंडही पडू शकतो. नवीन उद्योजकाने, म्हणूनच आपल्या धंद्यासाठी लागणाऱ्या यंत्रसामग्रीची निवड करतांना फार सावधगिरी बाळगावी लागते. किरकोळ दोष दुरुस्त करण्याची हिंमतही बाळगायला पाहिजे. उत्पादनक्षमता, बाजारातील चढाओढ याबद्दल तर शेकडोनी ग्रंथ उपलब्ध आहेत. पण दुसऱ्यांच्या अनुभवाचा ग्रंथ आपण डोळसपणे वाचला पाहिजे. पुस्तकी ज्ञानापेक्षा प्रत्यक्ष आसपास होणाऱ्या घडामोडींचा अभ्यास हा खरा मार्गदर्शक ठरतो.

### व्यवहारज्ञानाची कास

लग्न करताना मुलगी कशी असावी, याबद्दल आपले नातेवाईक पुष्कळ सल्ला देऊ शकले तरी संसारातील आपली जोडीदारीण निवडण्याची जबाबदारी ज्याची त्यानेच स्वीकारायला हवी, तसेच धंदा कुठे व कोणता काढायचा हे ज्याचे त्यानेच ठरवायला हवे. नोकरी पेशात सुद्धा ज्या गोष्टींना महत्त्व असते. ह्या स्वयंउद्योगात तर फारच महत्त्वाच्या ठरतात. एखाद्या युवकाला शाळा कॉलेजांच्या परीक्षेत उत्तम गुण मिळून तो उत्तीर्ण झाला तरी तो उत्तम शिक्षक होतोच असे नाही. उलट कित्येकदा स्वतः उत्तम विद्यार्थी असणारा उत्तम शिक्षक असत नाही. तसेच व्यवहारातही होते. शाळेत, विद्यापीठ शिक्षणात एखाद्याने जरी उत्तम यश संपादन केले तरी व्यवहारात तो मागे पडल्याची अनेक उदाहरणे आढळतात. एम्. ए. ला सुवर्णपदक मिळविणाऱ्या एका तरुणाला बँक व्यवहाराची जुजबी माहिती व समजही नाही असे मी पाहिले आहे. ह्या व अशा अनेक उदाहरणांवरून स्पष्ट दिसते की, युवकांनी उद्योग व्यवसायात पदार्पण करतांना व्यवहारज्ञानाची कास धरली पाहिजे. आपले सध्याचे शालेय, विद्यापीठीय शिक्षण कसे आहे, त्यात काही उणीवा आहेत का हे सांगण्याचे हे स्थान नव्हे, ते माझे क्षेत्रही नाही. पण एवढे मात्र खरे की आपण जर उद्योगक्षेत्रात पडणार असलो तर आपण आपला दृष्टीकोन बदलला पाहिजे. दहाजणांबरोबर वागायचे कसे, डोळसपणे अवलोकन करायचे कसे व

इतरांच्या वागणुकी व्यवहारापासून कसे शिकत राहायचे हे आपले आपणच ठरवले पाहिजे.

उद्योगधंदा सुरु करताना, कारखान्याची आखणी करताना, कोणत्या वस्तूचे उत्पादन करावयाचे हे ठरवताना, आता म्हटले तसे, जर अगोदरपासून डोळसपणे अवलोकन करीत राहिले तर येणाऱ्या अडचणी कमी होतील.

म्हणून नवीन उद्योजकांनी पूर्वतयारी काय करावी हे लेखातून सांगता आले तरी त्यालाही मर्यादा राहातातच. जिल्ह्याजिल्ह्यातील भौगोलिक, स्थानिक परिस्थिती, वाहतुकीच्या सोयी, रेल्वे-रस्ते यांची माहिती, लहानमोठ्या बाजारपेठा, तेथील व्यापारी वर्ग, कच्च्या मालाच्या पुरवठ्यातील चढउतार एक ना दोन नाना गोष्टींची माहितीच नव्हे तर त्यांचे आकलन असणे अगत्याचे असते. लघुउद्योगांना शासनाकडून काही कच्च्या मालाचा पुरवठा अग्रहक्काने होत असला तरी प्रत्येक कारखान्यास लागणारा सर्वच्या सर्व कच्चा माल शासनसंस्था पुरवू शकत नाही, हे लक्षात ठेवले नाही तर कारखाना पूर्ण वेळ चालू ठेवता येत नाही. म्हणून अशा मालाचा पुरवठा अन्य ठिकाणाहून किती होऊ शकेल, खुल्या बाजारातील किंमतीत माल खरेदी करूनही आपण धंदा नफ्यात कसा चालू ठेवू शकू याचाही अंदाज घ्यावयास हवा. सध्या कच्च्या मालवस्तूंच्या अपुऱ्या पुरवठ्यामुळे अनेक लघुउद्योजक अडचणीत आले आहेत. कामगारविषयक कायदेकानू, नियम यांची तर माहिती अत्यावश्यक असते. कामगारांचे सहकार्य कसे मिळवावे, त्याचे तर शास्त्रच आहे. प्राथमिक महत्त्वाची गोष्ट ही की, कामगार हे जणू आपले भागीदारच आहेत अशी सद्भावना ठेवून आपण काम केले पाहिजे म्हणजे अडचणी कमी येण्याची शक्यता.

भांडवलाची जुळवणी, उत्पादनाच्या तंत्रात यंत्रांची मशागत, तसेच कामगारांचे सहकार्य व बाजारपेठातील व्यवहाराचे यथायोग्य आकलन या उद्योजकाच्या यशासाठी आवश्यक गोष्टी ठरतात. यांची जाणीव ठेऊन व इतर स्पर्धकांचे अनुभव डोळसपणे समजून घेऊन जर आपण उद्योगक्षेत्रात पाऊल टाकले तर नवयुवक या क्षेत्रात यशस्वी होऊ शकतात. 'वाकड्या मेढीला वाकडेच नेम पाहिजे' अशी कोकणात म्हण आहे. म्हणजे जो खांब जमिनीत पुरायचा तो जर थोडासा वेडावाकडा असला तर खड्डाही तसाच पाहिजे. उद्योजकाने व्यवसायात यशस्वी होण्यासाठी येणाऱ्या परिस्थितीला तोंड देयासाठी आपली मनोभूमिका मिळती जुळती ठेवायला पाहिजे.

समाधानाची गोष्ट ही आहे की, गेल्या दहा वर्षांत मराठी तरुण मोठ्या संख्येने उद्योग-उत्पादनक्षेत्रात पुढे येत आहेत. मराठी माणूस उद्योगक्षेत्रात मागस होता हे खरे, पण आज मात्र धडाडीने उत्पादनक्षेत्रात शिरणाऱ्या युवकांची संख्या वाढते आहे. शासनाकडून व इतर संस्थांकडून मिळणाऱ्या उत्तेजनाला युवक मंडळी साथ देत आहेत असे म्हणायला हरकत नाही. दहा वीस वर्षे नोकरीपेशात घालविलेली पस्तिशी चाळीशीतील माणसेही उद्योगधंदा सुरू करण्यास प्रवृत्त होताना दिसतात; यशस्वीही झालेली आढळतात. अनुभवी इंजिनियर, केमिस्ट, स्वयंउद्योग सुरू करून यशस्वी झाल्याची अनेक उदाहरणे आज दिसू लागली आहेत. ही प्रसादचिन्हे उत्तेजक आहेत. या तंत्रज्ञ उद्योजकांच्या उद्यमशीलतेमुळेच व्यापक प्रमाणावर आपल्या औद्योगीकरणाचा पाया घातला जात आहे. धाडस, कष्टकरण्याची तयारी व डोळस अनुभव या शिदोरीवर उद्योगक्षेत्रात पदार्पण करणाऱ्या उद्योजकांना वाव पुष्कळ आहे व वातावरणही अनुकूल आहे.

□ □

## माओक्रांतीची पार्श्वभूमी

अविकसित भागामध्ये आपल्याला काय आढळते याचा आपण बारकाईने विचार केला तर कदाचित योग्य असा मार्ग आपल्याला सापडू शकेल. ज्यांना आपण अविकसित प्रदेश मानतो ते जवळजवळ सगळेच प्रदेश दारिद्र्यावस्थेत आहेत. तेथील लोकांचे जीवनमान निकृष्ट दर्जाचे आहे. शिक्षणाचा प्रसार तेथे अगदी अलीकडे होऊ लागलेला आहे आणि तेथील शेतीही निसर्गावर अवलंबून असलेली आणि परंपरागत अशा स्वरुपाची आहे. कनिष्ठ प्रतीच्या शेतीवर जेव्हा अमर्याद लोकसंख्येचा भार पडतो तेव्हा दारिद्र्याशिवाय दुसरी गोष्ट संभवतच नाही. या भागामध्ये वाहतूक आणि दळणवळणाच्या सोयी अत्यंत अल्प आणि त्याही निकृष्ट दर्जाच्या असल्याचे लक्षात येते. तेथे स्थानिक रोजगाराची संधी अत्यल्प असते आणि परिणामतः ज्यांच्या अंगी सुप्त कर्तृत्वशक्ती असते त्यांना वावच मिळत नाही. गुणांना किंवा कर्तृत्वाला जेव्हा योग्यवेळी उचित संधी मिळत नाही तेव्हा ते गुण आणि कर्तृत्व निष्प्रभ बनू लागतात आणि मग नशिबी आले ते भोगीत राहिले पाहिजे अशी दैववादी वृत्ती निर्माण होते. अशा परिस्थितीमध्ये जगणारा माणूस जेव्हा शहरी भागातील संपन्नता पाहतो तेव्हा त्याच्या मनात कटुता निर्माण झाली तर आश्चर्य वाटण्याचे कारण नाही. आपल्या गाऱ्हाण्यांना वाचा फोडण्यासाठी अविकसित भागातील लोक जेव्हा अविवेकी मार्गांचा अवलंब करतात किंवा चिडीला येऊन बोलतात तेव्हा त्यामागील पार्श्वभूमी ही अशी असते हे आपल्याला विसरता येणार नाही. अशा परिस्थितीमध्ये भरपूर विकसित झालेली मोजकी उद्योगकेंद्रे आणि उपेक्षित राहिलेले विस्तृत प्रदेश असे दृश्य दिसू लागणे ही धोक्याची सूचना आहे. बहुसंख्य खेड्यांनी काही थोड्या उद्योगकेंद्रांना वेढून क्रांती घडवून आणण्याची माओची कल्पना याच परिस्थितीतून निघालेली आहे आणि त्यामुळे ही परिस्थिती वेळीच बदलणे हे आता अपरिहार्य होऊन बसले आहे.

—म. वि. पानवलकर

# धडाडीचे दोन तरुण तंत्रज्ञ

र. शं. वावगावकर

सोलापूर येथील औद्योगिक वसाहतीत सुरू करण्यात आलेल्या पॅराली केमिल्स या उद्योगाचे प्रवर्तक आहेत तिशीच्या आतलेच दोन तरुण तंत्रज्ञ. भरपूर उच्च शिक्षण घेतलेले. नवनिर्माणाच्या विचारांनी भारलेले अन् त्यासाठी वाटेल ते कष्ट उपसण्याची तयारी ठेवणारे.

श्री. सुरेश बापूराव मोकाटे हे मराठवाड्यातले. त्यांनी नागपूरच्या लक्ष्मीनारायण टेक्नॉलॉजिकल इन्स्टिट्यूटमधून मॅट्रोकेमिकल्स विषयातली एम्. टेक्. ही पदवी सन्मानाने मिळविली. त्यांचे सहकारी आहेत श्री. केशरीकुमार चतुर्भुज नागदा. मूळचे अहमदनगरचे. पुणे विद्यापीठातून १९६९ साली त्यांनी बायोकेमिस्ट्रीमध्ये एम्. एस्सी. ही पदवी घेतली. श्री. मोकाटे ह्यांनी शिक्षणानंतर एक वर्षभर केमिकल इंजिनियर म्हणून काम केले. अहमदनगर जिल्ह्यातील साकरवाडीच्या सोमय्या ऑरगॅना केमिकल्स ह्या संस्थेत. तेथेच रीसर्च ॲण्ड डेव्हलपमेंट विभागात श्री. नागदा हेही तीन वर्षांपासून केमिस्ट म्हणून काम करीत होते. दोघांची चांगलीच गट्टी जमली.

केमिस्ट म्हणून काम करीत असतानाच ह्या दोघांना पॅरालडिहाईड नावाच्या द्रव्याचा शोध लागला. शोध लागला ह्याचा अर्थ हे द्रव्य त्यांनी नव्याने शोधून काढले असे नव्हे. ते अनेक वर्षांपासून तंत्रज्ञांना ज्ञात होतेच. परंतु आजवर भारतात त्याचे उत्पादन केले जात नव्हते. स्वित्झर्लंडमधून त्याची आयात केली जाई. कारण परवडण्याजोगी सुलभ व अल्पखर्चाची पद्धत भारतात उपलब्ध नव्हती.

## परकीय चलनाची बचत

पॅरालडिहाईडचा उपयोग सौंदर्य प्रसाधनासाठी तसेच सुगंधी द्रव्यांच्या व्यवसायात 'सॉल्व्हंट' म्हणून केला जातो. शिवाय ते एक चांगले कीटनाशक आहे. थोड्या मात्रेत प्रत्यक्ष इंजेक्शन देऊन त्याचा गुंगी आणण्यासाठी देखील उपयोग केला जातो. भारतात ह्या द्रव्याची दरवर्षी ३०० टन एवढी गरज असून आजवर त्यासाठी सत्तावीस लाख रुपयांचे परकीय चलन खर्च होई. आता श्री. मोकाटे आणि श्री. नागदा ह्या तंत्रद्वयांनी हे द्रव्य येथेच तयार करण्यासाठी सोलापूरला कारखाना उभारला आहे.

सोलापूर शहरात हाटगी रस्त्यावरील औद्योगिक वसाहतीत ७७ आणि ७७ ए ह्या क्रमांकांच्या दोन प्लॉटवर ह्या कारखान्याची उभारणी करण्यात आली असून प्रत्यक्ष उभारणीचे काम देखील ह्या दोन तरुणांनी स्वतःच्या देखरेखीखाली व अनेकदा स्वतःच्या हाताने केले आहे. सुरवातीच्या उभारणीच्या काळात हे दोघे दररोज चौदा ते सोळा तास खपत. आजही सकाळी आठपासून संध्याकाळी उशिरापर्यंत दोघेही आपल्या कारखान्यात सतत उद्योगात मग्न असतात.

श्री. मोकाटे हे मराठवाड्यातले, त्यांचे शिक्षण झाले नागपूरला अन् उद्योग उभारला तो सोलापूरात, हे कसे काय ह्याबद्दलचे काहीसे कुतूहल मनात जाणवल्याने त्यांना त्याबद्दल विचारले. तेव्हा श्री. मोकाटे म्हणाले, साकरवाडीला पॅरालडिहाईडच्या प्रक्रियेची कल्पना गवसली. हा उपक्रम सुरू करता येईल तर बरे असा विचार मनात मूळ धरू लागला. त्यासाठी मार्ग चोखाळू लागलो. पण पुरेसा प्रतिसाद मिळेना. दरम्यान सोलापूरच्या अलाईड डाईज लिमिटेड ह्या कंपनीने कन्सल्टन्ट म्हणून बोलावले. त्यानुसार सोलापूरला आलो. मनात स्वतंत्र व्यवसायाची कल्पना धगधगत होती. पण ती प्रत्यक्षात उतरेपर्यंत काहीतरी उद्योगव्यवसाय करणे आवश्यकच होते. म्हणून सोलापूरचे निमंत्रण स्वीकारले.

सोलापूरला आल्यानंतर महाराष्ट्र शासनाच्या उद्योग विभागाकडे संकल्पित योजनेचा आराखडा सादर केला. ह्या विभागाने योग्य ती पाहणी करून आमचा प्रस्ताव १९७२ च्या ऑगस्टमध्ये महाराष्ट्र राज्य वित्तीय महामंडळाकडे धाडला. फेब्रुवारी १९७३ मध्ये त्याला मान्यता मिळाली आणि वित्तीय महामंडळाकडून १ लाख ९३ हजार रुपयांचे कर्जही मंजूर करण्यात आले. ह्यापैकी २० हजार रुपयांची रक्कम खेळत्या भांडवलाच्या स्वरूपात होती.

बँक ऑफ महाराष्ट्राने देखील १५ हजार रुपयांचे कर्ज दिले. शासनाने आमच्या कर्तृत्वशक्तीवर विश्वास प्रगट केला म्हणूनच हा प्रकल्प उभा राहिला. श्री. मोकाटे मोठ्या उत्साहाने सांगत होते.

## रोज अर्ध्या टनाचे उत्पादन

पॅरालडिहाइड तयार करण्यासाठी ॲसिटॉल् डिहाईड नावाचे कच्चे द्रव्य लागते. ते कोल्हापूरहून व साकरवाडीच्या सोमय्या ऑरगॅना केमिकल्स ह्या कारखान्यातून मिळते. हा पदार्थ अल्कोहोलजन्य आहे. आज पॅराली कॅमिकल्सची क्षमता रोज अर्धा टन उत्पादन करण्याची आहे. आणखी भांडवल मिळाले व प्रकल्प वाढविता आला तर रोज दीड टनापर्यंत पॅरालडिहाईड सहज तयार करता येईल. अशी प्रवर्तकद्वयांची उमेद आहे. आपल्या कारखान्यात ह्या तंत्रज्ञांनी लिक्विड फेज फिक्स्ड बेड रिॲक्टरचा वापर केला आहे. भारतात अशी पद्धत प्रथमच उपयोगात आणली जात आहे, असे श्री. नागदा म्हणाले. ह्यापुढे ॲसिटालडिहाईड ह्या कच्च्या द्रव्याचेही उत्पादन सुरू करण्याचा त्यांचा विचार आहे. त्यामुळे कच्चा माल स्वस्त पडेल व उत्पादनाची किंमतही कमी करता येऊ शकेल, असे ह्या तंत्रज्ञांना वाटते. वस्तूला गंध देणाऱ्या कीटॉन्स व उच्च अल्डिहाईड्च्या पृथःकरणाच्या प्रयत्नात सध्या श्री. नागदा गुंतले आहेत. त्यात त्यांना बरेचसे यशही आले आहे. त्यांच्या ह्या पद्धतीमुळे कोणताही पदार्थ गंधहीन (ओडरलेस) करणे सोपे, अल्पखर्चाचे होईल असा त्यांना विश्वास वाटतो. शिवाय विविध पदार्थातील मूळ गंधद्रव्येही ह्या पद्धतीने उपलब्ध करून देता येतील.

एकूण प्रकल्पाच्या बांधणीस ह्या तंत्रज्ञाना आतापर्यंत ६३ हजार रुपये खर्च आला आहे. संपूर्ण कारखान्याचे ड्रॉईंग, डिझायनिंग, सिव्हिल कन्स्ट्रक्शन आणि फॅब्रिकेशन ह्या दोघांनी स्वतःच केले आहे. प्रसंगी कुदळफावडे अन् खिळा हातोडा हातात घेऊन प्रत्यक्ष अंगमेहनतही केली आहे.

सोलापुरात आता हा कारखाना उभारी धरू लागला आहे. औद्योगिक वसाहतीतील १२० बाय १२० फुटांच्या दोन प्लॉटस्मध्ये त्याचे देखणे रूप आकारास आले आहे. ह्या उद्योगमुळे त्यावर आधारित वा त्याच्याशी संबंधित अशा अन्य केमिकल उद्योगांनाही चांगला आधार मिळू शकेल व त्यांची वाढ सोलापुरात होऊ शकेल, असे श्री. मोकाटे व श्री. नागदा ह्यांना वाटते.

श्रीमती नागदा ह्याही पुणे विद्यापीठातून बायोकेमिस्ट्री हा विषय घेऊन एम्. एस्सी. परीक्षा उत्तीर्ण झालेल्या सुविद्य तरुणी आहेत. सध्या त्या पुण्याच्या वाडिया हॉस्पिटलमध्ये काम करतात. लवकरच त्याही श्री. नागदा ह्यांचेबरोबर त्यांच्या व्यवसायात सामील होण्याच्या विचारात आहेत. ○

## भकास कोकणचं हिरवंगार, समृद्ध नंदनवन होऊ शकेल !

# श्री. मनोहर जोशी यांची मुलाखत

माणूस प्रतिनिधी

श्री. भाऊसाहेब नेवाळकरांची मुलाखत आटोपून मी श्री. मनोहर जोशांच्या कोहिनूर क्लासेसमध्ये पोचलो. लघुउद्योगाच्या संदर्भात, श्री. मनोहर जोशी जवळ जवळ अर्धा तास बोलत होते. कोहिनूर क्लासेस ह्या त्यांच्या संस्थेचीदेखील त्यांनी मला माहिती दिली. ह्या खेरीज कोहिनूर ट्रान्सवेज हा ट्रान्स्पोर्ट व्यवसाय, कोहिनूर टीन फॅक्टरी हा पत्र्यांचे डबे बनविण्याचा व्यवसाय, मोटार ट्रेनिंग स्कूल वगैरे त्यांच्या अनेक संस्थांचा त्यांनी मला परिचय करून दिला. '...ह्यातले बहुतेक सर्व माझे भागिदारीतले व्यवसाय आहेत आणि भागिदार हा बहुधा त्या त्या क्षेत्रात स्वत: काम करणारा आहे... कोहिनूर क्लासेस ह्या संस्थेची उभारणी करताना देखील मी असा एक दृष्टिकोण बाळगला की, इथल्या शिक्षणक्रमाने स्वत:च्या धंद्यात शिरणारा मराठी तरूण बाहेर पडावा...लघुउद्योग विकास महामंडळ, MSFC, बँका वगैरे संस्था आज इतके सहकार्य द्यायला तयार आहेत की, कष्टाला तयार असणाऱ्याला धंद्यात शिरायसाठी पैशांची अडचण आज जवळ जवळ नाहीच असे म्हटले तरी चालेल. आणि ह्या संधीचा फायदा मराठी तरूण ह्व्या त्या प्रमाणात उचलीत नाहीत हे माझे दु:ख आहे...मराठी तरुणानी परंपरागत नोकरीची चाकोरी सोडून उद्योगधंद्यात उडी घेतली पाहिजे असे मला वाटते. त्यात त्याला अडचणी येणारच. पण त्यावर इतरांचा सल्ला घेऊन, योग्य मार्ग काढून मात करणे हाच खरा उपाय आहे. अडचणी येतात, धंद्याचा सराव नाही, म्हणून ते धाडसच न करणे हे मात्र शहाणपणाचे लक्षण नाही. तसे झाले तर इथे उडप्यांचीच हॉटेले फुलतील, सरदारजीच्याच टॅक्स्या वाऱ्याशी स्पर्धा करीत धावतील,गुजराथ्यांच्याच फॅक्टऱ्या उभ्या राहातील. ही सारी मंडळी रुबाबात ऊंची ब्लॉक्समधून राहातील आणि आमचा मराठी तरुण मात्र दूरवर उपनगरांतल्या दहा बाय दहाच्या खुराडयातून आजच्या सारखाच लोकल पकडायला धावत राहील. हे चित्र बदलले पाहिजे. आणि तसे बदलायला पाहिजे असेल तर मराठी तरुणानी जिद्दीने स्वत:चे व्यवसाय उभारले पाहिजेत...त्यातल्या अडचणीवर मराठी बाण्याने मात करून विजय मिळवले पाहिजेत...राजकीय आघाडीवर मराठी माणसाच्या मुंबईतल्या अस्तित्वासंबंधी भांडून विजय मिळवल्यावर, ते अस्तित्व टिकवण्यासाठी औद्योगिक, आर्थिक आघाडीवरही विजय मिळवले पाहिजेत ! मराठी तरुणाला हे मोठे आव्हान आहे आणि ते त्याने स्वीकारलेच पाहिजे–इतरांच्या स्पर्धेत मराठी माणसाला मान ताठ करून जगता यावे असे वाटत असेल तर...'

आमदार मनोहर जोशांच्या ह्या विचारांबाबत दुमत व्हायचे काही खास कारण नाही. आपल्या संस्थेतर्फे, मराठी तरुणांना स्वतंत्र व्यवसायासाठी उद्युक्त करण्यासाठी ते झटताहेत देखील ! परंतु पैशाच्या अडचणीसंबंधी आ. जोशी जे म्हणतात त्याबाबत मात्र अनेकांचे दुमत आहे. खुद्द मुंबईत व नंतर ठाण्यात अनेक छोटया छोटया व्यावसायिकांना भेटलो. बोटावर मोजण्याइतके काही थोडे सोडले तर, इतर बहुतेक सर्वांनी, '...त्यापेक्षा MSFC, NSSIDC चं लोन, सहकार्य न मिळाले तरी चालेल,' असेच सांगितले. 'त्यापेक्षा खाजगी भांडवल उभे करणे सोयीचे ठरते, इतक्या एम. एस. एफ. सी. NSSIDC वगैरेंच्या कटकटी असतात !...त्यांच्या 'प्रोसिजर्स 'मध्ये एखादा उद्योजक अडकला की संपला. पाच-पाच, सहा-सहा महिने त्याला लोन मिळत नाही.' एम. एस. एफ. सी. त खेटे घालून कंटाळलेल्या व शेवटी तिथल्या लोनचा नाद सोडून खाजगी पार्टीकडे गेलेल्या ठाण्यातल्या एका उद्योजकाची ही प्रतिक्रिया ! श्री. देसाई हे दुसरे एक उद्योजक. नोकरी सोडून धंद्याकडे वळलेले. तंत्रज्ञ योजनेखाली (Technical Assistanec Scheme) ह्यांनी छोटया व्यवसायासाठी, MSFC कडे लोन मागितले. MSSIDC कडे मशिन्स मिळवण्यासाठी सहकार्य मागितले. नोकरी सोडल्यावर सहाय्य प्राप्त व्हायला त्या व्यक्तीला तब्बल सात महिने लागले. ह्या दोन्ही महामंडळांचे अक्षरश: शेकडो वेळा उंबरठे झिजवावे लागले.

ह्याशिवाय ठाण्यातले श्री. करंदीकर, श्री. पवार, मुंबईतले श्री. बावीस्कर आदि तरुण उद्योजक म्हणाले, '...ह्या सर्व योजनातून फक्त ७५ ते ८५% सहकार्य उद्योजकाला मिळते. पण महाराष्ट्रातल्या बहुसंख्य मराठी तरुणाची परिस्थिती आज अशी आहे की, उरलेले १५ ते २५% पैसे उभे करणेही त्याला अशक्य असते. अशांना ह्या योजनेपासून काही फायदा मिळतो असे वाटत नाही. हाही पैसा व नंतर खेळता पैसाही त्याला बाहेरूनच उभा करावा लागतो व नंतरही, गाडी नीट रुळावर येईपर्यंत त्याला उधारउसनवारीच करावी लागते. ह्यातच मराठी तरुण ढेपाळतो. सर्व पैसा आज धंद्यात पडू इच्छिणाऱ्या उपलब्ध आहे असे सांगितले जाते. काही स्कीम्स त्याच्यापुढे मांडल्या जातात. पण घ्याव्या लागणाऱ्या जागेसाठी द्याव्या लागणाऱ्या 'ऑन 'ला कर्ज मिळताना कुठलेही महामंडळ वा बँक मान्यता देत नाही हे त्याला लौकरच कळते आणि मांडलेली आकडेवारी चुकीची होती हे त्याच्या लक्षात येऊ लागते. खेळत्या भांडवलाचीही तीच गत. कित्येक बिले कुणी देतच नाही हे त्याला उमगते

तेव्हा तो आणखी हादरतो. ह्या बिलांच्या जोरावर पुढील कर्ज घ्यायचे इमले त्यांनी आखलेले असतात, ते ढासळतात. इथेही त्याचे हिशोब पार चुकतात अन् तो पूर्णपणे भांबावून जातो...'

मुंबई-ठाणे परिसरातच बँका, शासकीय संस्था वगैरेतर्फे त्वरित सहाय्य मिळते असे मला सांगितले गेले होते. पण प्रत्यक्षात, ह्या परिसरात असे फायदे उचलणाऱ्या लघु उद्योजकांचे प्रमाण व्यस्तच सापडते. जे असे सहकार्य मिळवतात, त्यांच्याही विविध संस्थामधील बेपर्वा वागणुकीच्या तक्रारी असंख्य आहेत. एकाच प्रोजेक्टसाठी अनेक खात्याकडे हेलपाटे घालून एकच गोष्ट त्याच्या मनावर बिंबते— ह्या सर्व संस्थांमध्ये परस्पर सहकार्य नावालाही नाही. त्यामुळे त्याचा त्रास वाढतोच !

पण एवढे असले तरी याच परिसरात असे सहाय्य जास्तीत जास्त दिलेही गेले आहे. मोठ्या व मध्यम उद्योगांच्या फार मोठ्या केंद्रीकरणामुळे, ह्या उद्योगावर आधारित लघुउद्योगही ह्याच परिसरात वाढले आहेत. ह्याच अंकाच्या पहिल्या लेखात मी म्हटल्याप्रमाणे, लघुउद्योग हे मोठ्या उद्योगांचे 'सॅटेलाईट्स' ह्याच स्वरूपात वाढल्याने, ह्या त्रिकोणातले लघुउद्योगांचे केंद्रीकरण सहजच घडून आले आहे आणि ह्याच भागात लघुउद्योग नव्याने वाढतही आहे.

ह्यातल्या असंख्यांनी बँकांचे सहाय्य घेतले आहे व बँकांकडून मिळणाऱ्या सेवेबद्दल ते खूशही आहेत. गेल्या काही दिवसातल्या रिझर्व बँकेच्या फतव्यामुळे बँकांचे सहकार्य आता थोडे आखडते होऊ लागले आहे ते वेगळे. पण एरवी एम. एस. एफ. सी, MSSIDC, MIDC वगैरेबाबत मात्र ह्या मंडळीत बराच रोष आढळतो. या 'संस्थाना'मधला लाल फितीचा प्रभाव, दफ्तर दिरंगाई, बेदरकार प्रवृत्ती खाबूगिरी हीच प्रामुख्याने रोषाची कारणे ! काही उद्योजक अर्थातच या संस्थांविषयी चांगलेही बोलताना आढळले.

ह्याखेरीज एक फार मोठा वर्ग मला असा आढळला की, ज्यांना ह्या संस्थांच्या विविध योजनांची धड माहितीच नाही ! जे माहिती करून घ्यायसाठी धडपडत निरनिराळ्या कार्यालयांच्या ऑफिसेसमधून गेले तेव्हा त्यांना धड उत्तरेच मिळाली नाहीत अशाही अनेक तक्रारी ऐकू आल्या. काहींनी ह्या संस्थांचे विविध छापील फॉर्म्स पाहूनच आपण त्यांच्या योजनाविषयी कंटाळलो असेही सांगितले.

पैशांची अडचण, माहितीचा प्रभाव, अंगमेहनतीचा कंटाळा, अपुरे मार्गदर्शन वगैरे कारणे असावीत कदाचित; पण ठाणे-मुंबई-पुणे परिसरात पसरलेल्या बहुसंख्य लघुउद्योगांची मालकी बिगर महाराष्ट्रीयनांकडेच आहे हे नक्की ! एरवी ह्या परिसरातल्या उद्योगामध्ये विशेष असे काही नाही. कापड, केमिकल्स, औषधी, प्लॉस्टिक्स, रिफायनरीज, इलेक्ट्रिकल्स, लोखंड आदि क्षेत्रातले जे प्रचंड कारखाने ह्या परिसरात व विशेषतः मुंबईत स्थिरावलेले आहेत त्यांनाच पूरक असे लघुउद्योग इथे उभे आहेत. त्यांना लागणारा कच्चा माल इथे भरपूर प्रमाणात उपलब्ध (सध्याची सार्वत्रिक तंगी हा अपवाद !) आहे. तसेच मुंबईची मोठी बाजारपेठही त्यांना जवळ आहे....

आमदार मनोहर जोशांनी मनात निर्माण केलेल्या अनेक प्रश्नाकडे, मुंबई-पुणे-ठाणे विभागाचे हे त्रोटक चित्र मनापुढे उभे राहिले. ह्या विभागातून मी ह्या आधीच बराच हिंडलो आहे...

बरोबर रात्री दहा वाजता आमच्या रातराणीने चिपळूणसाठी परळ सोडली. सकाळी चिपळूणला पोचलो. चिपळूणला नवीन औद्योगिक वसाहत उभी राहात आहे. चिपळूण ही रत्नागिरी जिल्ह्यातली परंपरागत अशी सर्वात मोठी बाजारपेठ, त्यामुळे ५॥-६ वाजता आपण चिपळूणला पोचलो तरी आपल्याला काहीतरी नवीन पाहायला मिळेल ही अपेक्षा मी मनाशी बाळगली होती. पण प्रत्यक्षात ७-७॥ ला पोचून देखील, एस. टी. स्टॅण्ड सोडला तर सारे चिपळूणच अगदी शांत शांत वाटत होते. आठ-सव्वा आठपर्यंतचा वेळ स्टॅण्डवरच चहा पीत, दैनिक सागर (चिपळूणचे स्थानिक वृत्तपत्र) वाचून काढला. दैनिक सागरचे संपादक श्री. निशीकांत जोशी ह्यांनी 'लघुउद्योग' मासिकाच्या एका अंकात चिपळूण येथील 'खेर्डी' औद्योगिक वसाहतीसंबंधी एक लेख लिहिला आहे. त्यात ते म्हणतात, '...इथल्या वसाहतीची ही प्रगती पाहिली की, काही वर्षातच, चिपळूणचे कोल्हापूर होणार याची खात्री पटल्याशिवाय राहाणार नाही...' श्री. जोशी ह्यांचा लेख आठवताच, मी स्टॅण्डवरून बाहेर पडलो. सामान एका हॉटेलात पटकले. तिथल्याच मुलाकडून सायकल पैदा केली आणि खेर्डीच्या दिशेने कूच केले.

'खेर्डी' चिपळूणपासून दोन मैलावर आहे. तिथेच ही औद्योगिक वसाहत आकार घेत आहे. मी तिथे पोचलो तेव्हा, होते नव्हते तेवढे आठ-दहा छोटे छोटे उद्योग अद्याप जागे होत होते. वाटेत कोकण विकास महामंडळाच्या अखत्यारीतल्या हातमाग प्रकल्पाची पाटी लागली. मी आपला मोर्चा तिकडे वळवला. अरविंद मफतलाल ह्यांच्या सहकार्यातून कोकण विकास महामंडळ हा प्रकल्प राबवीत आहे. मुंबईच्या विविध कापड गिरण्यातून असंख्य कोकणवासीय मंडळी आहेत. कापड विणण्याची कला त्यांना सहज अवगत झाली आहे. अशातल्या ज्यांना आपल्या जिल्ह्यात परतायची इच्छा असेल त्यातल्या साधारणतः दोनशे कामगारांना एकत्रित करून हा प्रयोग सुरू आहे. महाराष्ट्र शासनातर्फे यंत्रमाग मिळवून ते ह्या दोनशे कामगारांना पुरवले गेले आहेत. ह्या कामगारांना जिथे हे यंत्रमाग बसवले गेले आहेत, त्या जागेच्या जवळच घरे पुरवली गेली आहेत. ह्या साऱ्याच्या बदल्यात फक्त रु. १००।– सुरुवातीला घेऊन ती रक्कम त्यांच्या नावे शेअर्सच्या रूपात जमा करण्यात आली आहे. तूर्त त्यांना पीस रेटवर इथे काम मिळते. कालांतराने ह्या कारखान्याची संपूर्ण जबाबदारी ह्याच मंडळीवर सोपवण्याचा महामंडळाचा विचार आहे. त्यावेळी ह्या आजच्या कारखान्याचा विकास होऊन कदाचित त्याचे रूपांतर संपूर्ण गिरणीत व्हायचे आहे. कामधंद्यानिमित्त मुंबईत गेलेल्या कामगाला परत आपल्या जिल्ह्यात आणून त्याचे पुनर्वसन करायचे, त्याला एका मोठ्या कारखान्यात हक्काचे काम करण्याची संधी मिळवून द्यायची हा एक मोठा धाडसी प्रयोग आहे ! तितकाच तो अनुकरणीय आहे ! महामंडळाचे अध्यक्ष श्री. माधवराव आपटे यांना हा प्रयोग यशस्वी होईल ह्याची खात्री वाटते.

## काही वर्षातच चिपळूणचे कोल्हापूर होणार !

...ह्याच धर्तीवर इतरही असा प्रयोग करण्याचा आमचा मानस आहे... शिवाय कोकणातल्या साधन संपत्तीवर आधारीत इतरही उद्योग उभारण्याचा आमचा संकल्प आहे. समुद्र सान्निध्यामुळे तिथे मीठ भरपूर मिळू शकेल. त्यापासून कॉस्टिक सोडा प्रकल्प तिथे आम्ही हातात घेणार आहोत. बॉक्साईटवर आधारीत प्रकल्पही आम्हाला राबवायचा आहे. जंगले, फळबागा, लांबच लांब समुद्र-किनारा आणि इथली खनिज संपत्ती ह्यांचा पुरेपूर उपयोग करून घेऊनच इथले उद्योग वाढवता येतील. उगाच एखादा मोठा इंजिनियरिंग वा प्लास्टिक-केमिकल उद्योग हाताळून इथे चालायचे नाही. आमचा प्रयत्न त्याच दिशेने चालू आहे. इथली साधन संपत्ती, इथले मनुष्यबळ ह्यांच्या जिवावर कोकणचा खरा विकास साधता येईल. बाहेरच्या उपऱ्या आयातीवर नाही !...

यंत्रमागाचा हा प्रायोगिक उद्योग, शासकीय दूध योजना ह्या खेरीज परशुराम पेपर अ‍ॅण्ड बोर्ड मॅन्युफॅक्चरींग कंपनी, रेडीज स्टील हे दोन होऊ घातलेले मोठे उद्योग इथे आहेत. काजूपासून तयार होणाऱ्या फेणीचे व ब्रँडीचे उत्पादन इथल्या देवकर डिस्टिलरीज मध्ये सुरू आहे. ह्याखेरीज स्थानिक वाळूवर प्रक्रीया करण्याचा शिल्पा इंडस्ट्रीज हा लघुउद्योग भरभराटला आहे. एक्सपोर्ट ऑर्डर्सही अल्पावधीतच ह्या छोटयाशा कारखान्याने मिळवल्या आहेत. मूळ कच्चा माल स्थानिक असल्यास कारखाना कसा उभा राहू शकतो, त्याचे हे उत्तम उदाहरण आहे !...

## सिट्रोनेला गवत

ह्याच वसाहतीत असलेल्या त्रिमूर्ति प्लास्टिक कॉर्पोरेशनचे श्री. गोखले हे इथल्या फेडरेशन ऑफ इंडस्ट्रीजचे एक पदाधिकारी आहेत. त्यांना 'कोकणात एखादा मोठा प्रकल्प टाटा, बिर्ला वगैरे सारख्यांना उभा करण्यास भाग पाडल्यावाचून इथे लघुउद्योग तग धरू शकणार नाहीत' असे वाटते. खेर्डीच्या औद्योगिक वसाहतीबाबत ते MIDC वर बराच रोष दाखवतात. '... ६३ मध्ये प्लॉटसचे वाटप झाल्यानंतर ८ वर्षांनी ह्या विभागात वीज उपलब्ध झाली, रस्त्यांची थोडीवहुत आखणी झाली. ७१ पर्यंत बँकींगची धड सोय नव्हती. त्यामुळे प्लॉटस घेऊन ठेवलेल्यांची कुचंबणा झाली. त्यातच पूर, भूकंप वगैरे आपत्ती. इथे उद्योग उभेच करायचे की नाही इथपासून इथल्या लोकात चर्चा सुरू झाल्याने इथली वसाहत खूपच मागे पडली... ५०० एकरांच्या ह्या वसाहतीत आज ५० पैकी एकूण फक्त पाच युनिटस चालू आहेत. १३ सुरू व्हायच्या मार्गावर आहेत. बाकीच्यांचा काहीच ठिकाणा नाही... इथे लघुउद्योग उभा करतो म्हणून सांगून सवलती घ्यायच्या, एखादी शेड उभारण्याचे नाटक सुरू करायचे आणि सवलती मात्र मुंबईत वापरून मोकळे व्हायचे असेही अनेक प्रकार इथे होत आहेत.. म्हणून लघुउद्योगासाठी शक्यतो स्थानिकच माणसे निवडली गेली पाहिजेत... बँकांचे विशेष सहकार्य इथे नाही, MSFC, MSSIDC च्या कामाला इतका वेळ लागतो की माणूस शेवटी कंटाळून जातो आणि त्याची योजना रेंगाळतच राहाते... कच्च्या मालाचा प्रश्न फारच जाणवतो व म्हणून वाटू लागले आहे, शेती किंवा फळे किंवा मच्छिमारी ह्यांच्यावर अवलंबून असलेला उद्योगच, लघुउद्योगात, सध्या तरी (जो पर्यंत एखादा मोठा उद्योग इथे सुरू होत नाही!) निवडला गेला पाहिजे... त्या दृष्टीने साडवली येथील सिट्रोनेलाचा प्रयोग उत्कृष्ट आहे'

चिपळूणहून रत्नागिरीला पोचल्यावर श्री. भाऊसाहेब पटवर्धन ह्यांच्या सप्तलिंगी फलोद्यान कृषिउद्योगाची माहिती बरीच मिळाली. एस. टी. ह्या फलोद्यानाच्या बाजूनेच जाते. आणि ती तशी जाताना ह्या कृषीउद्योगात लावलेल्या सिट्रोनेला गवताचा उग्र दर्प नाकात जाऊन बसतो. ह्या गवतापासून तेल गाळण्याचे कामही इथेच केले जाते. सिट्रोनेला गवतापासून मिळणाऱ्या तेलात सिट्रॉन हा पदार्थ मिळतो व त्याचाच सुगंधी तेलाच्या निर्मितीत उपयोग होतो. सिट्रॉन (किंवा सिट्रोनिलाल) खेरीज टोटल जिरॅनिऑल, जिरॅनिऑल प्युअर, सिस्क्वी, टर्पिन्स वगैरे द्रव्येही ह्या तेलात असतात. सावण, तंबाखू, तपकीर, उदबत्ती, धूप, दीप, चंदन तसेच शुद्ध अल्कोहोल, सौंदर्य प्रसाधने औषधे वगैरे अनेक व्यवसायात सिट्रोनेला तेलातले विविध घटक वापरले जातात. त्यामुळे भारतात आज वरील विविध उद्योगांना मिळून किमान ५०० टन तेल लागते. परंतु भारतात त्याचे उत्पादन मात्र जवळ जवळ काहीच नव्हते असे म्हटले तरी चालेल. रत्नागिरीत, कोकणातल्या साधन संपत्तीवर अवलंबून असेच उद्योग वाढविले पाहिजेत, ह्या मताच्या श्री. पटवर्धनांनी रत्ना कॅनिंग फॅक्टरी सुरू केली आहे. त्यांनीच देवरूख तालुक्यातल्या साडवली येथे हा नवीन उपक्रम चाळीस एकर जागेवर सुरू केलेला आहे. सिट्रोनेला गवताची रोपटी बाहेरून आणून त्यांनी हे फुलोद्यान कृषीउद्योग केंद्र इथे फुलवले आहे. तिथेच तेल निर्मितीसाठी आवश्यक यंत्रसामुग्रीची जोड देऊन तेही केंद्र सुरू केलेले आहे. तिथले तेल आज सर्वच्या सर्व खपत असून तेलाला खूपच मागणी आहे. श्री. गंगाधरभाऊ पटवर्धनांच्या ह्या प्रकल्पाला महाराष्ट्र राज्य वित्तीय महामंडळानी लाखावर रुपयांचे सहाय्य देऊन उचलून धरले आहे... आज हा व्यवसाय फुलतो आहे. फळतो आहे...

श्री. गंगाधरभाऊ पटवर्धन मात्र स्वतःच्या एका प्रकल्पावर समाधान पावून शांत बसलेले नाहीत. जिल्हाभरचे शेतकरी गोळा करून त्यांच्यामार्फत जिल्हाभर सिट्रोनेला उत्पादन सुरू करायचा त्यांचा प्रयत्न सुरू आहे. त्यासाठी गवताचे बियाणे आणि रोपटी पुरविणे, गवत विकत घेणे, गवत गाळून त्याचे तेल काढून घेणे वगैरे अनेकविध सहाय्यही श्री. पटवर्धन करतात. त्यांच्याच प्रयत्नातून, सिट्रोनेला गवताची लागवड करू इच्छिणाऱ्या प्रत्येक शेतकऱ्याला एकरी २५०० रुपयांचे सहाय्य देण्याची योजना बँक ऑफ इंडियाने आखली आहे. लागवडीची सविस्तर माहिती देखील श्री. पटवर्धन सर्वांना पुरवतात, सभा घेऊन त्याचे विवेचन करतात. साधारणतः पहिल्या वर्षी एकरी निव्वळ फायदा रु. ५०० ते ७०० च्या घरात पडतो. हाच फायदा पुढील वर्षापासून २५००–३००० रु. पर्यंत वाढत जातो. शिवाय कामगारांचे प्रमाणही वाढते. असे भरघोस फायदे देणाऱ्या या व्यवसायाने कोकणवासियांच्या जीवनात क्रांती घडून येऊ शकेल अशी आशा भाऊंना वाटते...

भाऊंचाच रत्ना कॅनिंग हा भागिदारीतला व्यवसाय रत्नागिरीत उभा आहे. फळांचे कॅनिंग हा प्रामुख्याने ह्या फॅक्टरीतला उद्देश. पण केवळ फळांवर अवलंबून राहून वर्ष धकत नाही हे दिसल्यावर, फळे मिळणार नाहीत तेव्हा माशांचे कॅनिंगही इथे सुरू केले आहे.

'...आंवा. इतर फळफळावळांच्या ह्या माहेरघरात, एका कारखान्यापुरेशीही फळे मिळू नाहीत याचे एकमेव कारण म्हणते बागायतीकडे लोकांचे लक्षच उरले नाही. तो उद्योग वाढेल तेव्हाच कॅनिंग वाढेल.'

फळबागा, फळांचे कॅनिंग, काजूपासूनची दारू ह्या उद्योगांबरोबरच फार मोठा किनारा लाभलेल्या ह्या भागात मच्छिमारीही जोरात सुरू असते. व तदनुषंगिक व्यवसायही काही प्रमाणात! पण बहुतेक धंदा परंपरागत पद्धतीने चालू आहे. ट्रॉलर्ससाठी MSFC सहाय्य देत असूनही, त्याचा प्रसार थोडा आहे. फ्रीझींग प्लँटस् फारसे नाहीत. कॅनिंग देखील विशेष नाही. चौगुले आदि उद्योगपतींचे कारखाने आता उभे राहात आहेत. पण त्यांना मूर्त स्वरूप येऊन त्यातून छोटे उद्योग उभे राहायला वेळ लागणार आहे. पण कुडाळमध्ये श्री. वसंत नागवणे नावाचा एक ध्येयवादी तरुण आजूबाजूच्या लोकांना एकत्रित आणून ह्या धंद्यात त्यांना आधुनिकतेची ओळख देत पुढे नेत आहे. हा तरुण सुशिक्षित आहे. वेगवेगळ्या शिष्यवृत्त्या मिळवून त्याने अमेरिकेत जाऊन उच्च शिक्षणही मिळवले आहे. पण त्यानंतर अमेरिकेत वा देशात मिळणाऱ्या मानाच्या नोकऱ्या लाथाडून हा ध्येयवेडा तरुण स्वतःच्या समाजाच्या उन्नतीसाठी, स्वतःच्या विभागाच्या विकासासाठी, स्वतःच्या गावी येऊन स्थायिक झाला आहे. पॉवर टीलर्स भाड्याने द्यायचा तिथे त्याने व्यवसाय सुरू केला आहे. महाराष्ट्र ॲग्रो इंड. डे. कॉर्पोरेशनची निर्मिती करून स्वतःच्या समाजातील लोकांना संघटित करून पुढे न्यायची धडपड सुरू केली आहे...

## मोठाले उद्योग हवेत !

अशाच जिद्दीतून, धडपडीतून कुडाळ येथेच श्री. रेगे ह्यांचा मंगलोरी कौले करण्याचा कारखाना उभा राहिला आहे; प्रगतीपथावर त्याची वाटचाल सुरू आहे... हे काही तुरळक प्रयोग रत्नागिरीत सुरू असले तरी एकंदरीत इथल्या स्थानिक साधनसंपत्तीचा, कला कारागिरीचा हवा तसा उपयोग करून घेतला जात नाही असेच म्हणावे लागेल...हर्णे, चिपळूण येथील भांडी बनविण्याची कला, कोसुंबचे विणकाम किंवा तिथल्या बांगड्या, सावंतवाडीची खेळणी वगैरे परंपरागत कला आज लुप्त होऊ पाहात आहेत. आणि इथे जो काही उद्योजकांचा वर्ग राहू पाहात आहे, त्याचीही अशी ठाम समजूत झालेली दिसते की, 'मोठाले दोन-चार उद्योग उभे राहिल्याशिवाय कोकण लघुउद्योगांची वाढ होणे अशक्य आहे. आमच्या मालाला इथेच उठाव पाहिजे. त्याला इथेच मोठ्या उद्योगांकडून काम मिळाले पाहिजे. तरच लघुउद्योग विकास शक्य आहे...' इति श्री. सावंत.

इथल्या इंडस्ट्रीज फेडरेशनचे पदाधिकारी श्री. शिर्के ह्यांची मतेही साधारणतः चिपळूणच्या श्री. गोखल्यांप्रमाणेच आढळली. विशेषतः बँकेवर त्यांचा रोष फार आढळला. पण इथल्या विविध संस्थांच्या (MSFC, MSSIDC, MIDC. IC वगैरे) पदाधिकाऱ्यांच्या मते मात्र इथल्या लोकांच्यात उत्साह नाही. त्यामुळे इथे कितीही प्रयत्न केले तरी प्रगती हळूहळूच होणार!

चिपळूण, रत्नागिरी, कुडाळ वगैरेंच्या मानाने रोह्याची औद्योगिक वसाहत भरभराटलेली दिसली. मोठमोठाले व्यवसाय तिथे उभे आहेत. त्या आधारावर काही लघुउद्योगांनाही सुरुवात झाली आहे. पण स्थानिक जनतेत मात्र इथल्या या औद्योगिक वसाहतींबद्दल काही निराशा आढळते. ह्याचे महत्त्वाचे कारण म्हणजे इथे आलेला बहुसंख्य उद्योजक बाहेरचा आहे. उभे राहिलेले कारखाने इथल्या नैसर्गिक, भौगोलिक, किंवा पारंपरिक परिस्थितीशी सुसंगत नाहीत. परिणामतः तंत्रज्ञान व कुशल तंत्रज्ञही बाहेरूनच आयात करावे लागले आहेत. साहाजिकच स्थानिक जनतेत त्यामुळे रोष आढळतो. 'सिकॉम'ने इथली औद्योगिक वसाहत उभारली; व उद्योजक इथे आणले. पण तसे करताना जर अन्य महामंडळांशी सल्लामसलत करून कुठले उद्योग इथे आणायचे ह्याचे नियोजन केले असते तर, स्थानिक जनता अशी डावलली गेली नसती असे मला वाटते...' रोह्याला ऐकायला मिळालेली ही एक प्रतिक्रीया ('नाव देता येत नाही' कारण संबंध बिघडू नयेत ही सदिच्छा आहे!)

## सर्वत्र चीड जाणवली

रोह्याचीच गत तळोद्याला आहे. पण मुंबई, ठाणे ह्या औद्योगिक परिसरापासून ही वसाहत एवढी जवळ आहे की तिथे ही प्रतिक्रीया तेवढीशी तीव्र नाही...

ठाणे ते रत्नागिरी आणि काही अंशी मुंबईतही एक प्रतिक्रीया मात्र सतत आढळली. विविध महामंडळाच्या कार्यपद्धतीबद्दल सर्वत्र थोडी चीड आढळली. विशेषतः प्रत्येक ठिकाणी, गोष्टी करून घेण्यासाठी जो प्रदीर्घ वेळ लागतो त्यासंबंधी चीड आढळली तर मुंबई, पुणे, ठाणे ह्या शहरापासून जसजसे दूर जाऊ तसतसे बँकांविषयीही चीड जाणवली! आणि ह्या सर्व चिडीमागे बहुधा ह्या महामंडळांविषयीच्या पुरेशा माहितीचा अभाव हेही कारण आढळले. अर्थात ह्या मंडळांविषयी चांगले बोलणाऱ्या व्यक्तीही आढळल्या. व त्यावरूनच पुरेशी माहिती लोकांना नीट मिळत नाही हीच भावना माझ्या मनात तरी दृढ झाली...

शासनाविषयीच्या चिडीचे मोठे उदाहरण आढळते ते सुधागड तालुक्यातल्या (जि. कुलाबा) पडघवली येथील रबर उत्पादन प्रकल्पात! सर्वजण विरोधात असताना (विशेषतः मध्यवर्ती शासन व अखिल भारतीय रबर उत्पादक संघ!) श्री. केतकर व इतरांनी जिद्दीने पडघवली येथे रबर लागवडीचा उपक्रम हाती घेतला आहे. वनअधिकारी, कृषिअधिकारी सर्वांचा विरोध. अ. भा. रबर उत्पादन संघात वर्चस्व प्रामुख्याने केरळी ख्रिश्चनांचे. रबराची लागवड केरळ बाहेर होऊच द्यायची नाही असा जणू त्यांनी चंग बांधलेला. देशातल्या सर्व रबर कारखान्याकडून, भारतीय रबर उद्योगासाठी काही रक्कम 'अनिवार्य' म्हणून गोळा केली जाते. ह्या रकमेतून रबर उत्पादकाना काही मदत दिली जाते. पण पडघवली उपक्रमाला ती नाकारली गेली. कारण एवढंच की, कोकणात रबराची लागवड अशक्य आहे, शक्य झालीच तर ती अतिशय खर्चिक आहे अशी रबर संघाची कल्पना आहे. केंद्रात त्यांचे खुंटे इतके घट्ट आहेत, की त्यांच्या विरोधात, केंद्र शासन कोकणातल्या ह्या प्रकल्पाला कुठलीही मदत देऊ शकत नाही आणि राज्य शासनही ह्या बाबतीत ढीम्म आहे. (मध्यंतरी ना. अंतुले ह्यांनी मात्र काही प्रयत्न केले हाच काय तो एकमेव अपवाद!)

परंतु ह्या प्रतिकूल परिस्थितीतूनही श्री. केतकर आणि मंडळी आपला मार्ग शोधून काढीत आहेत. त्यांनी हरप्रयत्ने, कोकणातल्या खडकाळ जमिनीत पडघवली येथे त्यांनी रबराची लागवड केली आहे. पुढील वर्षी ह्या उजाड प्रदेशातून रबर गोळा केले जाईल अशी

अपेक्षा आहे. ह्या रबराच्या लागवडीवरून बोध घेऊन महाराष्ट्र शासनानी कोकणात रबराच्या लागवडीसाठी शेतकऱ्यांना प्रोत्साहन दिले, आर्थिक मदत दिली, तर उद्या इथे रबराचे छोटे मोठे उद्योग उभारून कोकणातल्या उजाड, उदास, डोंगराळ, खडकाळ भागात अक्षरशः नंदनवन फुलवता येईल अशी ह्या प्रकल्पाच्या नेत्यांची धारणा आहे...

गेल्या कित्येक वर्षांत अविकसित प्रदेशांच्या विकासाकडे दुर्लक्षच केले गेले. पण आज जे रबराचे, सिट्रोनेलाचे प्रयोग कोकणासारख्या विभागात जिद्दीने राबवले जात आहेत ते पाहिले म्हणजे वाटते, अर्थपूर्ण औद्योगिकरणाची चाहूल आताशी लागू लागली आहे. ह्यातून लघुउद्योग विकास व लघुउद्योगातून अविकसित भागांचा विकास घडून येईल अशी आशा मनात बाळगायला हरकत नाही... ●

१. सिट्रोनेला गवताच्या लागवडीसंबंधी अधिक माहिती कुणाला हवी असेल तर त्यांनी पुढील पत्त्यावर संपर्क साधावा. श्री. गंगाधर-भाऊ पटवर्धन, सप्तलिंगी फलोद्यान कृषी उद्योग, साडवली. (तालुका देवरूख जिल्हा रत्नागिरी)

२. तसेच कोकणातल्या रबर लागवडीची माहिती पुढील ठिकाणाहून मिळू शकेल : श्री. आर. जी. केतकर, सुधागड रबर इंडस्ट्रीज प्रा. लि., पडघवली, तालुका सुधागड, जिल्हा कुलाबा.




# म्हातारपण

हल्लीच्या अनिश्चित जीवनात एकच गोष्ट निश्चित आहे. ती म्हणजे आपण सर्वजण केव्हा तरी वृद्ध होणारच! म्हातारपण काही कुणाला टाळता येणार नाही.

प्रकृति उत्तम असली तरीही म्हातारपण सुखासमाधानात जातंच असं नाही, तर प्रकृतीच्या जोडीला आर्थिक दृष्ट्या स्वतंत्र असणंही तितकंच महत्वाचं आहे. हल्ली एकत्र कुटुंबपद्धती नाहीशी होत आहे. तेव्हा निवृत्तीनंतर आपली कुणीतरी काळजी वाहील, या आशेवर रहाणे योग्य नव्हे. निश्चिंत व सुखी वृद्धापकाळाची आजपासूनच तरतूद करण्याचा एकमेव मार्ग म्हणजे आयुर्विमा. आजच मुदतीचा विमा घ्या म्हणजे योग्य तरतूद आपोआपच केली जाईल.

*आयुर्विम्याला पर्याय नाही!*

PRATIBHA·1510·20·MAR

# कोकण ते मराठवाडा

प्रतिनिधी

कोकण संपवून कोल्हापूर, पुणे, अहमदनगर, नासिक, उरकीत मनमाड मार्गे मी औरंगाबादेस पोचलो. कोकण आणि मराठवाडा ह्या दोहोंच्या मधला हा पट्टा ह्या दोन्ही प्रदेशांच्या मानाने चांगलाच विकसित झालेला आहे. पुण्याच्या औद्योगिक विकासाबद्दल काही खास लिहायची आवश्यकताच नाही. विविध महामंडळे, बँका नि त्यांची कार्यपद्धती, त्यांच्याकडून मिळवायचे सहाय्य ह्या विषयी पुणेकर तरुण चांगलाच जागरुक दिसतो. मुंबईत उद्योगधंद्यांची गर्दी खूपच झाल्याने उद्योगधंदे पुढे जेव्हा खाली सरकू लागले, तेव्हा मुंबईलगतचा ठाण्याचा परिसर व पुढे पुणे हीच अपरिहार्यपणे दोन महत्त्वाची केंद्रे ठरली. मोठाले उद्योग तिथे स्थिरावू लागले. वहातूक दळणवळणाच्या इतर सोयी ह्यामुळे धंदे इथे पटकन् फोफावू पण लागले. ह्याचा साहाजिक फायदा लघुउद्योगाला मिळाला. मुंबईत महाराष्ट्रीयेतरांचे जास्त प्रमाण, मुंबईतला धंदेवाईक वर्गही प्रायः तोच. ओघानेच, मुंबईतल्या लघुउद्योजकात बिगर महाराष्ट्रीयनांचे प्रमाण वाढले. पुण्यात त्या मानाने मराठा तरुण उद्योगधंद्यात (विशेषतः लघुउद्योगात !) बराच पुढे राहिला. टिकूही शकला. अर्थात तिथेही पुण्याच्या मानाने जिल्ह्यातला इतर भाग अविकसित राहिला हे आहेच...

अहमदनगर, नासिक जिल्ह्यात मात्र केवळ जिल्हा केंद्रेच नाहीत तर अंतर्भागही बराच चांगला विकसित होत आहे. सांगली, सोलापूर, कोल्हापूर जिल्ह्यांचीही हीच स्थिती आहे. आणि ह्याचे श्रेय साखर कारखानदारी व उसाची लागवड ह्यांची तिथल्या नेतृत्वाने जी सांगड घातली आहे तिला द्यावे लागेल. इथला जो विकास आज ह्या साखर कारखानदारीमुळे होत आहे तो बराचसा आदर्श मानला पाहिजे. सहकारी कारखानदारीत अनेक उणीवा आहेत, अनेक गोलमाल प्रकरणेही आहेत. तिथल्या निवडणुकांना एखाद्या मोठ्या निवणुकांचे महत्त्व प्राप्त होते आणि त्यावर निवडून येण्यासाठी अफाट पैसाही खर्च होतो. हे सहकारी कारखाने म्हणजे त्या त्या ठिकाणची संस्थाने बनली आहेत. सहकारी साखर कारखानदारी विरुद्धचे हे सारे आरोप मान्य करूनही, ज्या पद्धतीने ह्या कारखानदारीने परंपरागत मानलेल्या इथल्या शेतकऱ्यांचे उद्योजकात रूपांतर केले, ह्या शेतकऱ्यांच्याच जिवावर इथली कारखानदारी उभारली त्या कारणासाठी आपण ह्या साखर कारखानदारीला मानतो ! मध्य महाराष्ट्रातल्या ह्या रखरखीत प्रदेशाचे साखर कारखानदारानी अक्षरशः स्वरूपच पालटून टाकले ह्यात वाद नाही !! आता ह्या साखर कारखानदारीत शुद्धिकरणाची मोहीम कुणीतरी हाती घेतली तर हा व्यवसाय अधिकच अनुकरणीय ठरू शकेल.

ह्या विभागात साखर कारखानदारी अशी फोफावत असता, इतर अनेक गोष्टीकडे मात्र दुर्लक्ष झाले आहे. ऊस बागायत ह्या विभागात निश्चित वाढली. उसाचे उत्पादनही मोठ्या प्रमाणावर वाढले. पण त्याचवेळी अन्नधान्य (गहू, बाजरी ज्वारी), शेंगदाणा वगैरेचे उत्पादन कमी होत गेले. फार काय ह्या पिकांच्या लागवडीखालील जमिनीतही वरचेवर घटच होत गेली. वास्तविक साखर कारखानदारी प्रमाणेच, शेंगदाण्याचे (किंवा सोलापूर जिल्ह्यात करडईचे) उत्पादन वाढवून त्यापासून वनस्पती तूप (डालडा, उमदा पद्धतीची!) वा रिफाईंड तेलांचे कारखानेही सहकारी पद्धतीने उभारता आले असते. डाळीचे उत्पादनही वाढवून डाळ मिल्सच्या उद्योगालाही ह्या व त्याचप्रमाणे जळगाव, धुळे आदि जिल्ह्यात मोठ्या प्रमाणावर चालना देता आली असती. हीच परिस्थिती विदर्भातल्या जिल्ह्यांची देखील आहे. सोलापूर, कोल्हापूर, धुळे, जळगाव व वैदर्भिय जिल्ह्यांतून कापड व्यवसाय मोठ्या प्रमाणावर व तोही सुस्थिर अवस्थेत उभा आहे तयार कपडे बनवण्याच्या व्यवसायांना इथे प्रोत्साहन सहज देता आले असते. त्याचप्रमाणे कापड व साखर कारखानदारीसाठी आवश्यक अशी दुरुस्तीची कामे करणारी केंद्रे (एखादी मोटार बिघडली तरी ह्या मंडळींना वाईंडिंगसाठी पुण्या-मुंबईकडे धाव घ्यावी लागते !), रंग, व इतर रसायने बनविणारे छोटे व्यवसाय यांनाही चालना देता आली असती. मागे मी सोलापूरला त्याच वेळी अहमदनगरलाही गेलो होतो. अशा तऱ्हेचे व्यवसाय सुरू करण्यासाठी जी आवश्यक माहिती तरुणांना असावी लागते तीच त्यांना मिळत नसल्याचे मला प्रकर्षाने जाणवले. तसेच जी मनोभूमिका तरुणाची तयार व्हायला लागते तीही करण्यासाठी प्रयत्नच होत नाही असे मला आढळले. सोलापूरचे त्यावेळचे उद्योग अधिकारी ह्या संबंधात माझ्याशी बराच वेळ बोलले. त्यांनी सुचवलेला एक उपाय माझ्या काही उपसूचनासह, इथे द्यावासा वाटतो' '...महाराष्ट्रातल्या तरुणांमधून खऱ्या अर्थाने जर उद्योजकता रुजवायची असेल तर ती शालेय जीवनापासून रुजवली जावी. शालेय जीवनाच्या सुरुवातीच्या काळात आपल्याकडे जिल्ह्याचा भूगोल शिकवायची पद्धत आहे. मुलगा शालांत परीक्षेच्या जवळपास आला की, शेवटच्या दोन तीन वर्षात त्याला जिल्ह्याच्या भूगोलाची पुनः एकदा वेगळ्या दृष्टिकोनातून माहिती करून द्यावी. जिल्ह्यातली नैसर्गिक साधनसंपत्ती, तिचा योजनाबद्ध विकास करण्याच्या दृष्टीने आवश्यक प्रयत्न, जिल्ह्यातले लोक व त्यांची परांपरागत कला-कारागिरी, जिल्ह्यातले अस्तित्वात असलेले उद्योगधंदे व शेती, ह्या शेतीत उद्योगधंद्यामध्ये लागणारे रसायने व इतर माल, ह्या व्यवसायात आवश्यक सुधारणा ह्याची साधारणतः शेवटच्या दोन तीन वर्षात विस्तृत माहिती विद्यार्थ्याला करून द्यावी.

प्रेक्षणीय स्थळांच्या सहलींबरोबरच अशा शेतांना औद्योगिक क्षेत्र कालाकारागिरांच्या व्यवसायांना भेटी देऊन प्रत्यक्ष अवलोकनाची संधीही ह्या विद्यार्थ्यांना मिळवून द्यावी. शेवटच्या वर्षाला किंवा नवीन अभ्यासक्रमानुसार एस. एस. सी नंतरच्या कॉलेजपूर्व वर्षाला 'आपल्या जिल्ह्याचा विकास हा ऐच्छिक विषय विद्यार्थ्यांना ठेवावा. हा विषय घेऊन बाहेर पडणारा विद्यार्थी, प्रायः निम्मा उद्योजक झालेला असेलच. त्याला नेमका वेचून काढून, त्याच्यात निर्माण झालेली उद्योजकता व नवीन दृष्टी विकसीत करण्यासाठी त्याला खास प्रशिक्षण ' जिल्हा विकास केंद्र ' वा तत्सम काही संस्था काढून दिले पाहिजे व ह्या शिक्षणात प्रायोगिक शिक्षणावर प्रत्यक्ष कामावर व विद्यार्थ्यांच्या व्यक्तिगत विचार शक्तीवर भर देण्यात आला पाहिजे...' महाराष्ट्र लघुउद्योग विकास महामंडळ सध्या उद्योजकता विकास केंद्राची योजना राबवीत आहे. महाराष्ट्र शासनाच्या सहाय्याने वरील योजना जर त्यांनी शालेय पातळीवर राज्यभर राबवली तर त्याचा मोठा फायदा होईल असे मला वाटते...

अशा तऱ्हेच्या खास प्रयत्नांअभावी असेल कदाचित पण ह्या ऊस व कापूस ह्यांच्या अधिपत्याखालील प्रदेशात इतर उद्योगांकडे, खाद्यान्नांच्या उत्पादनाकडे दुर्लक्ष झाले आहे ह्यात मात्र वाद नाही.

ह्या साऱ्या जिल्ह्यांच्या तुलनेत कोल्हापूर जिल्हा व विशेषतः खुद्द कोल्हापुर मात्र उठून दिसते. मुंबई, ठाणे ह्यांचा भरपूर विकास झाल्यानंतर, उद्योगधंदे जसे पुण्याला सरकले तसेच ते काही प्रमाणात नासिकलाही सरकले. उत्तम हवापाणी, रेल्वे-रस्ते ह्यांच्या दृष्टीने सोयीचे असे नासिक शहर असल्यामुळे उद्योगधंद्यांची वाढही तिथे झपाट्याने झाली. स्थानिक नेतृत्वही उत्तम मिळाल्यामुळे अनेक मोठे कारखानेही तिथे गेले, व लघुउद्योग विकासाला त्यामुळे तिथे चांगली चालनाही मिळाली. सोलापूर, नागपूर ह्यांना औद्योगिक पार्श्वभूमिही चांगली होती. कोल्हापूरला मात्र ह्यापैकी कुठलाही वारसा नव्हता. रेल्वेने तर ते आतापर्यंत महाराष्ट्रातल्या मुख्य केंद्राशी धडपणे जोडलेलेही नव्हते. कोल्हापूरचे राजकीय नेतृत्वही काँग्रेसविरोधीच राहिले. पण एवढे सर्व असूनही करवीरकरांनी जी प्रगती केली आहे ती निःसंशय स्पृहणीय आहे. कुठल्याही तऱ्हेच्या फार मोठ्या कारखान्याशिवाय एखाद्या ठिकाणची औद्योगिक प्रगती साधत नाही, लघुउद्योगांना वाव मिळत नाही ही कल्पनाही करवीरकरांनी खोटी पाडली आहे. कोल्हापुरात आज जे विणले गेले आहे ते लघुउद्योगांचे जाळे आहे. कित्येकदा मी कोल्हापूरची तुलना पंजाबशी करतो. ऑईल इंजिन्सचा, निरनिराळ्या छोट्या यंत्रांचा तिथला उद्योग अगदी पंजाबातल्या सायकल वा शिवणयंत्रांच्या उद्योगांची आठवण करून देतो. भांडवल, तांत्रिक ज्ञान, औद्योगिक ज्ञान ह्या साऱ्या अडचणींवर मात करून, तिथले औद्योगिकरण आज बहरताना दिसत आहे. कोल्हापुरातला एक तरुण लघुउद्योगपती मला मुंबईत भेटला. दोन लेथ, एक शेपिंग मशीन, एक ड्रीलींग मशीन, छोटी टूलरूम असा लहानसा त्याचा पसारा आहे. बेळगाव, कोल्हापूर व काही प्रमाणात मुंबई-पुण्याच्या उद्योगधंद्यांना तो आपला तयार माल पुरवतो. विविध महामंडळांच्या बाबतीत त्याचा अनुभव फार कडवट दिसला. एका मार्मिक उक्तीत त्याने आपली प्रतिक्रीया बोलून दाखवली. तो म्हणाला, 'ह्यांच्या नादी लागला. त्याचा कार्यभाग बुडाला !' कडवट भूमिकेच्या समर्थनार्थ तो पुढे म्हणाला 'दिरंगाई हे माझ्या कडवटपणाचे कारण ! ह्यांच्याकडे एखादा प्रोजेक्ट दिला की त्याच्यावरचा ह्यांचा निर्णय येईपर्यंत ५–६ महिनेही कधीच निघून जातात. तो पर्यंत, आजच्या गतिमान जगात तो प्रोजेक्टच मुळात कालबाह्य ठरून जातो. प्रोजेक्टबद्दल गुप्तताही ही मंडळी बाळगीत नाहीत. त्यामुळे आपला प्रोजेक्ट दफ्तर दिरंगाईत अडकला असतानाच, दुसराच कुणीतरी, खाजगी पैशांवर तोच प्रोजेक्ट अंमलातही आणून टाकतो. MSSIDC कडून कच्चा माल मिळवायचाय. MSFC कडून काही कर्जाचा हप्ताही यायचा आहे. हितसंबंध असे अडकले आहेत. तेव्हा, प्लीज, मि. सोमण, माझ्या नावाचा मात्र कुठे उल्लेख करू नका ..'

...कोल्हापूर, अहमदनगर, नासिक नंतर मी औरंगाबादेत प्रवेश केला, मराठवाडा नंतर पाहिला, तेव्हा खरा मागासलेला भाग म्हणजे काय ह्याची मला चांगलीच जाणीव झाली. अक्षरशः रुक्ष आणि उजाड प्रदेश. दळणवळणाची धड सोय नाही, एस. टी. शिवाय वहातुकीची दुसरी साधने नाहीत ! मोगलाईत हा प्रदेश हैदराबादेसमोर दुय्यम श्रेणीचा ठरला. स्वातंत्र्यानंतर, महाराष्ट्राच्या स्थापनेपर्यंतही ह्या प्रदेशाकडे दुर्लक्षच झाले. बीड, उस्मानाबाद, परभणी हे जिल्हे तर त्यातल्या त्यात आणखीनच उजाड. औरंगाबाद, नांदेड थोडे बरे, पण तरीही उर्वरित महाराष्ट्रापेक्षा मागासलेलेच. कोकणातून प्रवास करताना, रेल्वे नसली तरी निदान रस्ते तरी चांगले आहेत. मराठवाड्यात तेही नाही. महाराष्ट्र राज्याच्या निर्मितीनंतर आता मात्र थोडेफार प्रयत्न मराठवाड्याच्या विकासार्थ सुरू आहेत. औरंगाबादला जवळजवळ प्रादेशिक राजधानीचे स्वरूप देऊन महत्त्वाच्या कचेऱ्या तिथे हलवल्या गेल्या. प्रवासी केंद्र म्हणून औरंगाबादचा विकास करण्याच्या दृष्टीने खास प्रयत्न केले गेले आहेत. मराठवाडा विद्यापीठाची स्थापना होऊन शैक्षणिक प्रगतीचे, रेल्वेमार्ग रुंद करणे, विमानतळाचा विकास करणे वगैरे योजनाही आकार घेत आहेत. पण एवढे सारे होऊनही हे प्रयत्न पुरेसे नाहीत असे वाटते. ह्या प्रदेशात काही धडक कार्यक्रम हाती घेणे आवश्यक आहे. रस्ते, रेल्वे वगैरेंचा त्वरित विस्तार होणेही आवश्यक आहे. व त्याचप्रमाणे मुद्दाम काही मोठे व्यवसायही इथे बाहेरून आणून राबवावे लागतील. त्याचप्रमाणे शेती व जंगल विकास दृष्टचाही काही वेगळे प्रयोग संशोधन करून करावे लागतील आणि हे सर्व करीत असताना, तिथला स्थानिक वर्ग ह्या उपक्रमांमध्ये कसा सहभागी होऊ शकेल इकडेही लक्ष पुरवले पाहिजे, अन्यथा चिखलठाणा (औरंगाबाद) वसाहतीसंबंधी मला आढळली तशी अनास्थाच एकूण औद्योगिकरणाच्या विकासाच्या प्रयत्नांविषयी वाढीला लागण्याचा संभव आहे.

चिखलठाणा येथे औरंगाबादची सिकॉम निर्मित औद्योगिक

## मराठवाड्यासाठी एखादा धडक कार्यक्रम हवा

वसाहत आहे. 'प्रकल्प' हा महाराष्ट्र लघुउद्योग विकास महामंडळाची भागिदारी असलेला व्यवसाय इथेच उभा आहे. त्याखेरीज ए पी. आय ह्या मुंबईतल्या लॅम्ब्रेटा स्कूटर्स बनविणाऱ्या कंपनीचा एक मोठा कारखाना इथे उभा आहे. कोरूला रबर कंपनीचाही एक मोठा व्यवसाय इथे आहे. शिव लॅमिनेटींग व धूत केमोप्लास्ट हे दोन मोठे प्लास्टिकचे उद्योगही इथेच आहेत. दारू उत्पादनाचा एक कारखाना इथे आहे. ह्या शिवाय दोन ' फाईव्ह स्टार ' हॉटेले, एक महाविद्यालयही ह्या औद्योगिक परिसरात आहे. ह्याशिवाय १५% सबसिडीचा फायदा घेऊन अनेक मोठाले उद्योग येथे येऊ घातलेले आहेत. एवढ्या मोठ्या ह्या औद्योगिक वसाहतीच्या बाबतीत स्थानिक वर्ग मात्र काहीसा नाराज आहे. कारण ह्या सर्व उद्योगात प्राधान्य मिळाले आहे ते बाहेरच्या माणसाला. इथल्या कारखान्यातून निर्माण होणारा पैसा जिल्ह्याबाहेर जाणार आहे; त्याचा जिल्ह्याला उपयोग फारसा होणार नाही ही चीड इथे बऱ्याच प्रमाणात आढळते. परंतु दुसरा एक मतप्रवाह असाही आढळतो की, ज्याच्या म्हणण्यानुसार 'सुरुवातीच्या काळात हे असे घडणे अपरिहार्य आहे. हे मोठे उद्योग उभे राहिल्यानंतर त्यांच्या ऑक्सिलियरी युनिटसमधून जर स्थानिक उद्योजकांना प्राधान्य मिळाले नाही तर ते मात्र असमर्थनीय ठरेल...' आणि मराठवाड्याच्या दृष्टीने विचार करता हे मत बरेचसे वस्तुस्थितीवर आधारलेले आहे असे दिसते !

## कामगारचळवळ आणि मागासलेले विभाग

'प्रकल्प'चे एक भागिदार श्री. लोकूर हे मला तिथल्या कारखान्यात भेटले. शेतीची अवजारे, त्यातही प्रामुख्याने नांगर ह्या कारखान्यातून बाहेर पडतात. श्री. लोकूर म्हणाले, '...इथे मोठे कारखाने उभे राहिले तरच लघुउद्योगांना इथे वाव आहे. एरवी, स्वतंत्रपणे लघुउद्योगांना इथे वाव नाही असे मला वाटते. त्या दृष्टीने इथल्या वसाहतीची वाढ योग्य रितीने नियोजित केली आहे असे मला वाटते. पण कामगार चळवळीमुळे नव्याने उभे राहात असलेले इथले औद्योगिक विश्व काहीसे बुचकळ्यात पडले आहे. एपीआयच्या इथल्या युनिटमध्ये दत्ता सामंताच्या नेतृत्त्वाखाली गेल्या ४५ दिवसापासून संप सुरू आहे. मागण्या काय तर, मुंबई इतकीच वेतनश्रेणी इथेही लागू केली पाहिजे. अशा तऱ्हेच्या कामगार चळवळीपासून इथल्या कारखान्यांना निदान सुरुवातीच्या काळात तरी संरक्षण मिळाले पाहिजे. ज्यांना ह्या औद्योगिकदृष्ट्या अविकसित विभागाचा विकास घडून यावा असे वाटत असेल, त्यांनीच ह्या बाबतीत आग्रह धरला पाहिजे. नाहीतर नवीन व्यवसाय इथे सुरू करायला उद्योजक धजावणार नाहीत...'

श्री. लोकूर हे नाणावलेले तंत्रज्ञ आहेत. किर्लोस्कर कारखान्यातून त्यांनी अनेक वर्षे काम केलेले आहे. इथले उत्पादन, कारखान्याचे संचलन ह्यात त्यांचा महत्त्वाचा वाटा आहे. MSSIDC, MSFC वगैरे संस्थांविषयी, त्याचप्रमाणे महाराष्ट्र बँकेच्या सहकार्यासंबंधी त्यांनी फार चांगले उद्गार काढले. विशेषत: महाराष्ट्र बँक व महाराष्ट्र लघुउद्योग विकास महामंडळ ह्यांच्या सहकार्याचा त्यांनी आवर्जून उल्लेख केला. ह्या व्यवसायाची आजची वार्षिक उलाढाल वीस लाखावर आहे.

औरंगाबादेत स्टेशनजवळ दुसरी औद्योगिक वसाहत उद्योग विकास महामंडळाने (MIDC) वसवली आहे. इथे प्रामुख्याने लघुउद्योगच उभे आहेत वा नव्याने आकार घेत आहेत. निर्लेप तव्यांचे उत्पादन करणारा उमासन्स प्रा. लि. हा श्री. भोगले ह्यांचा, आपले वेगळेपण दाखवून देणारा व्यवसाय इथे उभा आहे. त्याचप्रमाणे श्री. राजन् कासलीवाल ह्या तंत्रज्ञाचा, 'सुशिक्षित बेकारांना सहाय्य' या योजनेखालील मेटल फॅब्रिकेशनचा, स्टील फ्रेम्सचा छोटा उद्योगही इथे आहे. पत्र्याच्या टाक्या वगैरे तिथे बनतात. लघुउद्योग महामंडळाचे एक संचालक (Member of the Board of Directors) श्री. नागोरी ह्यांचा कमल इंडस्ट्रीज हा लोखंडी फर्निचरचा कारखानाही इथे आहे. '.. १९६८ साली स्थापन केलेल्या ह्या लघुउद्योगाला आता कुठे स्थैर्य लाभले आहे.' असे सांगून श्री. नागोरी पुढे म्हणाले, 'ही परिस्थिती सर्वच लघुउद्योग घटकांना लागू आहे. तेव्हा एखाद्या नवीन माणसाला उद्योगधंदा सुरू करायचा असेल तर किमान दोन-तीन वर्षे तरी कटोकटी दिवस काढावे लागतात. ह्यामुळे तो अनेकदा निराश होतो... MSSIDC, MSFC वगैरेंच्या योजना चांगल्या जरी असल्या तरी, नवीन उद्योजकांना आकर्षित करायला त्या अपुऱ्या पडतात त्या ह्यामुळेच. ७५ किंवा ८५ टक्के देखील अर्थसहाय्य वरील संस्थामार्फत मिळवले तरी ऊर्वरीत १५ ते २५ टक्के रक्कम व नंतर दोन तीन वर्षांतले धक्के सहन करण्यासाठी आवश्यक तो खेळता पैसा त्याच्या गाठी नसल्याने तो कोसळतो. अशा अवस्थेतून जिद्दीने पुढे सरकणारे फारच थोडे. म्हणून, माझे असे म्हणणे आहे, की नव्याने उभ्या राहणाऱ्या छोट्या व लघुत्तम (Tiny) उद्योगांना, त्यांच्या खेळत्या भांडवलासह सर्व गरजा लक्षात घेऊन, संपूर्ण मदत त्यांना पोचवली गेली पाहिजे...'

MSFC, MIDC वगैरेंच्या मुंबई कार्यालयातून हिंडतांना अशीच व्यथा काही अधिकाऱ्यांनी देखील ऐकवली. त्यातला एक म्हणाला, '...अगदी लघुउद्योग विकासासाठी असलेल्या सर्व महामंडळाचा फायदा होतो कुणाला ? ह्यांची गिऱ्हाईके आहेत कोण ? थोडी आकडेवारी तपासली तर असे आढळून येईल की, ह्या मदत मिळवणाऱ्या उद्योजकांपैकी जवळ जवळ ९० टक्के लोक लक्षाधीश आहेत, किंवा चांगल्यापैकी पैसा बाळगून आहेत....'

थोडे विषयांतर इथे झाले, तरी श्री. नागोरींचा मुद्दा खरोखरच चिंतनीय आहे. लघुत्तम (किंवा Tiny) उद्योगाबाबत तर हे जास्तच खरे आहे वन मॅन शो असलेल्या ह्या उद्योगात उद्योजकाची आर्थिक दृष्ट्या अक्षरश: कसोटी लागते. बहुतांश उद्योग बंद पडतात किंवा रडतखडत चालतात विशेषत: कला कारागिरीवर चालू असणारे उद्योग अशा परिस्थितीत चांगलेच रखडतात. अशा उद्योगांना व उद्योजकांना हातभार लावण्याच्या दृष्टीने किंवा त्यांना खतऱ्यातून बाहेर काढण्याच्या दृष्टीने पुरेशा योजना ह्या संस्थाकडे आजतरी नाहीत ही वस्तुस्थिती आहे.

सिझल्स अँड सिझल्स ह्या एका 'टायनी' उद्योगाची कहाणी मला औरंगाबादेत ऐकायला मिळाली. सिझल नामक एका वनस्पतीपासून दोर धागा काढून (सुतळी किंवा काथ्या सारखा) त्यापासून विणून बास्केटस्, टोपल्या, पाकिटे वगैरे तयार करण्याचा हा उद्योग आहे. तसा खरा नाविन्यपूर्ण, वेगळा व स्थानिक साधन-संपत्तीवर आधारीत. तरी हा सध्या रडतखडत चालू आहे असे मला सांगितले

गेले. बहुधा तयार मालाला योग्य गिऱ्हाईक मिळवणे जड जात असल्यामुळे व्यवसायाची ही अवस्था असावी ! ह्या व्यवसायाच्या जागी मी पोचलो तर जागा निदान तेव्हा तरी बंद होती. ह्याच सिझलसवर आधारीत उद्योग अहमदनगरच्या मिशनतर्फे स्थानिक स्त्रियांना काम मिळवून देण्याच्या हेतूने चालवला जातो. अर्थात मोठ्या प्रमाणावर छोट्या मशीनवर हा धागा काढून तो विणणे किंवा त्याचा दोर तयार करणे हा व्यवसाय इथे चालू आहे. मराठवाडा, अहमदनगर, पुणे परिसरात ही वनस्पती मोठ्या प्रमाणावर आढळते. परंतु तिच्यापासून असे काही व्यवसाय सुरू करण्याऐवजी सिझलसची पाने खुडून कच्चा माल म्हणून प. बंगाललाच पाठवायचा व्यवसाय जास्त मोठ्या प्रमाणावर चालतो.

औरंगाबादेत रेशमाचा व्यवसाय मोठा आहे. 'औरंगाबाद सिल्क आणि हिमरू शाल्स' देशभर प्रसिद्ध आहेत. एक प्रकारचा नक्षीदार दगडही इथे उलब्ध आहे. अ‍ॅगेट (AGATE) हे ह्या दगडाचे नाव. ह्या दगडापासून कफलिंग्ज, कानातले खडे, अ‍ॅश ट्रेज, पेपरवेट्स वगैरे बनवले जातात. अजंटा अ‍ॅगेट ट्रेडर्स हे ह्या उत्पादकांचे नाव. परंपरागत कारागिरीवर आधारीत ह्या उद्योगाला मशिनरीची जोड देऊन उत्पादनाचा वेग वाढवला गेला तर हा एक उद्योग फोफावू शकेल आणि इतरही असेच 'टायनीज' मूळ धरू शकतील. उत्पादन आढळे की आज ह्या दगडापासून तयार होणाऱ्या वस्तूंच्या ज्या भरमसाठ किंमती आहेत, त्या आपोआपच कमी करता येतील व त्यांची विक्री वाढवता येईल...

जी कथा या अ‍ॅगेट दगडाची, तीच कथा पैठण येथील सुप्रसिद्ध पैठणीची. एक पैठणी तयार करायला, तिथल्या कारागिराला दोन ते तीन महिने लागतात असे मला सांगितले गेले. एकेका पैठणी शालूची किंमत आठशे ते हजार रुपयांच्या घरात असते. साहाजिकच अशा किंमती वस्तूंना मागणी कमी राहाते. उत्कृष्ट कलाकुसर पेश करून देखील, त्या मानाने बिदागी कमीच पडते; आणि तरीही मालाची बाजारातील किंमत भरमसाटच असते. याचा परिणाम म्हणजे मागणीला उतरती कळा लागते, कला लोप पावू लागते. पैठणी विणणाऱ्यांची संख्या पैठण येथे एकेकाळी खूप होती. आज मात्र बोटावर मोजण्याइतके शिल्लक आहेत. एकेकाळच्या जगप्रसिद्ध अशा व पैठणीच्या कारागिरांना वाचवायची धडपड आज पैठण इथल्या पैठणी केंद्रात सुरू आहे. हे केंद्र सध्या महाराष्ट्र लघुउद्योग विकास महामंडळाकडे आले आहे. सर्व पैठणी कारागिरांना एकत्रित करून, नवे कारागिर तयार करवून घेऊन पैठणीची कला जगवायचा आटोकाट प्रयत्न सध्या सुरू आहे. ह्या कलाकारांना कच्चा माल, माग उपलब्ध करून देऊन पैठणींच्या विक्रीची जबाबदारी केंद्राने (लघुउद्योग विकास महामंडळ केंद्राने) घेतल्यामुळे ह्या कलाकारांना निश्चित कमाईची हमी आज मिळाली आहे. कला जगून आहे...

लाखेपासूनचे वेगवेगळे पदार्थ, तांब्याची भांडी हेही इथले काही परंपरागत उद्योग ! औरंगाबाद खेरीज, नांदेड, जालना ही देखील औद्योगिक केंद्र म्हणून विकसित करायचा प्रयत्न सुरू आहे. वनस्पती तुपाचा कारखाना, एक साखर कारखाना, प्लास्टिक खेळण्यांचा कारखाना अशा स्वरुपात हे प्रयत्न सुरू आहेत. एकूणच निसर्गाची साथ मराठवाड्याच्या निम्म्या भागात कमी असल्याने, औद्योगिक दृष्ट्या मराठवाड्याचा कायापालट, बाहेरून विकास साधने तिथे आणूनच घडवावा लागेल. त्यासाठी स्थानिक उद्योजकता विकास महत्त्वाचा ठरेल. त्याचप्रमाणे, इतर नैसर्गिक साधने शोधायचा प्रयत्नही आवश्यक ठरेल. अशा दृष्टीने एक प्रयोग औरंगाबादेच्या जवळच सुरू असल्याचे मला समजले. निंबोण्या मराठवाड्यात भरपूर मिळतात. (तशा त्या सगळीकडेच मिळू शकतात !) ह्या निंबोण्यापासूनच तेल मिळविता आल्यास प्रयत्न करून पहावे असा हा प्रयोग आहे. तो यशस्वी झाल्यास सध्याच्या तेलाच्या दुर्भिक्षाच्या दिवसात, तेलाचे आणि वनस्पतीचे साठे हुडकून काढण्यासाठी विरोधकांना घ्यावे लागणारे परिश्रम तरी कमी होतील...

मराठवाड्याच्या संदर्भात, दुसराही एक युक्तिवाद औरंगाबादेत एकदोघांनी माझ्याजवळ केला. त्यांच्या मते...एकूणच मराठवाड्यात, नैसर्गिक साधन संपत्ती कमी असल्याने, सर्व महत्त्वाचे जडोद्योग व तेही प्रायः सार्वजनिक क्षेत्रातले. (Publie Seetor Industry) मराठवाड्यात आणले जावेत. महाराष्ट्रातल्या अन्य प्रदेशात नैसर्गिक साधन संपत्तीचा एवढा खडखडाट नाही. त्या संपत्तीवर आधारीत उद्योगधंदे तिथे जोपासले जाऊ शकतात. तेव्हा ह्या विभागातून हे असेच उद्योग जोपासून, वाढवून, बाकी सर्व सार्वजनिक क्षेत्रातले महत्त्वाचे मोठे उद्योग मराठवाड्यात आणावेत. सार्वजनिक उद्योगातून उपउद्योगालाही वाव मिळेल; व मराठवाड्याचा औद्योगिक विकास घडवून आणता येईल...'

## निदान प्रवासीउद्योग तरी

मराठवाड्यात उद्योजकता वाढीस लावायला, तिथल्या तरुणांना उद्योगात आणण्यासाठी खास प्रयत्नांची आवश्यकता आहे हे सांगत असतानाच, एका उद्योगाचा मराठवाड्यात, विशेषतः औरंगाबादेत हवा तेवढा विकास झालेला नाही व ह्या उद्योगात पुढे यायला तरुणांना वाव आहे हे इथे मराठवाड्यावरील हा त्रोटक वृत्तांत संपवताना नमूद करणे जरूर आहे. हा उद्योग म्हणजे 'टूरिस्ट उद्योग' अजिंठा-वेरूळ-दौलताबाद-घृष्णेश्वर व खुद्द औरंगाबाद अशी भरपूर प्रेक्षणीय स्थळे ह्या परिसरात आहेत. नांदेड, पैठण, आंबेजोगाई वगैरे ऐतिहासिक दृष्ट्या महत्त्वाची केंद्रे आहेत. ही सारी प्रवाशांच्या दृष्टीने महत्त्वाची केंद्रे लक्षात घेऊन लक्झरी मिनी बस-कोचेर्स, लक्झरी टॅक्सी, मध्यम वर्गियांना परवडतील अशा मिनी बसेस, गंमतीदार माहिती देऊन परिसराचे दर्शन घडवून आणणाऱ्या मार्गदर्शक संस्था (Guide Institutions), चांगल्या प्रकारची हॉटेल्स वगैरे असंख्य व्यवसायांना औरंगाबादेत आजही भरपूर वाव आहे. त्याचप्रमाणे प्रवाशांना, अजंठा-वेरूळ आदी ठिकाणांना भेटी देऊन आल्यावर संध्याकाळच्या वेळी मनोरंजनार्थ फारशा काहीच सोयी औरंगाबादेत उपलब्ध नाहीत. काही तरुणांनी एकत्रित येऊन इथे रिक्रिएशन क्लब्स् सुरू केले तर तेही उत्तम रितीने चालू शकतील.

मोठ्या उद्योगांच्या उभारणीची वाट पाहात असताना, रेशीम उद्योग, कापड उद्योग, अ‍ॅगेट दगड, सिझलस, तेलोत्पादन, प्रवास-उद्योग ह्यावर आधारीत लघुउद्योगांद्वारे औद्योगिक विकासाच्या दृष्टीने काही पावले औरंगाबादकरांना टाकता येतील....

□ □

# तर औद्योगिक क्रांती दूर नाही...

## माणूस प्रतिनिधी सु. ल. सोमण



उद्योजकांचे मी एकूण चार प्रकार मानतो....

श्री. मंडलेकर

आतापर्यंतचे चर्वितचर्वण, श्री. आवासाहेब गरवारे, श्री. भाऊसाहेब नेवाळकर, श्री शं. किर्लोस्कर, श्री. म. वि. पानवलकर ह्या मान्यवरांचे विचार ह्यातून औद्योगिक महाराष्ट्राचे व त्यातल्या लघुउद्योग विकासाचे एक चित्र निश्चितपणे मनापुढे उभे राहाते. हे चित्र फार रोमहर्षक नसले तरी संपूर्णपणे नैराश्यमयही नाही. विशेषतः महाराष्ट्र राज्याच्या निर्मितीनंतर काही प्रगती निश्चित झाली आहे. अगदी ग्रामीण विभागात व मराठवाडा, कोकणासारख्या अविकसित विभागात देखील औद्योगिक वसाहती उभ्या राहात आहेत. आजपर्यंतची विचारसरणी कदाचित संपूर्ण बरोबर नसेलही, नैसर्गिक साधनसंपत्तीवर भर देऊन लघुउद्योग विकसित करण्याचे कार्य गेल्या दहा वर्षात व्हावे तसे झालेले नाही हेही मान्य, परंतु बहुतेक सर्व महामंडळाचे पदाधिकारी आज जे विचार मांडीत आहेत ते पाहता, 'उद्या'बाबत मी 'आशा'वादी बनलो आहे.

विशेषतः महाराष्ट्र लघुउद्योग विकास महामंडळाचे कार्यकारी संचालक (Managing Director) श्री. मंडलेकर, दुसरे एक अधिकारी श्री. भेंडे ह्यांच्याशी बोलताना हे पुनः एकवार जाणवले. 'रोजगारी वाढविण्यासाठी लघुउद्योगाच्या विकासाकडे जास्त लक्ष पुरविले पाहिजे व शेतीवर आधारित उद्योगही वाढवले पाहिजेत. म्हणजे ग्रामीण जनतेचा ओघ शहराकडे वळणार नाही व त्यांना तेथेच रोजगारी मिळेल' असे एके ठिकाणी बोलतांना महाराष्ट्राचे उद्योगमंत्री श्री नरेंद्र तिडके म्हणतात. तर महाराष्ट्र लघुउद्योग विकास महामंडळाचे श्री. मंडलेकर त्याही पुढे जाऊन, 'ग्रामीण विभागातला प्रत्येक कारागीर त्याचा स्वतंत्र व्यवसाय घेऊन उद्योजक बनून पुढे आला पाहिजे...' असे म्हणतात. उद्योजकांचे मी एकूण चार प्रकार मानतो. एक मोठा उद्योगपती, जिथे गुंतवणूक कोट्यवधींच्या घरात जाते. नाइलाजाने अजून काही वर्षे तरी ह्या उद्योगांची सूत्रे काही ठराविक कुटुंबाकडेच जाणार. दुसरा मध्यम लोकांचा गट २० ते ५० लाखाची गुंतवणूक करणारा हाही तसा मोठाच गट. तिसरा ७–७॥ लाखापर्यंतचा धंदा करू शकेल (म्हणजे सध्याचा लघुउद्योग गट !) असा गट. हा माणूस अनुभवी असावा लागतो. काही तांत्रिक बाबींचे त्याला ज्ञान आवश्यक असते. चौथा गट जो मी मानतो तो अगदी छोट्या उद्योजकांचा किंबहुना त्यांना उद्योजक म्हणून कुणी मानीतच नाही, कारागीरच फक्त काय ते मानतात. पण मला हा कारागिरांचाच (Artisans) गट महत्त्वाचा वाटतो. त्याला कला अवगत असते. त्याच्या कलेला यांत्रिकतेचा, आधुनिकतेचा जर थोडा स्पर्श घडवून आणला, तर त्याच्या कलेत एकदम सफाई येऊन जाईल. त्याच्या कामाचा वेग वाढू शकेल. त्याचा स्वतःच्या धंद्यातून त्याला मिळणारा रोजगार वाढू शकेल.

'हा छोट्यातला छोटा माणूस जर शोधून काढून त्याच्यावर हे संस्कार घडवता आले, तर मला खात्री आहे, तो चांगल्या प्रकारचा उद्योजक बनू शकेल. तो तितका हुशार निश्चित आहे. आमच्या नव्या योजनेखाली जर आम्ही, जिल्ह्या-जिल्ह्यातून लोहार, चांभार, सुतार, रंगारी, पिंजारी, वगैरे निवडून काढले, त्यांना नवीन, आधुनिक छोटी छोटी यंत्रे मिळवून दिली, तर मला खात्री आहे, ते ते काम सहज आत्मसात करतील. ह्यातलेच काही अधिक मोठ्या व्यवसायासाठी पुढे सरसावतील. औद्योगिकरणाची गती वाढवतील... उद्योजकतेचा गुण आपल्या रक्तात आहे असे मला वारंवार वाटते. फक्त मोठ्या उद्योगाकडे मृगजळाप्रमाणे न धावता, ग्रामीण भागातल्या कला कारागिरीतून सुप्तपणे वावरणाऱ्या उद्योजकाला निवडून काढून त्याच्या रक्तातल्या गुणाला वाव द्यायची आवश्यकता आहे... महात्माजी म्हणायचे 'चरखा चालवा–माणसाला ओळखा.' मला वाटते म. गांधींना यातून असेच सांगायचे असेल की, ग्रामीण भागातल्या माणसाला, त्याच्या कलेला ओळखा, ती फुलवा. तीतूनच विकास साधेल. मला वाटते हीच आजची आवश्यकता आहे. मोठे उद्योग स्थापन करणे निकडीचे आहेच. पण त्याचबरोबर ग्रामीण विभागाच्या विकासासाठी हे सूत्रही राबविणे आवश्यक आहे...'

श्री. भेंडे यांच्याशी चर्चा करतांना ह्या दिशेने महामंडळाचे प्रयत्न सुरू झाले असल्याचे मला जाणवले. मी आशावादी बनायला हे



**श्री. भेंडे म्हणतात...**

पुरेसे नाही का? श्री. भेंडे यांनी आणखीही एक विचार मांडला. तोही लक्षात घेऊन विकासाची दिशा ठरवली गेली तर प्रादेशिक समतोल साधायच्या दृष्टीनी ते फायद्याचे ठरेल. श्री. भेंडे म्हणतात, '... जो व्यवसाय जिथे उभा राहू शकेल तिथेच तो काढला पाहिजे. उगीच एखादा प्रदेश अविकसित म्हणून यंत्रसामुग्री, कच्चा माल, तंत्रज्ञ, कुशल कामगार सगळे बाहेरून घेऊन तिथे जायचे, उत्पादक काढायचे आणि ते पुन: दूरवर बाहेर पाठवायचे ह्याला काही अर्थ नाही... ५००० रुपयांच्या योजनेखाली, आम्हाला छोटा माणूस गाठून त्याच्या तर्फे ग्रामोद्योग, कुटिरोद्योग फुलवले पाहिजेत. त्यातून त्याच्या गरजेतून पुढे मागे तिथे आपोआपच मोठा उद्योग उभा राहील. अशा पद्धतीने जर मोठा उद्योग उभा राहिला तर तो कुठल्याही प्रदेशात उपरा ठरणार नाही... अगदी अलीकडे हैद्राबादच्या उद्योग विकास इन्स्टिट्यूट तर्फे महाराष्ट्राचे सर्वेक्षण करण्यात आले आहे. त्यांच्या अहवालानुसार, त्यांनी विस्तार केंद्र (growth Centres) निवडली आहेत, त्यांचा प्रथम क्रमाने विकास करावा, व नंतर अविकसित केंद्राकडे वळावे अशी त्यांची शिफारस आहे. ह्याचा अर्थ त्यांच्या शिफारशीनुसार गेल्यास मुंबई पुणे झाल्यानंतर प्रथम कोल्हापूर, सोलापूर, नासिक ह्यांचा विकास करावा लागेल, व त्याच क्रमानी अगदी शेवटच्या टप्प्यात चंद्रपूर, औरंगाबाद आदि जिल्ह्यांचा विकास करावा लागेल. हा उलटा प्रकार काय आहे तेच मला समजत नाही. एकीकडे संतुलित विकासासाठी औद्योगिक विकास ही घोषणा करायची आणि दुसरीकडे विकसित व अर्धविकसित केंद्रांचा आधी पूर्ण विकास करून अविकसित भागाकडे वळा म्हणायचे, हा न्यायच काहीसा अजब आहे. उलट मला तर असे वाटते की प्रगत विभागांचा अधिक विकास होतानाच ग्रामीण विभागातही तिथल्या परिस्थितीनुरूप विकास घडवून आणला पाहिजे. अन्यथा ग्रामीण भागातून विकसित प्रदेशाकडे लोकांचे लोंढे येतील, आणि दोन्हीकडचे प्रश्न तसेच सुरू राहातील...'

विचारांची दिशा सगळीकडेच साधारणत: ही अशी आहे. आणि ती स्वागतार्ह आहे. प्रश्न आहे तो कृतीचा. कृती तशी होते की, अविकसित भागातल्या औद्योगिक विकासापेक्षा जुळ्या मुंबईतल्या औद्योगिक विकासाकडेच जास्त लक्ष पुरविले जाते ते लवकरच लक्षात येईल. परंतु आ. श्री. मनोहर जोशी ह्यांनी म्हटल्याप्रमाणे फार मोठ्या प्रमाणावर सवलती महाराष्ट्र शासनाने जाहीर केल्या असताना महाराष्ट्रातल्या तरुणांनी स्वस्थ का बसावे तेच मला समजत नाही. मुंबईत जाऊन नोकऱ्या शोधण्यापेक्षा, घरी बसून स्वत:च्या मातीशी इमान राखणारा व्यवसाय शोधून काढणे व त्यासाठी आर्थिक साहाय्य मिळवण्यासाठी मुंबईला येऊन जाणे जास्त श्रेयस्कर नाही का? मी तर म्हणेन की मुंबईत नोकरी असलेल्या कोकणातल्या, विदर्भातल्या, मराठवाड्यातल्या तरुणांनीही असा विचार करून आपापल्या गावी जाऊन तिथल्या औद्योगिक विकासाचा ध्यास घ्यायला काहीच हरकत नाही.


आणि मुंबईतल्या, पुण्यातल्या तरुणांनी? त्यांनी इथेच राहून इथल्या औद्योगिक प्रस्थापितांशी टक्कर घेणेच भाग आहे. त्यासाठी MSFC, MSSIDC, MIDC, विविध बँका ह्यांच्या सहकार्याने आवश्यक ते मार्ग चोखाळले पाहिजेत. ह्याशिवाय आणखी लागणारा पैसा उभा करणे त्याला भाग आहे. तो उभा करणे त्याने जमवायलाच, पाहिजे... भीक मागून, नोकरी करून शिल्लक टाकून किंवा इतर कुठल्याही मार्गाने....

ह्याच संबंधात आणखी एका अनुकरणीय उपक्रमाची ही त्रोटक ओळख. एका कंपनीत तंत्रज्ञ, विक्रेता, प्रशासकीय अधिकारी वगैरे विविध भागात काम करणारे अकरा तरुण एकत्र आले. सारे महाराष्ट्रीयन. 'नोकरीत राम नाही, काहीतरी धडपड केली पाहिजे' असे ठरवून ते सारे एकत्र आले. दरमहा वीस रुपये प्रत्येकी गोळा करायचे असे ठरले. आज तीन वर्षे हा उपक्रम चालू आहे. दरवर्षी जमलेल्या पैशावर काही नाटके ही मंडळी लावतात. चौपाटीवर एका भेळपुरीवाल्याला स्टॉल काढून देऊन त्याच्याकडून आपले मुद्दल ह्या मंडळींनी जमा केलेच आहे; पण शिवाय दरमहा काही पैसेही भाड्यादाखल त्याच्याकडून ही मंडळी घेत आहेतच. शिवाय, वर्षासाठी जादा व्याजाने पैसा गुंतवून त्यातुनही पैसा वाढतो आहे. या साऱ्या प्रयत्नातून दरमहा वीस रुपये टाकून तीन वर्षाच्या कालावधीत आठ हजारांच्या ऐवजी ह्या मंडळींनी चौदा हजार बँकेत जमा केले आहेत. एका लाखा-दीड लाखाच्या प्रोजेक्टची पूर्व तयारी आज त्यांची चालू आहे. वित्तीय महामंडळाची मदत मिळून प्रोजेक्ट उभा राहाताना ह्या मंडळीमध्ये आज तंत्रज्ञ, मॅनेजर, लेखनिक सर्व मंडळी तयार आहेत. अनुभव सिद्ध आहेत.

बृहन्मुंबईत अनेक तरुण आज विविध कंपन्यातून मोठ्या जागेवर काम करीत आहेत. त्यांनी एकत्रित येऊन सहकारी पद्धतीवर जर कारखानदारी मुंबईत व जुळ्यामुंबईत सुरू केली तर ते हा हा म्हणता महाराष्ट्रीयन माणसाला कारखानदारीतही पुढे नेऊ शकतील. मध्य महाराष्ट्रात साखर कारखानदारीत साध्या शेतकऱ्याला जे जमले ते मुंबईतल्या सुशिक्षित तरुणांना जमणार नाही असे मानायला मी बिलकूल तयार नाही!

महाराष्ट्रातल्या अविकसित प्रदेशात, छोट्या छोट्या उद्योजकांच्या कुटिरोद्योग–ग्रामोद्योगातून नैसर्गिक साधन संपत्तीवर आधारीत उद्योग उभे राहिले, त्याचबरोबर शेतीचा धंदा तरुणांनी फुलवला आणि साडवली-पडघवली-ग्रॅनेट दगड ह्यासारखे महत्त्वाकांक्षी उद्योग उभे राहिले आणि त्याचबरोबर मुंबई-पुण्यातल्या तंत्रज्ञांनी एकत्रित येऊन प्रस्थापितांशी सहकारी कारखानदारीच्या सहाय्याने टक्कर दिली, तर महाराष्ट्रात खऱ्या अर्थाने औद्योगिक क्रांती घडून यायला वेळ लागणार नाही. □ □

# TOWARDS A NEW GOAL



The Sun is a symbol of industriousness. In Indian thought and culture, the sun is also looked upon as a health giving God. He helps the blossoming up of spirits. He gives strength He promotes health. The total effect of the sun on the life of humanity is invigorating.

That exactly is the role MSSIDC aspires to play in the field of small industry development in the coming decade.

MSSIDC has dedicated itself to accelerate the process of development, generate entrepreneurship, radiate hope and confidence and enlighten the small industrialist by spreading knowledge and information. All our efforts are directed towards this single goal.

MSSIDC

**Maharashtra Small Scale Industries Develoment Corporation Ltd.**

(A Govt. of Maharashtra Undertaking)

Krupanidhi, Ballard Estate, Post Box No. 311 A,
Bombay-400001. Phone: 261121. Telex: 011-3399.
Cable: MASSIDCORP.


राजहंस प्रकाशन संस्थेच्या मालकीचे हे साप्ताहिक संस्थेतर्फे मुद्रक व प्रकाशक **श्री. ग. माजगावकर** यांनी साप्ताहिक मुद्रण १०२५ सदाशिव पेठ, पुणे ३० येथे छापून १०२५ सदाशिव पेठ, पुणे येथील संस्थेच्या कार्यालयात प्रसिद्ध केले. सं. **श्री. ग. माजगावकर**